• पुणे, शनिवार, १५ मार्च २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 107 • वर्ष ४ थे, अंक १०७ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



## फसवणुकीचे साम्राज्य

'दान' दिलेल्या रुग्णवाहिकेची परस्पर विक्री

P३



मुंबई-दिल्लीमध्ये फायनल

१२

## At a Glance

### अंजली दमानियांकडून नवे आरोप



**मुंबई :** मस्साजोगचे सरपंच देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड आणि त्याच्या सहकाऱ्यांवर आरोप निश्चिती झाल्यानंतर केज न्यायालयात पहिली सुनावणी पार पडली. असे असताना ज्यांच्या न्यायपीठासमोर ही सुनावणी पार पडली, त्याच न्यायधीशांसोबत हत्या प्रकरणातील निलंबित पोलिसांनी धुळवड खेळल्याची क्षणचित्रे, फोटो सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी 'एक्स'वर प्रसिद्ध केले आहेत.

सरपंच देशमुख हत्या प्रकरणात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पहिल्यापासून बाजू लावून धरली आहे. वाल्मिक कराडच्या गुंडगिरीच्या कहाण्या ते धनंजय मुंडे यांच्यावरील कृषि खात्याअंतर्गत केलेले भ्रष्टाचाराचे आरोप, यामुळे दमानिया विशेष चर्चेत आल्या. धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्यात » पान ७ वर

# भारताने पाकला खडसावले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दहशतवादाला समर्थन दिल्याचा पाकिस्तानचा बिनबुडाचा आरोप फेटाळत भारताने शुक्रवारी सडेतोड उत्तर दिले. जागतिक दहशतवादाचा खरा केंद्रबिंदू कुठे आहे? हे जगाला चांगलेच माहिती आहे, अशा शब्दांत भारताने पाकिस्तानला खडसावले. पाकिस्तानने भारतावर दहशतवादी कारवायांना पाठिंबा दिल्याचा आरोप केला आहे. "पाकिस्तानने केलेले बिनबुडाचे आरोप आम्ही जोरदारपणे फेटाळतो. जगातील दहशतवादाचा केंद्रबिंदू कुठे आहे? हे संपूर्ण जगाला माहिती आहे," असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटले आहे. "पाकिस्तानने दुसऱ्याकडे बोट दाखवण्यापेक्षा तसेच स्वतःच्या अंतर्गत समस्या आणि अपयशांचे खापर दुसऱ्यांवर फोडण्याऐवजी स्वतः आत डोकावून पाहावे." असे त्यांनी सुनावले.




नैऋत्य पाकिस्तानमधील बलुच बंडखोरांनी मंगळवारी जाफर एक्सप्रेसवर हल्ला केला होता. ही रेल्वेगाडी ताब्यात घेत त्यातील २१४ जणांना सुमारे २४ तास ओलीस ठेवले होते. त्यानंतर पाकिस्तानकडून भारतावर हा आरोप करण्यात आला. पाकिस्तानने अनेकदा भारतावर बलुच फुटीरतावादी गटांना पाठिंबा दिल्याचा आरोप केला आहे. पण यावेळी पाकिस्तानच्या परराष्ट्र कार्यालयाचे प्रवक्ते शफकत अली खान यांनी या हल्ल्यामागे अफगाणिस्तानचा हात असल्याचा संशय व्यक्त केला. त्यांनी सांगितले की या प्रकरणी फोन कॉलद्वारे अफगाणिस्तानशी संपर्क साधल्याचे पुरावे आहेत.

"मी ज्याचा उल्लेख करत होतो तो असा होता की, या घटनेत, आमच्याकडे अफगाणिस्तानातून कॉल ट्रेस केल्याचे पुरावे आहेत." असेही ते म्हणाले. यासोबतच, खान यांनी भारतावर शेजारील देशांना अस्थिर करण्याचा आणि जागतिक स्तरावर 'हत्या मोहीम' चालवण्याचा आरोपही केला. शफकत अली खान यांनी या हल्ल्याची जबाबदारी अफगाणिस्तानने स्वीकारावी, असे आवाहन केले. या संपूर्ण घटनेत हल्लेखोर अफगाणिस्तानातील सुत्रधारांच्या थेट संपर्कात होते. पाकिस्तानला लक्ष्य करणाऱ्या दहशतवादी गटांकडून त्यांच्या भूमीचा वापर होऊ नये याची काळजी अफगाणिस्तानने घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

> पाकिस्तानने इतरांकडे बोट दाखवण्याऐवजी आणि त्यांच्या अंतर्गत अपयशासाठी इतरांना दोष देण्याऐवजी आत्मपरीक्षण करावे. दहशतवादासंबंधीचे सत्य संपूर्ण जगासमोर आहे आणि पाकिस्तानने स्वतःच्या देशातील परिस्थिती सुधारण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे."
> **— रणधीर जयस्वाल,** परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते

## भारताच्या ताफ्यात क्षेपणास्त्र दाखल



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताने स्वदेशी शस्त्र प्रणाली विकसित करण्याच्या दिशेने आणखी एक मोठे पाऊल टाकत, 'अस्त्र' या बियॉन्ड व्हिज्युअल रेंज एअर-टू-एअर मिसाईलचे यशस्वी चाचणी प्रक्षेपण केले आहे. ही चाचणी ओडिशाच्या किनारपट्टीवर 'एलसीए तेजस एएफ एमके १' प्रोटोटाईप लढाऊ विमानावरून करण्यात आली.

संरक्षण दलातील सूत्रांच्या मते, एरॉनॉटिकल डेव्हलपमेंट एजन्सीने चांदीपूर किनाऱ्यावरून हे चाचणी प्रक्षेपण पूर्ण केले. चाचणीमध्ये क्षेपणास्त्राने एका हलत्या लक्ष्याचा अचूक वेध घेतला. या चाचणीमध्ये 'अस्त्र'च्या सर्व उपप्रणालींनी अचूक कार्य केले आणि मिशनची सर्व उद्दिष्टे पूर्ण झाली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी 'डीआरडीओ', भारतीय वायुदल, हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड आणि या चाचणीमध्ये सहभागी असलेल्या सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. ही चाचणी यशस्वी झाल्याने 'एलसीए तेजस एएफ एमके १'मध्ये 'अस्त्र' मिसाईल समाविष्ट करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पुढील काही महिन्यांत अधिक चाचण्या घेण्यात येणार आहेत.

### 'अस्त्र'ची वैशिष्ट्ये

- 'डीआरडीओ'ने विकसित केलेले 'अस्त्र' १०० किमीहून अधिक श्रेणीतील लक्ष्य भेदू शकते. यात प्रगत मार्गदर्शन आणि नेव्हिगेशन प्रणाली आहे, जी अधिक अचूकतेने लक्ष्य नष्ट करू शकते. भारतीय वायुदलाने 'अस्त्र'ला आधीच स्वीकारले आहे.

# अखेर त्या डॉक्टरवर गुन्हा दाखल


## राजगुरुनगर हिट ॲन्ड रन प्रकरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**खेड :** राजगुरुनगर येथे मंगळवारी (दि. ११) घडलेल्या अपघात प्रकरणात राजगुरुनगर येथील एका डॉक्टरवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डॉ सारंग पांडुरंग होले असे या गुन्हा दाखल झालेल्या डॉक्टर चालकाचे नाव आहे. याबाबत खेड पोलिस ठाण्याचे पोलिस संतोष शिंदे यांनी फिर्याद दिली आहे.

मंगळवारी (दि. ११) रात्री ८ वाजण्याच्या सुमारास वाडा रस्त्यावर अपघात झाला. वाडा बाजुकडून येणारी कार चालक चालवत होता. हे वाहन हयगयीने, भरधाव वेगात चालवून खेड बाजुकडुन वाडा बाजुकडे जाणा-या स्प्लेंडर मोटार सायकल व एक पेशन प्रो मोटार सायकल यांना समोरून धडक देवून अपघात केला. अपघातात दोन्ही मोटार सायकल वरील शिवाजी विठ्ठल साबळे, दत्तात्रय मनोहर सुभेदार यांच्या किरकोळ दुखापतीस कारणीभुत झाला. तसेच रुपेशकुमार श्रीशकर चौहाण, राम बाबुराम व सोजित राम यांना यात दुखापत झाली. त्यानंतर, अपघाताची खबर न देता हा डॉक्टर चालक पळुन गेला. डॉ सारंग पांडुरंग होले यांच्या विरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. अपघातातील जखमी हे जबाब देण्याचे परिस्थितीत नसल्याने व त्यांच्यावर राजगुरुनगर येथील शिवतिर्थ हॉस्पीटल येथे उपचार चालु असल्याने सरकारतर्फे पोलिस अंमलदार संतोष शिंदे यांनी फिर्याद दिली आहे. या अपघातात तिघेजणांचे पाय मोडल्याने ते जायबंदी झाले आहेत.

चालक डॉ सारंग होले यांच्या विरोधात खेड पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कायदा कलम २८१, १२५(अ), १२५ (ब), ३२४ (४), मो.वा. का.कलम १८४,१३४(४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.



> पोलिसांची भूमिका चुकीची आहे. सुमोटो मध्ये पोलिसांनी फिर्याद देता येते. या अपघाताकडे पोलिसांनी दुर्लक्ष केले आहे. पोलिसांच्या भूमिकेबाबत वरिष्ठांकडे तक्रार करणार आहे. अपघात घडला तर त्याचा योग्य तो तपास करणे पोलिसांचे काम आहे. जखमींना नुकसान भरपाई साठी न्यायालयात दाद मागता येते. ज्यांनी अपघात केला तो मोकाट आहे. अपघातग्रस्तांना न्याय मिळाला पाहिजे."
> **— दिलीप मोहिते पाटील** माजी आमदार, खेड आळंदी



> घटना घडली त्यावेळी मी अधिवेशनात होतो. पोलिसांकडे कोणी फिर्याद दिली नाही. पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करायला पाहिजे होता. पोलिसांचे लक्ष नेमके कोणाकडे आहे? याबाबत खुलासा मागणार आहे. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील पोलिसांच्या वेगळ्या कारभाराबाबत लक्षवेधी करणार आहे. नागरिकांना न्याय मिळत नसेल तर मी न्यायासाठी नागरीकांच्या मागे उभा राहील. "
> **— बाबाजी काळे,** आमदार, खेड आळंदी

## होळी एकतेचे रंग अधिक दृढ करेल - पंतप्रधान मोदी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** देशभरात शुक्रवारी रंगांचा उत्सव होळी अत्यंत उत्साहात साजरा केला गेला. एकमेकांना रंगात भिजवून आणि शुभेच्छा देऊन प्रत्येकजण या दिवसाचा आनंद घेताना दिसून आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही देशवासियांना एक्स हँडलवरुन शुभेच्छा दिल्या. आपल्या शुभेच्छा संदेशात ते म्हणाले, 'सर्वांना होळीच्या शुभेच्छा. उत्साहाने भरलेला हा सण आनंदाचा उत्सव उत्साह वाढवेल, एकतेचे रंग अधिक दृढ करेल.'

याशिवाय राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनीही देशवासियांना होळीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. आपल्या संदेशात त्या म्हणतात, 'रंगाचा सण असलेल्या » पान ७ वर

# मराठा शौर्य स्मारक उभारण्यासाठी शासन निर्णय जारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पानिपतच्या 'काला अंब' परिसरात मराठा शौर्य स्मारक उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असून या स्मारकाच्या माध्यमातून मराठा साम्राज्याच्या ऐतिहासिक पराक्रमाचे स्मरण आणि सन्मान करण्यात येणार आहे. पानिपतच्या तिस-या लढाईला २६४ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त पानिपत येथील 'काला अंब' परिसरात मराठा शौर्य दिनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पानिपतमध्ये मराठा युद्धवीरांचे मराठा शौर्य स्मारक उभारण्याचे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनाची पूर्तता करणारा हा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.



शासनाच्या निर्णयात म्हटले आहे की मराठा साम्राज्याने सतराव्या आणि अठराव्या शतकात भारताच्या विविध ठिकाणी आपले साम्राज्य निर्माण केले होते. अटकेपासून कटकपर्यंत मराठा साम्राज्याच्या पताका डौलाने फडकविल्या गेल्या होत्या. त्याच्या पराक्रमाची साक्ष देणारी बरीच स्थळे महाराष्ट्राच्या बाहेर अपरिचित आहेत. अशा स्थळासाठी आणि त्या दैदिप्यमान इतिहासाचे उदात्तीकरण आणि तो वारसा येणा-या पुढच्या पिढ्यांकडे कायम राहावा, त्या स्थळांची, त्या वारश्यांचे जतन, संवर्धन आणि विकास करण्याकरिता शासनाने इतर राज्यातील अशी स्थळे सुध्दा विकसित करण्याकरिता जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे.

यातूनच हरियाणातील पानिपत येथे सन १७६१ साली मराठा सेनेने अत्यंत धीरोदात्तपणे व शौर्याने अहमदशहा अब्दाली विरुध्द निकराची झुंज दिली. या युद्धात मराठा साम्राज्याची अपरिमित अशी हानी झाली मात्र, या लढाईने भारताच्या इतिहासात या महान बलिदानाचा पराभव सुध्दा संस्मरणीय ठरला. मराठ्यांनी एका महान उद्देशासाठी विदेशी आक्रमक अहमदशहा अब्दाली विरुध्द रणसंग्राम केला. या महान लढाईचा इतिहास आणि त्या वीरांचा सन्मान करणे याकरिता त्यांचे स्मारक निर्माण करण्याचे निश्चित करण्यात आले आहे, अशी माहिती देण्यात आली आहे. » पान ७ वर

## जयंत पाटलांनी घेतली शरद पवारांची भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बारामती :** गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात प्रदेशाध्यक्ष बदलण्याच्या चर्चा होत आहेत. यामुळे पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे नाराज असल्याचे सांगण्यात येत आहे. आझाद मैदानावरील भाषणात जयंत पाटील यांनी एक विधान केले होते, ज्यामुळे राजकीय वर्तुळात उलट सुलट चर्चा रंगू लागल्या आहेत. दरम्यान, जयंत पाटील यांनी बारामती येथे खासदार शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी जयंत पाटील आणि खासदार शरद पवार यांच्या बराच वेळ चर्चा झाल्याचे बोलले जात आहे. तसेच खासदार सुप्रिया » पान ७ वर

## 'रंग बरसे'...!

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**आनंदाचे रंग:** 'भोई प्रतिष्ठान' कडून आयोजित 'रंग बरसे' उपक्रमात केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री खा. मुरलीधर मोहोळ यांनी दिव्यांग आणि अनाथ मुलांसोबत धुळवड खेळण्याचा आनंद लूटला.

## खोक्याची रवानगी अखेर तुरुंगात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** अमानुष मारहाण प्रकरणात सतीश भोसले उर्फ खोक्याला बीडच्या शिरूर न्यायालयाने सात दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यामुळे शिरूर पोलीस ठाण्यातील कोठडीमध्ये सात दिवस खोक्याचा मुक्काम असणार आहे.

बॅटने अमानुष मारहाण आणि ढाकणे पिता पुत्रांना मारहाण प्रकरणात शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर सतीश भोसले शिरूर मधून फरार झाला होता. पुणे- अहिल्यानगर -संभाजीनगर - जबलपूर मार्गे प्रयागराज गाठले. बीड पोलिसांनी उत्तर प्रदेश पोलिसांच्या मदतीने त्याला अटक केली.. त्यानंतर प्रयागराज येथून विमानाने सकाळी संभाजीनगर येथे आणण्यात आले.


संभाजीनगर वरून शिरूर पोलीस ठाण्यात घेऊन आल्यानंतर आटकेची संपूर्ण » पान ७ वर

# राज्याचा धरणसाठा ५३.४१ टक्क्यांवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात तापमानाचा पारा चढला आहे. बहुतांश ठिकाणी ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक तापमानाची नोंद होत आहे. त्यामुळे आतापासूनच ग्रामीण भागात अनेक ठिकाणी पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. होळीदिवशी राज्यातील धरणांमध्ये सरासरी ५३.४१ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याचे जलसंपदा विभागाने सांगितले. मागील वर्षीच्या तुलनेत साधारणत: १० टक्के पाणीसाठा अधिक आहे.

गेल्यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस, अवकाळी पावसाचा फटका, प्रचंड तापमान आणि हवामानातल्या टोकाच्या बदलांनी अनेक धरण साठे शून्यावर गेले होते. मात्र, मागच्या पावसाळ्यात जोरदार पाऊस झाला



आणि धरणे तुडुंब भरली. परंतु यंदा फेब्रुवारीच्या सुरुवातीपासूनच उन्हाच्या झळा जाणवल्याने धरणांतील पाण्याची पातळी लवकर खालावण्यास सुरुवात झाली. त्यामुळे आता ब-याच धरणातील पाणीसाठी कमी झाल्याचे चित्र आहे. राज्यात धरणांतील पाणी पातळी खालावल्याने आता पाणीसाठा सरासरी » पान ७ वर

# वाल्मिक कराड प्रकरणी तृप्ती देसाईंना नोटीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणानंतर मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी अनेकांनी मोठे दावे केले आहेत. तपास यंत्रणा तपास करत असून भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक तृप्ती देसाई यांना बीड पोलिसांनी नोटीस पाठवली आहे. वाल्मिक कराड प्रकरणात तृप्ती देसाईंना बीड पोलिसांनी चौकशीसाठी बोलावल्याची माहिती समोर आली आहे.

वाल्मिक कराड प्रकरणात तृप्ती देसाई यांनी बीड जिल्ह्यातील २६ पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्यावर आरोप केले होते . बीड येथे कार्यरत असलेल्या आणि वाल्मिक कराड यांच्या निकटवर्ती असल्याचा दावा करत पोलिस कर्मचाऱ्यांची यादी जाहीर केली होती. सोशल मीडियावर या २६ पोलिस अधिकाऱ्यांची यादी जाहीर केली आहे. या यादीमध्ये हवालदारापासून एपीआय, डीवायएसपी, अतिरीक्त पोलिस अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या संदर्भातच तृप्ती देसाईंना नोटीस पाठवण्यात आली आहे. बीड पोलीस अधीक्षक कार्यालयात हजर रहा असे म्हणत बीड पोलिसांनी तृप्ती देसाईंना पुण्यात नोटीस पाठवली आहे.

तृप्ती देसाई यांनी बीड पोलिसांवर केलेल्या आरोपानंतर पुरावे घेऊन येण्यासाठी पोलिसांनी नोटीस पाठवली आहे. » पान ७ वर

# 'एक पोळी होळीची सामाजिक बांधिलकीची'

सामाजिक



ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या संकल्पनेतून कोथरुडमध्ये उपक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दुष्ट आणि वाईट प्रवृत्ती नष्ट करणारा म्हणून होळीचा सण साजरा केला जातो. या दिवशी प्रत्येक घरात पुरणाच्या पोळ्यांचा नैवेद्य केला जातो. होलिका दहन झाल्यानंतर प्रत्येक घरातून एक पोळी होळीला अर्पण केली जाते. होळीच्या अग्नीमध्ये दुष्ट प्रवृत्तीचा नाश व्हावा' हा त्यामागचा उद्देश असतो.

हे अन्न जळून खाक होण्याऐवजी ते गरीब आणि अर्धपोटी झोपणाऱ्यांच्या मुखात जावे या उद्देशाने नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी पुढाकार घेतला असून, 'एक पोळी होळीची, सामाजिक बांधिलकी'ची हा उपक्रम हाती घेतला होता. या उपक्रमाच्या माध्यमातून २० हजार पोळ्यांचे संकलन झाले असून, या सर्व पोळ्या गरीब विद्यार्थ्यांना देण्यात आल्या.



कोथरुड हे विद्येचे माहेरघर असल्याने, देशभरातून लाखो विद्यार्थी हे इथे शिक्षणासाठी येत असतात. यामधील असंख्य विद्यार्थी गरीब आणि अल्पभूधारक कुटुंबातील असल्याने, त्यांना अनंत अडचणींवर मात करत आपले शिक्षण पूर्ण करावे लागते.

यामध्ये असंख्य विद्यार्थी हे अर्धपोटीच शिक्षण घेत असल्याने, नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी त्यांना पोषक आहाराचे डबे सुरु केले आहेत. होळीच्या सणाचा आनंद देखील या विद्यार्थ्यांना मिळावा, यासाठी नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी एक पोळी होळीची समाजिक बांधिलकीची हा उपक्रम हाती घेत, कोथरुडमधील प्रत्येक कुटुंबांना गरीब विद्यार्थ्यांसाठी पोळी दान करण्याचे आवाहन केले होते.

ना. पाटील यांच्या आवाहनानंतर २० हजार पोळ्यांचे संकलन झाले. या सर्व पोळ्या गरीब विद्यार्थ्यांना देऊन, त्यांचा हा आनंद द्विगुणित करण्यात आला. यावेळी भाजपा कोथरुड दक्षिण मंडल अध्यक्ष डॉ. संदीप बुटाला यांच्या हस्ते या पोळ्यांचे वितरण केले गेले.

#रा



## शनिवार-रविवारी रंगणार 'बांसुरी परंपरा महोत्सव'

**पुणे :** जगविख्यात बासरीवादक पद्मविभूषण पंडित हरिप्रसाद चौरसिया यांचे ज्येष्ठ शिष्य आणि प्रसिद्ध बासरीवादक पंडित रूपक कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून 'बांसुरी परंपरा' या अनोख्या सांगितीक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

पंडित रूपक कुलकर्णी म्युझिक फाऊंडेशन आणि ब्लिसफुल विंड्स फाऊंडेशन आयोजित सांगितीक महोत्सव शनिवार, दि. १५ आणि रविवार, दि.१६ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता द पुना वेस्टर्न क्लब, भूगाव, पुणे येथे होणार आहे. महोत्सवाचे यंदाचे दुसरे वर्ष असून कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे, अशी माहिती पंडित रूपक कुलकर्णी म्युझिक फाऊंडेशनचे पंडित रूपक कुलकर्णी, ब्लिसफुल विंड्स फाऊंडेशनचे मृगेंद्र मोहाडकर यांनी कळविली आहे. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी (दि. १५) विदुषी मंजुषा पाटील यांचे शिष्य तनिष्क अरोरा यांचे गायन होणार असून त्यांना दिपिन दास (तबला), आकाश नाईक (संवादिनी) साथसंगत करणार आहेत. त्यानंतर मृगेंद्र मोहाडकर आणि जयकिशन हिंगु यांच्या बासरीवादनाची जुगलबंदी रंगणार असून त्यांना सपन अंजारिया (तबला) साथ करणार आहेत.



## अॅड. अवलोकिता माने यांना स्वयंसिद्धा राष्ट्रीय पुरस्कार

**पुणे :** फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया पुणे शाखेच्या अध्यक्षा अॅड. अवलोकिता माने यांना नाशिक येथील दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या वतीने प्रतिष्ठित असा 'स्वयंसिद्धा राष्ट्रीय पुरस्कार' नुकताच प्रदान करण्यात आला.

अॅड. अवलोकिता माने कायदेतज्ज्ञ व कलाकार असून, 'निवांत अंधमुक्त' संस्थेसाठी, कॅन्सरग्रस्त, अपंग व विशेष मुलांसाठी, पर्यावरण, स्त्रियांचे लैंगिक आरोग्य व हक्क, सर्वांसाठी कायद्याच्या चौकटीतील समुपदेशन, दिव्यांग महिलांसाठी, तसेच रांगोळी व साक्षरतेच्या संदेशातून सामाजिक प्रबोधन करण्याचे काम त्या करीत आहेत.

अॅड. माने २०१८ पासून फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया पुणे शाखेच्या अध्यक्षा आहेत. त्यांच्या क्लिनिकमध्ये माफक दरात गरजूंसाठी वैद्यकीय सेवा पुरवली जाते. या कालावधीत महिलांसाठी सर्व प्रकारचे सहाय्य, तसेच एचआयव्ही रुग्णांचे आरोग्य व अर्थार्जन, ट्रान्सजेंडर समुदायाच्या मूलभूत हक्कांसाठी त्या कार्यरत आहेत.

## संपदा (आयपी) यात्रा १९, २० मार्चला पुण्यात

**पुणे :** केंद्र सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय (एमएसएमई) आणि एआयसी पिनॅकल आंत्रप्रेन्युअरशीप फोरम यांच्यातर्फे दोन दिवसीय दुसऱ्या राष्ट्रीय बौद्धिक संपदा (इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी- आयपी राईट्स) यात्रेचे आयोजन १९ व २० मार्च २०२५ रोजी हॉटेल लेमन ट्री प्रीमिअर, पुणे येथे करण्यात आल्याची माहिती 'एआयसी पिनॅकल'चे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील धाडीवाल यांनी दिली आहे.

भारत सरकारने बौद्धिक संपदा कायद्याबाबत जनजागृतीसाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. यामध्ये पेटंट, ट्रेडमार्क, कॉपीराईट्स, डिझाईन आणि जीआय आदी बौद्धिक संपदेच्या हक्कांबाबत जागृती, सर्जनशील उपक्रमांना प्रोत्साहन, कल्पना आणि इनोव्हेशनचे संरक्षण, प्रगत तंत्रज्ञान अंतर्भूत करून एमएसएमई सक्षम करण्यावर भर दिला जात आहे. सर्वच क्षेत्रातील उद्योगांच्या बौद्धिक संपदेची नोंद करण्यास सहकार्य करण्याचे ध्येय या उपक्रमाचे आहे. एमएसएमईना देशभरातील आयपी फॅसिलिटेशन सेंटरशी जोडण्याचे काम होत असून, इनोव्हेटर्सना क्रिएटिव्ह कामाचे प्रदर्शन करण्यास प्रोत्साहन, मार्गदर्शन, निधी आणि सहाय्य पुरवले जात आहे. इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी फॅसिलिटेशन सेंटरमार्फत (आयपीएफसी) मोफत आयपी सेवा पुरवल्या जात असून, एआयसी पिनॅकल हे अधिकृत 'आयपीएफसी' केंद्र आहे.

## धुलीवंदनाला पोलीसांचा 'फटाका'..!



**पुणे** फटाक्यांसारखा आवाज काढणारे कर्कश सायलेन्सरचा वापर करणाऱ्या बुलेटचालकांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. वाहतूक पोलिसांनी शहराच्या वेगवेगळ्या भागात बुलेटचालकांविरुद्ध कारवाई करुन फटाक्यासारखे आवाज काढणारे सायलेन्सर जप्त केले. येरवड्यातील वाहतूक शाखेच्या कार्यालयात जप्त केलेल्या एक हजार ७६८ सायलेन्सरवर बुलडोझर चालविण्यात आला.

## कर्णकर्कश: सायलेन्सरवर 'बुलडोझर'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** फटाक्यांसारखा आवाज काढणारे कर्कश सायलेन्सरचा वापर करणाऱ्या बुलेटचालकांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. वाहतूक पोलिसांनी शहराच्या वेगवेगळ्या भागात बुलेटचालकांविरुद्ध कारवाई करुन फटाक्यासारखे आवाज काढणारे सायलेन्सर जप्त केले. येरवड्यातील वाहतूक शाखेच्या कार्यालयात जप्त केलेल्या एक हजार ७६८ सायलेन्सरवर बुलडोझर चालविण्यात आला. पोलिसांच्या कारवाईचे नागरिकांनी कौतूक केले आहे.

रात्री अपरात्री शहर,तसेच उपनगरात भरधाव वेगाने बुलेटचालक तरूण जातात. बूलेटच्या सायलेन्सरमध्ये फेरफार (मॉडिफाय) करण्यात आल्याने त्यातून फटाक्यासारखा आवाज निघतो. फटाक्यासारख्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून पोलिसंनी शहरातील वेगवेगळ्या भागात बुलेटचालकांविरुद्ध कारवाई करुन त्यांचे सायलेन्सर जप्त केले होते. कर्कश सायलेन्सर नष्ट करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी दिले होते.

# 'चलती' का नाम 'टँकर'..!

### पाऊस मुसळधार, तरीही टँकर धुव्वाधार: प्रशासनाचा 'तुघलकी' कारभार; टँकरची मागणी तब्बल १ लाख फेऱ्यांनी वाढली

काही भागात महापालिकेने खासगी टँकरसाठी ११०० रूपयांचा दर निश्चित केला आहे. मात्र, सोसायटी दररोज १० पेक्षा अधिक टँकर घेणार असेल आणि वर्षभराचा करार करणार असेल तर हेच टँकरचालक ९५० रुपये ते १ हजार रुपयांना टँकर देत आहेत. त्यामुळे, पालिकेचेच पाणी हे टँकर चालक सोसायटीला आणून देतात, तर तेच पाणी सोसायटीला महापालिका का उपलब्ध करून देऊ शकत नाही असा सवाल उपस्थित केला जात आहे. या सगळ्या प्रकारात वर्षभराचे पाणी घ्यावे लागत असल्याने अनेक सोसायटयांना महिन्याला लाखो रूपये पाण्यासाठी मोजावे लागत आहेत.

> शहराची वाढलेली लोकसंख्या आणि विस्ताराला पुरेसे पाणी देण्यासाठी महापालिकेकडून टप्प्या टप्प्याने पाणी पुरवठा योजना राबविल्या जात आहेत. तर, शहराला वाढीव पाण्याचीही गरज आहे. त्यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. शहरात पाण्याची मागणी वाढली असल्याने काही समाविष्ट गावे आणि काही भागात टँकरच्या फेऱ्यांची संख्या वाढलेली आहे.
> 
> **-नंदकिशोर जगताप,** प्रमुख पाणीपुरवठा विभाग, पुणे मनपा




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या काही वर्षांच्या कालावधीत शहर आणि परिसरावर निसर्गराजाने चांगलीच ' कृपादृष्टी' केली आहे; त्यामुळे शहरात विशेषत: धरणसाखळीत मुबलक पाऊस कोसळत आहे. विशेष म्हणजे गेल्या पावसाळयात तर धरणक्षेत्राच्या परिसरात पावसाने अक्षरश: थैमान घातल्याने तब्बल सोळा ते सतरा वेळा धरणातून पाणी सोडण्याची वेळ जलसंपदा विभागावर आली होती, त्यातही सध्या या धरणक्षेत्रात सध्या मुबलक पाणीसाठा आहे. मात्र; हे वास्तव असतानाही एक दाहक अशी बाब पुन्हा एकदा चव्हाटयावर आली आहे. शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी चक्क टँकरचाच आधार घ्यावा लागत असून गेल्या तीन वर्षांच्या कालावधीत शहरात टँकरची मागणी तब्बल १ लाख फेऱ्यांनी वाढली आहे, त्यामुळे पुणेकरांना हक्काच्या पाण्यासाठी सध्याच्या परिस्थितीही मुकाबला करावा लागत आहे. ही परिस्थिती निश्चितच चिंताजनक अशीच आहे.

पुणे: दरवर्षी शहरातील सोसायटी मध्ये पाण्याची मागणी वाढतच असून, हक्काच्या पाण्यासाठी आणखी किती दिवस वाट पहावी लागणार, असा सवाल आता नागरिक करत आहेत. शहरातील अनेक सोसायटयांना महापालिकेचे पुरेसे पाणी येत नसल्याने दररोज १० ते १२ टँकर पाणी घ्यावे लागत आहे. या टँकरचे दर महापालिकेने निश्चित करून दिले असले तरी, अनेक टॅकरचालकांकडून पिण्याच्या पाण्यासाठी दोन ते अडीच हजार रुपयांची आकरणी केली जात असल्याचे शहरभर चित्र आहे. लाखो रुपये खर्चून घर खरेदी केल्यानंतर आणि त्यावर पुन्हा हजारो रुपयांचा मिळकतकर भरुनही शहरातील लाखो पुणेकरांना पाण्यासाठी टँकरचाच आधार घ्यावा लागत आहे.

२०१७ नंतर महापालिकेत नव्याने ३४ गावांचा समावेश करण्यात आला आहे. या गावांमध्ये ग्रामपंचायतीकडून पाणी पुरवठा केला जात होता. मात्र, ही गावे लवकरच महापालिकेत समाविष्ट होणार असल्याचे सांगत शहराच्या उपनगरांच्या हद्दीजवळ मोठया सोसायटया उभ्या राहिल्या. मात्र, या ठिकाणी महापालिकेच्या जलवाहिन्या पोहचल्या असल्या तरी, त्यांना येणारे पाणी अतिशय कमी आहे.

#### मागील तीन वर्षातील टँकर फेऱ्या

- एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ – ३ लाख ५४ हजार २५४ फेऱ्या
- एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ – ४ लाख ३४८ फेऱ्या
- एप्रिल २०२५ ते फेब्रुवारी २०२५ – ४ लाख ४० हजार ३४० फेऱ्या

## संवेदनशील बस थांब्यांसाठी एसटी घेणार पोलीसांची मदत



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आता पुणे शहर आणि ग्रामीण भागातील संवेदनशील बस थांब्यांसाठी पोलीस प्रशासनाची मदत घेतली जाणार आहे. यासंबंधीचा पत्रव्यवहार एसटी प्रशासनाने पोलिस आयुक्तांना केला असल्याची माहिती आहे.स्वारगेट बलात्कार प्रकरणानंतर एसटी प्रशासन अलर्ट मोडवर आले आहे. या धक्कादायक घटनेनंतर स्वारगेट बसस्थानकातील सुरक्षेचा अभाव समोर आला होता. त्यामुळे आता प्रशासनाकडून विविध उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला आहे.

पुणे, पिंपरी चिंचवड शहरासह ग्रामीण भागातील १४ आगारांतर्गत असणाऱ्या ४२ बस स्थानकांच्या हद्दीतील १०० बसथांबे संवेदनशील थांबे म्हणून निश्चित करण्यात आले आहेत. त्या ठिकाणी प्रतिबंधनात्मक उपायोजना करण्यासाठी पोलिस आयुक्तांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. चांदणी चौक, कात्रज, रावेत, चांदणी चौकातील बाह्यवळण ओलांडल्यानंतर महामार्गावरील हिंजवडी फाटयाजवळ मुंबईच्या दिशेने जाणारे आयटी कंपन्यातील प्रवासी कायम असतात. हे प्रवासी रात्री अपरात्री महामार्गालगत असणाऱ्या एंसटी थांब्यावर बस थांबून प्रवास करत असतात. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षतेसाठी एसटी प्रशासनाने हा निर्णय घेतला असल्याचे सांगण्यात आले आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात नोकरी व्यवसाय आणि शिक्षणासाठी मोठ्या संख्येने परगावाहून अनेकजण येत असतात. त्यामुळे मोठ्या संख्येने प्रवासी एसटीने प्रवास करत असतात. त्यानुसार आता महामार्गावरील थांब्यांवर प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी संबंधित ठिकाणी पोलिसांची गस्त वाढविण्यासंदर्भात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येणार आहे.

## सुंदरबाई मराठे विद्यालयात पर्यावरणपूरक होळी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खराडी येथील सुंदरबाई मराठे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दरवर्षी प्रमाणे पर्यावरणपूरक पद्धतीने होळी साजरी करत समाजासमोर एक आदर्श निर्माण केला. विद्यार्थ्यांनी स्वतः विविध फुलांपासून नैसर्गिक रंग तयार करून शाळेत आणून त्याचा वापर करत आनंदाने होळी खेळली.

कृत्रिम रंगाचे मानवी डोळे,त्वचा इत्यादी महत्वाच्या अवयवावर काय परिणाम होतो या बाबतची माहिती मुलांना देऊन होळी का साजरी करतात त्याचे महत्व या बाबत सांस्कृतिक विभाग प्रमुख विद्या कव्हेकर यांनी माहिती सांगितली,या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणाचा संदेश मिळाला, तसेच रासायनिक रंगांच्या दुष्परिणामांबाबत जागरूकता निर्माण झाली. शाळेतील सर्वच शिक्षकांनी या मध्ये सहभाग घेतला .संस्थेचे अध्यक्ष रामभाऊ मोझे,उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मोझे, अलका पाटील व विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय सोमवंशी यांनी सर्व मुलांना आणि त्यांच्या पालकांना होळी व धुळवडीच्या शुभेच्छा देऊन कौतुक केले.

विद्यार्थ्यांच्या या आगळ्या-वेगळ्या होळी साजरी करण्याच्या उपक्रमाचे पालक व स्थानिक नागरिकांनीही कौतुक केले.



**पुणे** खराडी येथील सुंदरबाई मराठे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दरवर्षी प्रमाणे पर्यावरणपूरक पद्धतीने होळी साजरी करत समाजासमोर एक आदर्श निर्माण केला. विद्यार्थ्यांनी स्वतः विविध फुलांपासून नैसर्गिक रंग तयार करून शाळेत आणून त्याचा वापर करत आनंदाने होळी खेळली.



## 'दगडूशेठ' गणपतीला २ हजार किलो द्राक्षांचा नैवेद्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** काळ्या आणि हिरव्या द्राक्षांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरातील गाभारा व सभामंडप सजवून द्राक्ष महोत्सव करण्यात आला. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टतर्फे आयोजित महोत्सवात नाशिक येथील सह्याद्री फार्म कंपनीच्या शेतक-यांनी पिकवलेल्या निर्यातक्षम व रसायनविरहित २ हजार किलो द्राक्षांची आरास करण्यात आली.


यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, उपाध्यक्ष डॉ. रामचंद्र उर्फ बाळासाहेब परांजपे, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस हेमंत रासने, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सहचिटणीस अमोल केदारी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, सह्याद्री फार्म कंपनीचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे यांसह सह्याद्री फार्म चे पदाधिकारी देखील उपस्थित होते. ही द्राक्षे नंतर भाविक, अनाथाश्रम, पिताश्री वृद्धाश्रम, ससून रुग्णालयात प्रसाद म्हणून दिली जाणार आहेत. दगडूशेठ गणपती मंदिराच्या गाभा-यात संपूर्ण सभामंडपात केलेली ही आकर्षक आरास पाहण्याकरता भाविकांनी सकाळपासूनच गर्दी केली होती.

द्राक्षाच्या हंगामात अशा पद्धतीची आरास मंदिरात गेल्या काही वर्षांपासून केली जात आहे. आज सह्याद्री फार्म ला २२,००० शेतकरी जोडले गेले आहेत. भारतातील सर्वात मोठी द्राक्ष निर्यात करणारी कंपनी म्हणून म्हणून सह्याद्रीची ओळख आहे. द्राक्षाच्या नवीन पेटंटेड वाणांचे उत्पादन सह्याद्री फार्म्स करीत आहे.

> प्राचीन भारतीय आयुर्वेदात द्राक्षांचे आरोग्याच्या दृष्टीने महत्त्व मोठे आहे. द्राक्षे हृदयविकाराचा धोका कमी करतात. त्याच्या सेवनाने मेंदूवर वयाचा कमी परिणाम होतो. द्राक्षांमध्ये असलेल्या फायबरमुळे आतड्याची हालचाल सुलभ होते. तसेच शरीरातील रक्ताची कमतरता दूर होते. हे हिमोग्लोबिन पातळी वाढवते. हिरवी द्राक्षे हिमोग्लोबिन वाढवतात. त्यामुळे द्राक्षांचे सेवन करणे हे आरोग्यदृष्टया उपयुक्त असल्याने अनाथाश्रम, वृद्धाश्रम व ससून रुग्णालयात द्राक्षांचे प्रसादरुपी वाटप करण्यात येणार आहे.
> 
> **— सुनील रासने,** अध्यक्ष, श्रीमंत दगडूशेठ गणपती मंडळ ट्रस्ट

## रायसोनी कॉलेजच्या साक्षी कुटे हिला उपविजेतेपद

**पुणे :** जी एच रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, पुणे येथील इलेक्ट्रॉनिक्स आणि



टेलिकम्युनिकेशन विभागाच्या बी. टेक तृतीय वर्षाची विद्यार्थिनी साक्षी कुटे हिने हैद्राबाद येथील बीव्हीआरआयटी हैदराबाद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनिअर्स इंडिया (एसएई इंडिया) द्वारे आयोजित राष्ट्रीय पातळीवरील इलेक्ट्रिक्ल बाईक ई-बाजा स्पर्धेत महिला सहनशक्ती विशेष कार्यक्रमांमध्ये उपविजेतेपद पटावले. तसेच याच स्पर्धेत रायसोनी कॉलेजच्या टीम अभ्युदयने देशपातळीवरील ३३वी रँक देखील मिळवली आहे.

एसएई इंडिया ने ही स्पर्धा अनेक टप्प्यांमध्ये भरवली होती. यात डिझाइन व्हॅलिडेशन, डायनॅमिक टेस्टिंग आणि एंड्युरन्स राउंड्स यांचा समावेश आहे. विद्यार्थी वेदांत देशमुख हा रायसोनी टीम अभ्युदयचा कर्णधार होता, डॉ. स्वप्नील महाजन आणि डॉ. आशा शेंडगे यांनी ई-बाजा स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



## ‘ नाम’ ने घेतली आर्वीच्या पाणीटंचाईची दखल

**खडकवासला :** आर्वी येथील नागरिकांना देखील टँकरने पाणी घेऊन गरज भागवावी लागत आहे. आर्वी चे सरपंच सागर नवघणे, चेतन जाधव आणि अरुण घोगरे यांनी नाम संस्थेचे नाना पाटेकर यांचेशी संपर्क साधून मदतीची अपेक्षा व्यक्त केली. नानांनी त्यांचे मागणीला सकारात्मक प्रतिसाद देऊन तातडीने लँडमार्क लिमिटेड कंपनीचे सी एस आर फंडातून विहीर मंजुर केली. या विहिरीचे भूमिपूजन महिलांचे हस्ते करून काम सुरु करण्यात आले. याप्रसंगी माजी पंचायत समिती सदस्य नितीन वाघ तालुका समन्वयक अरुण घोगरे,सरपंच सागर नवघणे, माजी सरपंच चेतन जाधव, उपसरपंच सपनाकोंडे, ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग सणस, माजी चेअरमन बाळासाहेब घाटे, संचालक सुरेश तावरे, नाम फॉउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश थोरात, निलेश जावळकर, अरुण गिरी, मार्गदर्शक शिवाजी घाटे, दिलीप नवघणे, बाबाजी घोगरे, रामदास घोगरे, संतोष भोईटे, अनिल घोगरे, किरण नवघणे, माऊली नवघणे, दत्तात्रेय नवघणे, पांडुरंग नवघणे दिनकर नवघणे, शंकर नवघणे, प्रवीण शिंदे, दत्तात्रय शिंदे, प्रीतम नवघणे, किरण यादव, कविता भोईटे, सीमाघोगरे, धनश्री नवघणे आदी उपस्थित होते.

## मंत्री दत्ता भरणे यांनी लुटला रंगपंचमीचा आनंद

**पुणे :** आज धुलीवंदन निमित्त तळजाई टेकडी येथे



क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे, आमदार भीमराव तापकीर यांनी सहकाऱ्यांसह रंगांच्या सणाचा आनंद घेतला. यावेळी खेळताना उपस्थितांनी कोरड्या रंगांचा वापर करण्याचे आणि पाण्याचा अपव्यय टाळण्याचे महत्त्व सांगितले. तसेच, नैसर्गिक रंगांचा वापर करण्याचे आवाहन मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.

यावेळी उपस्थित सर्वांनी एकत्र येऊन धुळवड खेळला आणि या सणाच्या आनंदात रंगबेरंगी वातावरण निर्माण केले. 'आनंदाने होळी खेळा, पण पर्यावरणाचा विचार करा' असे आवाहन करत सर्वांना धुलीवंदनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी स्थानिक सहकार्याच्या मदतीने एकत्रित येत सण साजरा करण्यात आला आणि सणाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाची महत्त्वाची भूमिका ठरली.

# फसवणुकीचे साम्राज्य

## ‘दान’ दिलेल्या रुग्णवाहिकेची परस्पर विक्री; येरवड्यातील प्रतिष्ठानचा ‘प्रताप’

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

**फुकटात रूग्णवाहिका मिळविण्यासाठी येरवडा येथील एका प्रतिष्ठानने खोट्या आणि बनावट कागदपत्रांचा वापर केल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे, विशेष म्हणजे त्यासाठी चक्क एका माजी केंद्रीय मंत्र्यांच्याच संस्थेला गंडा घालण्यात आला आहे. त्यासाठी धर्मादाय आयुक्तालयाचे सर्व नियम बासनात गुंडाळून या रुग्णवाहिकेची तब्बल २३ लाख रूपयांना परस्पर विक्री केल्याची बाब उघडकीस आली असून त्याद्वारे या प्रतिष्ठानने फसवणूकीचे ‘ साम्राज्य’ उभे केले आहे.**

### असा घातला प्रतिष्ठानने गंडा...!

- तीन वर्षांचा ताळेबंद नसतानाही घेतला लाभ
- दान मिळालेल्या रूग्णवाहिकेची परस्पर विक्री
- रूग्णाच्या नातेवाईकांकडून उकळली अव्वाच्या सव्वा रक्कम
- रूग्ण आणि नातेवाईकांना सवलतच नाही
- स्वत:चा ‘ सीएसआर’ वाचविण्यासाठी कंपनीचा खटाटोप



**पुणे :** यासंदर्भात बोभाटा झाल्यानंतर या संस्थेने या प्रकाराची गंभीर दखल घेतली आहे; त्यानुसार माजी केंद्रिय मंत्र्यांच्या या संस्थेच्या सचिवांनी थेट प्रतिष्ठानशी पत्रव्यवहार करुन तपासणीसाठी संबधित रूग्णवाहिका आणि पडताळणीसाठी कागदपत्रे सादर करण्याचा विनंती वजा ‘ इशारा’ दिला आहे. त्याशिवाय कायदेशीर कारवाई करण्याचे स्पष्ट संकेतही संस्थेने दिले आहेत.मात्र; या रूग्णवाहिकेची परस्पर विक्री झाली असल्याने या सामाजिक संस्थेला आता ‘ वन’ वास भोगावा लागण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

येरवडा येथील महाराष्ट्र हौसिंग बोर्डात कार्यरत असलेल्या या प्रतिष्ठानने अल्पावधीतच या भागात आपले ‘ साम्राज्य’ निर्माण केले आहे, विशेष म्हणजे या प्रतिष्ठानचे कार्यालय थाटण्यासाठी प्रतिष्ठानचा सर्वेसर्वा असलेल्या या नेत्याने येथील जागा बळकावली असल्याची चर्चा येथील नागरिकांमध्ये आहे. त्याला लवकरात लवकर आणि विनासायास नागरिकांपर्यंत पोचायचे असल्याने त्याने जेमतेम एक ते दीड वर्षांपूर्वी या प्रतिष्ठानची स्थापना केली आहे, त्यामुळे धर्मादाय कार्यालयाच्या नियमानुसार कोणत्याही प्रतिष्ठानला किमान तीन वर्षे लाभ घेता येत नाही अथवा कोणाकडून देणगीही घेता येत नाही.

तरीही या प्रतिष्ठानच्या चालकाने एका कंपनीच्या माध्यमातून पुण्यातील एका माजी केंद्रिय मंत्र्याच्या संस्थेशी संपर्क साधला होता; त्यानुसार प्रतिष्ठानने या संस्थेकडे अत्याधुनिक रूग्णवाहिकेची मागणी केली होती. मात्र; प्रतिष्ठानला तीन वर्षांचा कालावधी पूर्ण न झाल्याने आणि त्यांच्याकडे ताळेबंदासह अन्य कोणतीही कागदपत्रे नसल्याने संस्थेने प्रतिष्ठानला रूग्णवाहिका देण्यास स्पष्ट शब्दात नकार दिला होता.

रूग्णवाहिका मिळणार नसल्याचे लक्षात येताच प्रतिष्ठानच्या संचालकाने या कंपनीशी संपर्क साधला होता, त्यानुसार या प्रतिष्ठानचे कंपनीशी लागेबांधे असल्याने त्यांची शिष्टाई फळाला आली होती. अखेर १५ जून २०२३ मध्ये या प्रतिष्ठानला रूग्णवाहिका ‘ दान’ देण्यात आली होती, त्यानुसार या संस्थेने प्रतिष्ठानशी सांमज्यस करार करुन काही अटी आणि नियम त्यांच्यावर लादले होते. या अटींचा नियमभंग केल्यास कारवाईचा इशाराही देण्यात आला होता.

मात्र; या प्रतिष्ठानने सर्व नियम बासनात गुंडाळून या रूग्णवाहिकेची परस्पर २३ लाख रूपयांना विक्री केली आहे. ही बाब समजताच या संस्थेने त्याची गंभीर दखल घेतली आहे, त्यानुसार संस्थेने संबधित प्रतिष्ठानशी थेट पत्रव्यवहार करुन ही रूग्णवाहिका तपासणीसाठी आणि कागदपत्रे पडताळणीसाठी सादर करण्याचे विनंतीवजा आदेश दिले आहेत. त्यामुळे या प्रतिष्ठानचे धाबे दणाणले असून हा पुरावा सादर करण्यासाठी ते टाळाटाळ करत असल्याचे संस्थेचे म्हणणे आहे. येत्या आठवड्यात त्यांनी त्याची पूर्तता न केल्यास प्रतिष्ठानला कोर्टात खेचण्याचा इशारा संस्थेने दिला आहे.

# प्रार्थना स्थळांवरील भोंग्याचे सर्वेक्षण

## पोलिसांचा निर्णय माहिती संकलनाचे काम सुरु

राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी राज्य शासनाने आता कडक धोरण अवलंबण्यास सुरूवात केली आहे; त्यासाठी सर्व शहरातील प्रार्थनास्थळावर असलेल्या भोंग्याची माहिती घेण्याचे आदेश राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व शहराच्या पोलीस प्रमुखांना दिले आहेत. त्यांच्या आदेशानुसार शहर पोलीसांनी त्याची कडक अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी यासंदर्भात सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांची बैठक घेऊन ही माहिती संकलित करण्याच्या सूचना केल्या आहेत; येत्या काही दिवसातच याचे नियोजन पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यातूनच पोलीसांना ही माहिती संकलित करण्यास मदत होणार आहे



> शहरातील ‘ईएसआर’ (उन्नत पाण्याच्या टाक्या) आणि ‘0’ यासंदर्भात सर्व पोलीस ठाण्याच्या प्रमुखांना सूचना देण्यात आल्या आहेत, त्यानुसार ही माहिती संकलित करण्याचे काम सर्व पोलीस ठाण्यांच्या वतीने सुरू करण्यात आले आहे. ही माहिती संकलित झाल्यानंतर त्यांच्यासाठी काय नियमावली असेल यावर धोरण ठरविण्यात येणार आहे. **-अमितेश कुमार,** पोलीस आयुक्त, पुणे शहर



### अशी आहे शहरातील प्रार्थनास्थळांची परिस्थिती

- विविध प्रार्थनास्थळावरील भोंग्यांची संख्या : १८३०
- मंदिरे: १०००
- चर्च: १३०
- बौद्ध विहार: २००
- दर्गा: १५०
- मदरसे: ५०



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** सर्वोच्च न्यायालयाने सर्वधर्मीय प्रार्थनास्थळांवरील भोंग्याच्या आवाजाबाबत निर्देश दिले आहेत. यापार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त अमितेश कुमार शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांची बैठक घेऊन सर्वधर्मीय प्रार्थनास्थळांवरील अधिकृत, तसेच बेकायदा भोंग्यांची माहिती संकलित करण्याचे आदेश दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने धार्मिक स्थळांवर असलेल्या भोंग्याच्या आवाज मर्यादित ठेवण्याचे आदेश दिले आहेत. भोंग्यामुळे ध्वनीप्रदुषण होत असल्याचे निदर्शनास आले. त्याअनुषंगाने राज्य शासनाने याबाबत उपाययोजना कराव्यात, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले. या आदेशाची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधीमंडळात दिली. त्यानंतर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांची बैठक घेतली. विविध मंदिरे, प्रार्थनास्थळांवर बसविलेले अधिकृत, तसेच बेकायदा भोंग्यांची माहिती संकलित करून याबाबत उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत. राज्य शासनाने भोंग्यांबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या नियमांचे पालन करावे. दिवसा ५५ डिसिबल, सायंकाळी ४५ डेसिबल आवाजाची मर्यादा निश्चित करण्यत आली आहे. रात्री दहा ते सकाळी सहा यावेळेत भोंगे बंद ठेवण्यात यावेत, तसेच आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.

## लाच घेणारे ‘झेडपी’चे तीन अधिकारी जेरबंद

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** बांधकाम ठेकेदाराकडून सादर केलेले देयक मंजूरी, तसेच कामाची पाहणी करून अहवाल देण्यासाठी अडीच लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी जिल्हा परिषदेतील बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंत्यासह उपअभियंता, कनिष्ठ अभियंता महिलेविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) गुन्हा दाखल केला. तडजोडीत एक लाख ४२ हजारांची लाच घेताना एसीबीच्या पथकाने दोघांना पकडले. याप्रकरणी कार्यकारी अभियंत्यासह तिघांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याविरुद्ध बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील (दक्षिण विभाग) कार्यकारी अभियंता बाबुराव कृष्णा पवार (वय ५७), दौंड-शिरुर उपविभागातील उपअभियंता दत्तात्रेय भगवानराव पठारे (वय ५५), कनिष्ठ अभियंता अंजली प्रमोद बगाडे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. याबाबत एका बांधकाम ठेकेदाराने बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार ३७ वर्षीय तरुण शासकीय ठेकेदार आहेत.

दौंड तालुक्यातील खुटबाव रस्ता ते गलांडवाडी पाणंद शिव रस्ता, गलांडवाडी मंदिर ते ज्ञानदेव कदम घर रस्ता या कामाची निविदा सप्टेंबर २०२४ मध्ये काढण्यात आली होती. तक्रारदार ठेकेदाराला या रस्त्याचे काम मिळाले होते. दोन्ही कामांचे देयक ४० लाख रुपये होते. संबंधित काम पूर्ण केल्यानंतर ३ मार्च रोजी कनिष्ठ अभियंता बगाडे यांनी केलेल्या कामाची पाहणी जिल्हा परिषदेतील समिती (एस.क्यू.एम कमिटी) प्रत्यक्ष करेल. त्यानंतर समितीकडून पाहणी अहवाल सादर करण्यात येईल.

त्यानंतर पाहणी अहवाल, देयक मंजुरीची फाईल तयार करण्यात येईल. त्यासाठी ८० हजार रुपये द्यावे लागतील, असे कनिष्ठ अभियंता बगाडे यांनी ठेकेदाराला सांगितले. त्यानंतर त्यांनी उपअभियंता पठारे, तसेच कार्यकारी अभियंता पवार यांची भेट घेतली. त्यांनी या कामाचे देयक मंजूरी, तसेच प्रत्यक्ष पाहणी अहवाल देण्यासाठी ८० हजार रुपये लाच द्यावी लागेल, असे सांगितले. त्यानंतर त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली. ११ मार्च रोजी पंचासमक्ष तक्रारीची पडताळणी करण्यात आली.

तिघांनी लाच मागितल्याचे निष्पन्न झाल्यानंतर गुरुवारी (१३ मार्च) जिल्हा परिषदेच्या आवारात सापळा लावण्यात आला. पवार आणि पठारे यांना लाच घेताना पकडण्यात आले.

## ज्ञान, शक्ती,भक्तीच्या त्रिवेणी संगमातून स्वराज्यनिर्मिती

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** प्रभू श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्या विचारांचा संगम जर कलियुगात पाहायचा असेल तर तो छत्रपती शिवाजी महाराजांमध्ये पाहायला मिळतो. शिवरायांच्या चरित्रातून आपल्याला प्रेरणा मिळते. छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज हे या भूमीचे दोन डीएनए आहेत. त्यांनी ज्ञान, शक्ती आणि भक्तीच्या त्रिवेणी संगमातून स्वराज्यनिर्मिती केली असल्याचे मत इतिहास अभ्यासक रायबा नलावडे यांनी व्यक्त केले.

गुरुवार पेठेतील प्रभात मित्र मंडळाच्या 'शिवसूर्य; स्मरणिका प्रकाशन कार्यक्रम श्री नाकोडा भैरव जैन धर्मशाळा येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात, जनता सहकारी बँक,पुणेचे संचालक नाना कांबळे, ऍड. प्रताप परदेशी, मंडळाचे अध्यक्ष किशोर चव्हाण, उत्सव प्रमुख नितीन घोगरे, अमोल व्यवहारे, रवींद्र भन्साळी, मंगेश शिंदे, ओमकार नाईक, हेमराज साळुंके, अमोल थोरात, अथर्व बोगम, कृष्णा परदेशी आदी उपस्थित होते.

स्मरणिका प्रकाशन सोहळ्याचे हे ९ वे वर्ष होते. कुस्ती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे हवेली तालुका कला क्रीडा सामाजिक संस्था, पुणे यांचे पदाधिकारी पै.भरत चौधरी व पै.भीमराव वांजळे यांचा मान्यवरांचे हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.




**पुणे** गुरुवार पेठेतील प्रभात मित्र मंडळाच्या 'शिवसूर्य; स्मरणिका प्रकाशन कार्यक्रम श्री नाकोडा भैरव जैन धर्मशाळा येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित मान्यवर.

# अग्रवाल समाजाच्या महिलांचे सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय योगदान – गोयल



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** भारतात महिलांची सुरक्षा अद्यापही पूर्णतः सुनिश्चित झालेली नाही. राष्ट्रीय गुन्हे अहवाल २०२३ नुसार, दर तासाला ५१ महिला गुन्हे व शोषणाच्या बळी ठरत आहेत. यामध्ये ३१ टक्के महिला कौटुंबिक हिंसाचाराला सामोऱ्या जातात. महिलांना सक्षम करण्याची सुरुवात घरातूनच झाली पाहिजे. जेव्हा कुटुंबस्तरावर महिलांचा सन्मान वाढेल, तेव्हाच त्या समाजात आणि देशात स्वतःचे स्थान निर्माण करू शकतील, असे मत अग्रवाल समाज फेडरेशनचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांनी व्यक्त केले.

खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनाक्षी लोहिया यांनी पुण्यातील बोट क्लब येथे अग्रवाल समाज फेडरेशन महिला समितीच्या वतीने आयोजित ‘माता माधवी अग्र गौरव पुरस्कार’ वितरण सोहळ्यात आपले विचार मांडले. या वेळी त्यांनी महिलांच्या सुरक्षेसाठी समाजाने स्वतःहून पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

या निमित्ताने, आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रख्यात वास्तू विश्राद टॅरो कार्ड वाचक राजनी सिंघल, अग्रवाल समाज फेडरेशनचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, राजबाला कृष्णकुमार गोयल, प्रसिद्ध समाजसेवी अग्र भूषण पवन सराफ, प्रखर सनातनी अंजलि सराफ, फेडरेशनचे उपाध्यक्ष विनोद शिवनारायण बंसल, सेक्रेटरी सीए के एल बंसल, खजिनदार श्याम पी गोयल, महिला समिति अध्यक्षा नीता अग्रवाल, उपाध्यक्षा मीना देवेंद्र गोयल, सचिव उषा तुलस्यान, कोषाध्यक्षा लक्ष्मी गोयल, मान्यवर जेष्ठ पदाधिकारी महेंद्र पाटोदिया, विजय मित्तल, संजय अग्रवाल, प्रिन्स रतनजी गोयल, राजेश अग्रवाल उपस्थित होते. या समारंभात द्रौपदी अग्रवाल यांना जीवन गौरव पुरस्कारासह २६ महिलांना विविध पुरस्कार देण्यात आले.

### भव्य उपस्थिती आणि उत्तम आयोजन

या सोहळ्याला अग्रवाल समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती नीता चंद्रशेखर अग्रवाल आणि उषा तुलस्यान यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मीनाक्षी गोयल, अश्विनी अग्रवाल, सुजाता अग्रवाल, निर्मल अग्रवाल यांनी विशेष योगदान दिले.

सर्व सहभागी महिला आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी स्नेहभोजन आणि स्नॅक्सची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.



> यावेळी अग्रवाल समाज फेडरेशनचे अध्यक्ष कृष्ण कुमार गोयल यांनी सांगितले की, समाजातील महिला आता केवळ घरातच नव्हे, तर सामाजिक, राजकीय आणि प्रशासकीय स्तरावरही मोठे योगदान देत आहेत. ‘माता माधवी अग्र गौरव पुरस्कार’ मागील 9 वर्षांपासून समाजाच्या विविध क्षेत्रांतील महिलांना देऊन त्यांचा सन्मान केला जात आहे..
> **— कृणकुमार गोयल,** अध्यक्ष, अग्रवाल समाज फेडरेशन



## साखर आयुक्तालयाचे ऊस तोडणी मशीन मालक संघटनेला पत्र; ठिया आंदोलन स्थगित

**पुणे :** महाराष्ट्र राज्य ऊस तोडणी मशिन मालकांच्या मागण्याबाबत साखर संचालक (प्रशासन), डॉ. केंदारी जाधव यांनी संघटनेचे अध्यक्ष संजय साळुंके व सचिव अमोल राजे जाधव यांना एक पत्र देऊन शासन स्तरावर मागण्यापूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले. हे पत्र साखर आयुक्त यांच्या मान्यतेने देण्यात आले आहे. त्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

साखर संकुल येथे सुरू असलेले आंदोलन तत्काळ स्थगित करावे अशी विनंतीही करण्यात आली आहे. ऊस तोड मालक संघटनेला दिलेली ही प्रत सहकार व पणनचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि. मुंबई आणि वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन, पुणे यांना ही देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य ऊस तोडणी मशिन मालक संघटनेच्या प्रलंबित मागणीसाठी १० मार्च पासून शिवाजीनगर येथील साखर संकुलासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले होते. यामध्ये संपूर्ण राज्यातील १३०० मशीन मालक सहभागी झाले होते. आंदोलनकर्त्यांचे उग्र रूप पाहता शेवटी साखर संचालक प्रशासन यांनी संघटनेला पत्र देऊन मागण्या सोडविण्याचे आश्वसन दिले. त्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले आहे.

## दोन वर्षांपासून फरार आरोपीला पोलिसांकडून अटक

**पुणे :** पुण्यातील मोक्याच्या आरोपीला दोन वर्षांनी पुणेपोलिसांच्या बेड्या ठोकल्या आहेत. खुनाच्या गुन्ह्यात मोक्का लागलेला असून दोन वर्षांपासून फरार असलेला आरोपीला शिवाजीनगर पोलिसांनीअटक केली. सूर्यकांत उर्फ पंडित कांबळे असं अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून २ पिस्तूल आणि ४ जिवंत काडतुसे पोलिसांकडून जप्त करण्यात आलेली आहेत. कांबळे हा सराईत गुंड असून तो पुण्यातील पंडित गँगचा म्होरक्या देखील आहे. अशी माहिती संदीपसिंग गिल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

आरोपीवर पुण्यातील विविध पोलीस स्टेशनमध्ये अनेक गुन्हे दाखल आहेत. अटक केलेल्या आरोपीवर शहरातील चार पोलीस स्टेशनमध्ये गंभीर गुन्हे दाखल आहेत. पूर्व वैमनस्यातून या टोळीने १५ ऑगस्ट २०२३ च्या रात्री मंगला चित्रपटगृहाच्या मागे नितीन म्हस्केचा निर्घुण खून केला होता. या गुन्ह्यात शिवाजीनगर पोलिसांनी १७ आरोपींना अटक केली होती. या टोळीवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आला आहे. मात्र, या गँगचा म्होरक्या पंडित कांबळे हा फरार झाला होता. म्होरक्या अखेर पोलिसांच्या ताब्यात सापडला.



## पुण्यस्मरण दिनानिमित्त आरोग्य तपासणी शिबीर

**पुणे :** चिराग अजय कटारिया यांचे वडील बाळासाहेब कटारिया यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे बाळासाहेब कटारिया मित्र परिवाराने आयोजन केले. अप्पा बळवंत चौक येथे संपन्न झालेल्या या शिबिरात नेत्र तपासणी – (मोतीबिंदू), रक्तघटक तपासणी, रक्तदाब तपासणी, साखर तपासणी, दात तपासणी, महिलांसाठी स्तन कर्करोग तपासणी. अशा सुमारे १३००० खर्चाच्या तपासण्या मोफत करण्यात आल्या. याचा लाभ शेकडो नागरिकांनी घेतला. वडिलांचा पुण्यस्मरण दिन हा सामाजिक कार्यात संपन्न व्हावा या साठी या उपक्रमाचे आयोजन केल्याचे चिराग कटारिया यांनी नमूद केले.

## 'घुमसते मणिपूर' विषयावर उद्या व्याख्यान

**पुणे :** 'केशव माधव विश्वस्त निधी' तर्फे येत्या रविवार, १६ मार्च २५ रोजी मणिपूर आणि ईशान्य भारतात चार दशके प्रत्यक्ष कार्य केलेले वक्ते जयवंत कोंडविलकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. पटवर्धन बाग, एरंडवणे स्थित 'सेवा भवन'च्या सभागृहात रविवारी, १६ मार्च रोजी सकाळी दहा ते साडे बारा या वेळेत हे व्याख्यान होणार आहे.संगणक तज्ञ डॉ दीपक शिकारपूर हे या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत .

यावेळी जयवंत कोंडविलकर हे दृकश्राव्य (PPT-पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन) द्वारे मणिपूर येथे त्यांनी जे कार्य गेल्या ४/५ दशकात केले त्याची माहिती उपस्थितांना देणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असल्याचे केशव माधव विश्वस्त निधी"चे सचिव अरविंद देशपांडे यांनी सांगितले आहे.

## महिला दिनानिमित्त ११ महिलांचा सन्मान

**पुणे :** विश्व पर्यावरण परिषद व कर्तव्य दक्ष फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने महिला दिनानिमित्त ११ महिलांचा सन्मान केला गेला. यानिमित्ताने आरोग्य शिबीराचे आयोजन केले गेले.

या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गणेश चन्ना, महापालिका उपायुक्त प्रदीप आव्हाड, एचव्ही देसाई नेत्र रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी परवेझ बिलीमोरीया,वसत बल्लेवर,माजी नगरसेवक प्रवीण चोरबेले आदी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी डॉ विजय पोटफोडे, अमित शाह, डॉ आशुतोष भिसे, अनंतलक्ष्मी कैलासन, सुषमा खटावकर, मनीषा निंबाळकर, सागर घम, संजय तांबोळी, प्रमोद परदेशी यांनी परिश्रम घेतले.

# पुणेकरांचे प्रेम विसरू शकत नाही : अशोक सराफ

## कै. प्रकाश ढेरे स्मृत्यर्थ कला जीवन गौरव पुरस्कार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पुणे :** महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण अशा थोर व्यक्तीच्या नावाने मला पुरस्कार मिळाला, हे माझे भाग्यच आहे. पुणेकरांनी आजपर्यंत मला भरभरून प्रेम दिले आहे, त्यांचे हे प्रेम मी कधीही विसरू शकणार नाही. मला मिळालेले पुरस्कार मी जपून ठेवले असून ते मला सतत ऊर्जा देणारे आहेत, अशी भावना ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनी व्यक्त केली.

स्व. प्रकाश ढेरे चॅरिटेबल ट्रस्ट व गंगालॉज मित्र मंडळातर्फे पहिले मुख्यमंत्री, लोकनेते स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण कला व साहित्य पुरस्कार समारंभात कै. प्रकाश ढेरे स्मृत्यर्थ 'कला जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ मराठी अभिनेते अशोक सराफ यांना ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांच्या हस्ते टिळक स्मारक मंदिरात प्रदान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेते नागराज मंजुळे उपस्थित होते.

याप्रसंगी सुनिता झाडे (नागपूर) यांना 'शब्दांच्या पसाऱ्यातील आत्महत्या' या कविता संग्रहासाठी कै. शिवाजीराव अमृतराव ढेरे यांच्या स्मृत्यर्थ 'साहित्य पुरस्कार', फेलिक्स डिसोजा (वसई) यांना आरशात ऐकु येणार प्रेम या कविता संग्रहासाठी कै. बाबासाहेब जाधव यांच्या स्मृत्यर्थ साहित्य पुरस्कार, सफर अली इसफ (वैभववाडी) यांना 'अल्लाद ईश्वर' कवितासंग्रहासाठी कै. धनाजी जाधव स्मृत्यर्थ 'साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जेष्ठ कवी डॉ. विठ्ठल वाघ, ज्येष्ठ कवी व वात्रटिकाकार रामदास फुटाणे, जेष्ठ लेखक व कवी प्रा. फ.मु. शिंदे, अशोक नायगावकर, ट्रस्टचे विजय ढेरे, संजय ढेरे, ज्येष्ठ नेते उल्हास पवार, गौरव फुटाणे, सचिन जाधव, कुणाल जाधव आदी यावेळी उपस्थित होते.



**अशोक मामाच्या साध्या आणि सरळ स्वभावामुळे मीच नव्हे तर अख्खा महाराष्ट्र त्यांचा चाहता आहे. हा माणूस आभाळासारखा आहे. कारण मी त्यांना अनुभवलं आहे. हा माणूस चित्रपट क्षेत्रातलाच नव्हे तर खऱ्या जीवनातला देखील हिरो आहे.**
**- नागराज मंजुळे**



**अशोक सराफ हा कलाकार तळागाळात मिसळणारा आहे. त्यांच्यात बडेजावपणा, इगो अजिबात नाही. कधीही केव्हाही भेटणारा साधा सरळ हा माणूस आहे. साध्या सरळ माणसाला हा पुरस्कार मिळाल्याने खरोखर आनंद आहे.**
**- डॉ. मोहन आगाशे**



**थोर व्यक्तीच्या नावाने मला पुरस्कार देण्यात आला. पुरस्कार माझा सन्मान आहे, प्रेम मी विसरणार नाही. स्व. प्रकाश ढेरे चॅरिटेबल ट्रस्टचा ऋणी आहे. पुणेकरांनी नेहमीच माझे कौतुक केले.**
**- अशोक सराफ**

# राजमाता जिजाऊ पुरस्कार प्रदान सोहळा

## सवाद्य छबिना मिरवणुकीचे आयोजन

### सोहळ्याची वैशिष्टे

**१) अनेंक शिवप्रेमी युवक-युवतींसह अनेक शाहीर देखील मिरवणुकीत सहभागी होणार आहे.**
**२) श्रीजगद्गुरु तुकाराम महाराज यांचा प्रसाद म्हणून श्री क्षेत्र देहू संस्थानच्या वतीने श्री शिवछत्रपती शिवजयंती उत्सवानिमित्त दरवर्षी महावस्त्र पाठविले जाते.**
**३) सज्जनगड येथील श्री समर्थ सेवा मंडळाच्यावतीने देखील महावस्त्र पाठविण्यात येणार आहे.**
**४) पंचक्रोशीत विशेष काम करणा-या महिलेला राजमाता जिजाऊ पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.**
**५) ओतूरच्या डॉ. रश्मी घोलप, कळंबच्या ह.भ.प.सुरेखा शिंदे, गोद्रेच्या सरपंच अनिता रेंगडे, पाडळीच्या सरपंच स्वाती कबाडी, सामाजिक कार्यकर्त्या राणी बो-हाडे यांना गौरविण्यात येणार आहे.**



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** श्री शिवनेरी स्मारक समिती पुणेचे वतीने किल्ले शिवनेरी येथे फाल्गुन वद्य तृतीया म्हणजेच शिवतृतीयेला सोमवार, दिनांक १७ मार्च रोजी सकाळी ७ वाजता शिवजयंती उत्सव सुरु होणार आहे. शिवाई मातेस अभिषेक, शिवजन्मोत्सव, पालखी सोहळा, शिवजागर धार्मिक कार्यक्रम व पुरस्कार वितरण असे विविध कार्यक्रम गडावर होणार आहेत. उत्सवाचे यंदा ४६ वे वर्ष आहे, अशी माहिती समितीचे अध्यक्ष आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे यांनी दिली.

कै.ग्राहकतीर्थ बिंदुमाधव जोशी आणि कै.शाहीर किसनराव हिंगे यांनी १९८० सालापासून शिवनेरी गडावर हा उत्सव सुरु केलेला आहे. तीच परंपरा पुढे चालू ठेवत शनिवारी श्री शिवाई मंदिर ते जन्मस्थळ अशी महाराजांच्या प्रतिमेची चांदीच्या शिवपालखीतून सवाद्य छबिना मिरवणूक निघेल. यावेळी हिंदूधर्मवीर नितेश राणे यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शिवजन्मस्थळावर शिवाई मातेस सौ. व श्री. विद्यावाचस्पती डॉ.नंदकिशोर एकबोटे यांच्या हस्ते अभिषेक व महापूजा होईल. मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री मंत्री नितेश राणे, विद्यावाचस्पती डॉ. नंदकिशोर एकबोटे, शिवव्याखाते सौरभ कर्डे यांच्या उपस्थितीत हा उत्सव संपन्न होणार आहे. उत्सवात पालखी सोहळा व पारंपरिक पद्धतीने पंचक्रोशीतील महिला पाळणा म्हणून सकाळी ९ ते १० यावेळेत शिवजन्मोत्सव साजरा करतील.

# मोहिनी वाघने घेतली होती मांत्रिकाची मदत

### सतीश वाघ खूनप्रकरण; आरोपपत्र न्यायालयात दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश वाघ यांच्या खून प्रकरणात पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेकडून लष्कर न्यायालयात एक हजार पानांचे आरोपपत्र दाखल करण्यात आले. वाघ यांच्या खून प्रकरणाचा मुख्य सूत्रधार अक्षय जावळकर आणि वाघ यांची पत्नी मोहिनी असल्याचे पोलिसांनी केलेल्या आरोपपत्रात नमूद करण्यात आले आहे. वाघ यांचा खून करण्यापूर्वी पत्नी मोहिनी हिने एका मांत्रिकाची भेट घेतली होती. तिने पती सतीश यांच्यावर जादुटोणा करण्यास मांत्रिकाला सांगितले होते, असे पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रात म्हटले आहे.

सतीश तात्याबा वाघ (वय ५८, रा. फुरसुंगी, हडपसर-सासवड रस्ता) यांचे अपहरण करुन निर्घृण खून करण्यात आल्याची घटना ९ डिसेंबर २०२४ रोजी घडली होती. याप्रकरणात सतीश वाघ यांची पत्नी मोहिनी, अक्षय जावळकर,आतिश जाधव, पवन शर्मा, नवनाथ गुरसाळे, विकास शिंदे यांना अटक करण्यात आली होती. वाघ यांच्या मुलाने हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

याप्रकरणात अटक करण्यात आलेल्या सहा आरोपींविरुद्ध गुन्हे शाखेने एक हजार पानांचे आरोपपत्र लष्कर न्यायालयात दाखल केले. मोहिनी वाघ आणि अक्षय जावळकर हे २०१३ मध्ये एकमेकांच्या संपर्कात आले. अक्षय हा वाघ यांच्या खोलीत भाडेतत्त्वावर राहत होता. अक्षयने वाघ यांच्या मुलाला महाविद्यालयात प्रवेश मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले होते. अक्षय आणि पत्नी मोहिनी यांच्यात अनैतिक संबंध निर्माण झाले. अक्षय आणि मोहिनी यांनी संगनमत करुन वाघ यांचा खून करण्याचा कट रचला.

### आरोपपत्र दाखल

याप्रकरणात पोलिसांनी न्यायवैद्यकीय पुरावे गोळा केले, तसेच आरोपी, फिर्यादी, साक्षीदारांचे जबाब नोंदविले आहेत. वाघ यांचा मोबाइल संच, गुन्ह्यात वापरलेली मोटार, शस्त्रे जप्त करण्यात आली होती. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, अतिरिक्त आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त निखील पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थ विरोधी पथकाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड आणि पथकाने याप्रकरणाचा तपास करुन आरोपपत्र दाखल केले.

# एलईडी चित्ररथातून समाज कल्याण योजनांचा जागर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचावी यासाठी एलईडी चित्ररथाच्या माध्यमातून प्रसिद्धी मोहिमेचा आज शुभारंभ करण्यात आला. सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय येथे या चित्ररथाला हिरवा झेंडा दाखविण्यात आला. यावेळी समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त विशाल लोंढे, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. रवींद्र ठाकूर, माहिती अधिकारी सचिन गाढवे यांच्यासह समाजकल्याण सहायक आयुक्त कार्यालयातील निरीक्षक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन विस्तारीकरण समितीची मंत्री मोहोळांकडे मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मंगळवार पेठेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाच्या भावी विकास व योजनेसाठी आरक्षित जागा खासगी बिल्डरला देण्याचा निर्णय दुर्दैवी आहे. हा करार रद्द करून सदरची जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाच्या विस्तारासाठी त्वरित द्यावी, अशी मागणी दलित, बहुजन व आंबेडकर अनुयायांची आहे. सामाजिक हिताच्या दृष्टीकोनातून या संवेदनशील व महत्वपूर्ण जागेचा प्रश्न मार्गी लावून डॉ. आंबेडकर भवनाचे विस्तारीकरण करण्यात पुढाकार घ्यावा, अशी मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन विस्तारीकरण समितीने केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे केली.

सदरच्या जागेत आंबेडरकर भवनाचा विस्तार व्हावा, डॉ. आंबेडकरांचे भव्य स्मारक व्हावे, यासाठी पुण्याचे खासदार या नात्याने राज्य शासनाकडे पाठपुरावा करावा, या मागणीचे निवेदन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन विस्तारीकरण समितीच्या वतीने मुरलीधर मोहोळ यांना देण्यात आले.

प्रसंगी माजी आमदार ॲड. जयदेव गायकवाड, ॲड. अविनाश साळवे, डॉ. सिद्धार्थ धेंडे, रोहिदास गायकवाड, परशुराम वाडेकर, संजय सोनावणे, शैलेश चव्हाण, राहुल डंबाळे, शाम गायकवाड, महिपाल वाघमारे युवराज बनसोडे यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाच्या विस्तारीकरणासाठी आंबेडकरी जनतेच्या भावना तीव्र आहेत. या भवनाचे विस्तारीकरण करण्याचे आश्वासन तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख व देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. त्यामुळे महापालिकेने २००० मध्ये केलेल्या ठरावाची त्वरित अंमलबजावणी करून येथे आंबेडकर भवनाचा विस्तार व स्मारकाचे काम त्वरित सुरु करावे. महापालिकेच्या वतीने आंबेडकरी विचारांचे प्रचार व प्रसार केंद्र, संशोधन केंद्र, स्पर्धा परीक्षा केंद्र, अभ्यासिका यासह डॉ. आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारावे, जेणेकरून आंबेडकरी समाजाला न्याय मिळेल, असे या निवेदनात म्हटले आहे.



# थकबाकीविरोधात महावितरण अधिकारी 'ऑन फिल्ड'




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** थकित वीजबिलांपोटी वीजपुरवठा खंडित करणे व खंडित केलेल्या वीजजोडण्यांची तपासणी करण्यासाठी महावितरणचे सर्व अभियंता, अधिकारी, कर्मचारी सध्या 'ऑन फिल्ड' आहेत. वीजबिल थकित असेल तर नियमानुसार वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरू आहे. त्यामुळे थकबाकी तसेच चालू वीजबिलांचा भरणा करून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

महावितरणच्या महसुलाचा आर्थिक स्रोत प्रामुख्याने वीजबिलांची वसुली हाच आहे. मात्र वारंवार आवाहन करून देखील वीजबिलांच्या थकबाकीचा भरणा होत नसल्याने थकबाकी वाढत आहे. थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित केलेल्या वीजजोडण्यांच्या तपासणीचे काम स्वतंत्र पथकांद्वारे सुरू आहे. यामध्ये शेजाऱ्यांकडून किंवा इतर ठिकाणाहून थकबाकीदार विजेचा वापर करीत असल्याचे आढळल्यास शेजारी व संबंधित थकबाकीदारांविरुद्ध भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५/१३८ नुसार कारवाई करण्यात येत आहे.

प्रादेशिक विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांकडे ३१० कोटी ८४ लाख रुपयांची थकबाकी आहे. आर्थिक अडचणीत असलेल्या महावितरणकडून घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरू आहे. गेल्या ३५ दिवसांच्या कालावधीत ५१ हजार ७३५ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला.

| जिल्हा | ग्राहकांची संख्या | थकबाकी रक्कम |
|---|---|---|
| पुणे | ४२,०७३ १९९ कोटी, | ९९ लाख रुपये |
| सातारा | ११२० २० कोटी, | ४० लाख रुपये |
| सोलापूर | ४२७९ ४४ कोटी, | ७ लाख रुपये |
| कोल्हापूर | १४९० २० कोटी , | ८० लाख रुपये |
| सांगली | ११७३ २४ कोटी, | ९५ लाख रुपये |

MAHAVITARAN



## सयाजी महाराजांचा इतिहास दुर्लक्षित राहिला : भांड

**औंध :** ज्या राजाने -शाहू- फुले- आंबेडकर याच्यासह पुण्यातील ६२ संस्था,प्रज्ञावंत, क्रांतिवीर, समाजसुधारक,अशा अनेक युगपुरुष आणि गरजू विद्यार्थी यांना तब्बल ८९कोटीहून अधिक रुपयांची मदत केली.जो मराठी राजा होता . जगातील श्रीमंत व्यक्तींच्या यादीत ७ व्या क्रमांकांवर असलेले, डोंगरावढे कार्य असणारे महाराज सयाजी गायकवाड यांचा इतिहास दुर्लक्षितच राहिला. अशी खंत ज्येष्ठ साहित्यिक बाबासाहेब भांड यांनी व्यक्त केली. बडोदे मित्र मंडळाच्या वतीने महाराजा सयाजी गायकवाड यांची औंध येथील सयाजीराव गायकवाड सभागृहात जयंती साजरी करण्यात आली. यावेळी ते बोलत होते.

यावेळी सयाजी गायकवाड यांचे पणतू सायजीराव गायकवाड, माजी महापौर दत्तात्रय गायकवाड,श्रीनिवास सोलापूरकर, महेंद्रसिंग गायकवाड, राजेंद्र हरपाळे, नागेश चव्हाण, राजेंद्र दिंडोरकर, बडोदे मित्र मंडळाचे अध्यक्ष डॉ जयसिंग पाटील, उपाध्यक्ष अतुल शहा,कमांडर निलेश दिघावकर, विश्वस्त प्रभाकर जोशी, नितीन पारिख,मेघाताई गोडबोले आदी मान्यवर उवस्थित होते.

श्री भांड पुढे म्हणाले कि, सयाजीराव हे जळगाव जिल्ह्यातील एका शेतकरी कुटंबातील दत्तक पुत्र म्हणून बडोदे राजघराण्यात दाखल झाले. सयाजी गायकवाड यांनी स्वतःपासून काटकसर, आर्थिक नियोजन करून राज्य प्रबळ बनविले. लक्ष्मी आणि सरस्वती एकत्र गुण्यागोविंदाने नांदवून जगातले सातव्या क्रमांकाचे श्रीमंत राजा साहित्य, कला, संस्कृती अन् गरजवंतांचे आश्रयदाते झाले. सयाजी महाराज यांनी त्या काळात पितामह नौरोजी, जमशेट टाटा, नामदार गोखले, लो. टिळक, म. गांधी, न्या. रानडे, म. फुले, राजर्षी शाहू, पं. मालवीय, डॉ. आंबेडकर, रवींद्रनाथ टागोर, स्वा. सावरकर, कर्मवीर भाऊराव, महर्षी शिंदे या समाजासाठी योगदान देणारे या महापुरुषांना आर्थिक मदत केली.

## पीएमपीएमएलकडून 'तुकाराम बीज' निमित्त देहूगावला जादा बस

**देहूगाव :** पीएमपीएमएल’ कडून 'तुकाराम बीज' निमित्त देहूगावला जाणाऱ्या भाविकांसाठी आजपासून जादा बसेसचे नियोजन केले आहे. १५ ते १७ मार्च या कालावधीत विविध स्थानकावरून या जादा बसेस सोडल्या जाणार आहे. रविवारी (ता. १६ ) तुकाराम बीज असुन, यानिमित्त देहूगांव येथे मोठी यात्रा भरते. पुणे व पिंपरी चिंचवड शहर, उपनगरे तसेच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून देहूगाव येथे येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी पीएमपीएमएलने जादा बसेसचे नियोजन केले आहे. दरवर्षी प्रमाणे या वर्षी बसेसची व्यवस्था नेहमीच्या तिकीट दराने करण्यात आलेली आहे. देहूगाव यात्रेसाठी देण्यात आलेल्या जादा बसेसची माहिती खालीलप्रमाणे आहे. स्वारगेट ते देहूगाव , मनपा भवन ते देहूगाव, निगडी ते देहूगाव, पुणे स्टेशन ते देहूगाव, देहूरोड स्टेशन ते देहूगाव, आळंदी ते देहूगाव या मार्गावर सकाळ व दुपारच्या सत्रात जादा बसेस सोडल्या जाणार आहेत.

श्री क्षेत्र आळंदीसाठी मनपा भवन ते आळंदी, पुणे स्टेशन ते आळंदी, हडपसर ते आळंदी या मार्गावर बसेस सोडल्या जातील. तसेच देहूगाव येथून परतीच्या प्रवासासाठी देहूगाव येथील झेंडे मळ्याजवळील सैनिकी मैदानावरून बसेसची व्यवस्था तात्पुरत्या स्वरूपात करण्यात आलेली आहे. तसेच देहूगावहून आळंदी येथे ये-जा करण्याकरीता गाथा मंदिराजवळ असलेल्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज क्रिडांगणाजवळील मोकळ्या जागेतून जादा बसेस सोडण्यात येतील.

## पिंपरी चिंचवडला अव्वल आणण्यासाठी अभिप्राय नोंदवा

**पिंपरी :** ‘स्वच्छ २०२४ ‘ मार्च मार्च सर्वेक्षण अव्वल चिंचवड शहराला स्थान शोधून स्वच्छतेच्या नागरिकांचा अभिप्राय अत्यंत महत्वाचा आहे. आपण केवळ चिंचवड निवडणूक आयोगाने मोठ्या नागरिकांनी स्वच्छ रिलिअत अभिप्राय नोंदवा , असे आवाहन खासदार चिंचवड महानगरपालिका तथा प्रभु शेखर यांनी केले आहे. ‘ स्वच्छ सर्वेक्षण २०२४ ‘ ही पासवर्डही स्पष्टपणे समोर जात आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका या सामील आहे. या सर्व नागरिकांसाठी अभिप्राय मुक्त असून अतिरिक्त गुण देण्यात आले आहेत. त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस देशात अव्वल स्थान मिळवून देण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरातील प्रत्येक नागरिकाने आपला स्वच्छतेविषयक अभिप्राय देणे महत्त्वाचे आहे.

## उन्नती सोशल फाऊंडेशनतर्फे “छावा” चा प्रीमिअर शो



**पिंपळे सौदागर :** पिंपरी चिंचवड शहरातील विविध सामाजिक कामांसाठी प्रसिद्ध असलेल्या, उन्नती सोशल फाऊंडेशन आणि पी.के.इंटरनॅशनल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने स्वराज्यरक्षक , धर्मवीर छ.संभाजी महाराज यांच्या अजोड पराक्रमाची साक्ष देणाऱ्या छावा चित्रपटाचा भव्य प्रीमिअर शो , पी.के.इंटरनॅशनल स्कूल येथे आयोजित करण्यात आला होता. या प्रीमिअर शो ला पिंपळे सौदागर आणि रहाटणी परिसरातील नागरिक बंधू-भगिनी, अबालवृद्ध, तरुण-तरूणी यांनी उदंड प्रतिसाद दिला. छ.संभाजी महाराजांचा क्रूरकर्मा औरंगजेबाने केलेला ‘मृत्यूलाही देखील भय वाटेल असा केलेला छळ’ पाहताना पिंपळे सौदागर वासीयांच्या कडा पाणावल्याचे पाहायला मिळाले.

## पक्ष प्रवेश



**पिंपरी** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुणे जिल्ह्यात दोन दिवसात दुसऱ्यांदा लॉटरी लागली आहे. कसब्याचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांना आपल्याकडे खेचण्यात एकनाथ शिंदे यशस्वी ठरल्यानंतर आता पिंपरी चिंचवडमधील फायरब्रँड नेत्या शिवसेनेच्या गळाला लागल्या आहेत. ठाकरे गटाच्या जिल्हा संघटक सुलभा उबाळे यांनी आज शिंदे गटात प्रवेश केला आहे. मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्षप्रवेश पार पडला आहे. यावेळी सुलभा उबाळे यांचे पुत्र अजिंक्य उबाळे यांनी देखील शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे.

## साईनाथ नगरमध्ये रस्त्यावरून वाहतेय सांडपाणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**थेरगाव :** साईनाथ नगरमध्ये वारंवार ड्रेनेज लाइन चोकअप होत आहे. त्यामुळे रस्त्यावरूनच सांडपाणी वाहत आहे. या पाण्यातूनच लहान मुलांसह नागरिकांना ये-जा करावी लागत आहे. त्यामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. साईनाथ नगर, थेरगाव या परिसरातील ड्रेनेज लाइन वारंवार चोकअप होत आहे. ड्रेनेज लाइन चोकअप झाल्यामुळे सांडपाणी घरांसमोरील रस्त्यावरून वाहत आहे. याची दुर्गंधी तर येतेच. मात्र या सांडपाण्यातून नागरिकांना ये-जा करावी लागत आहे. याबाबत स्थानिक नागरिकांकडून महापालिकेकडे वेळोवेळी तक्रार केली आहे. मात्र महापालिकेचे अधिकारी बघू, करू, सांगू अशी उत्तरे देतात. काही अधिकारी तर नीट बोलत देखील नाहीत. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. महापालिकेचे कर्मचारी ड्रेनेज लाइनचे चोकअप काढतात. मात्र काही दिवसातच पुन्हा परिस्थिती जैसे थे होते. या परिसरात नवीन ड्रेनेज लाइन टाकण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# हवा प्रदूषणाबाबत मंत्र्यांना साकडे!

### - भाजपा नेते आमदार महेश लांडगे यांचे निवेदन


### - पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्याकडे बैठकीची मागणी

**हवा गुणवत्ता निर्देशांक चिंताजनक...**

बुधवारी पिंपरी-चिंचवडमध्ये हवामान खात्याच्या एअर कॉलिटी इंडेक्सनुसार, गवळीनगर : १२७, पार्क स्ट्रिट वाकड : १४०, थेरगाव : १२७, भोसरी: २६०, भूमकरनगर : २७१, ट्रान्सपोर्टनगर निगडी : १४० असा हवा गुणवत्ता निर्देशांक आहे. मानवी आरोग्यासाठी किंवा निसर्ग परिसंस्थेसाठी ० ते ५० असा हवा गुणवत्ता निर्देशांक चांगला मानला जातो. ० ते १०० पर्यंत मध्यम आणि १०० ते २०० पर्यंतचा हवा गुणवत्ता निर्देशांक म्हणजे नागरी आरोग्यावर वाईट परिणाम करणारा आहे. माझ्या पिंपरी-चिंचवड शहरात एकाही ठिकाणी AQI ५० पेक्षा कमी नाही, ही बाब चिंताजनक आहे.



> पिंपरी-चिंचवड, पुणे परिसरातील हवा प्रदूषणाला प्रतिबंध करण्यासाठी ठोस उपाययोजना आणि नियमांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असून, त्या दृष्टीने पर्यावरण विभागाची उच्चाधिकार समितीची बैठक नियोजित करावी. त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रमुख अधिकाऱ्यांसह लोकप्रतिनिधी यांना सूचना मांडण्याची संधी मिळावी, अशी आग्रही मागणी आहे. यावर महायुती सरकार आणि पर्यावरण विभागाच्या वतीने सकारात्मक कार्यवाही होईल, अशी अपेक्षा आहे.
>
> **-महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी- चिंचवड :** पिंपरी-चिंचवड शहर आणि परिसरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण वाढले आहे. उपनगरांमध्ये गृहप्रकल्प उभारले जात आहे. धूळीचे साम्राज्य आणि हवा प्रदूषणामुळे सर्वसामान्य नागरिक, वाहनचालक यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीमध्ये उच्चाधिकार समितीची बैठक घ्यावी. तसेच, हवा प्रदूषणाबाबत ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

महाराष्ट्र अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आमदार लांडगे यांनी पर्यावरण मंत्री मुंडे यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, काही दिवसांपूर्वी, पुणे, पिंपरी-चिंचवड परिसरातील सोसायटीधारकांनी रस्त्यावर उतरून मूक मोर्चा काढला आणि हवा प्रदूषणाबाबत राज्य सरकारचे लक्ष वेधले आहे. वातावरणातील सिमेंट मिक्स धूळ आणि रस्त्यावरील अवजड वाहनांमुळे होणारे प्रदूषण यामुळे परिसरातील हवेची गुणवत्ता अत्यंत खालावली असून श्वसनाचे आजार वाढत आहेत. परिसरातील लहान मुले, वृद्ध आणि गरोदर महिलांमध्ये दम्याचे, ॲलर्जीचे आणि श्वसनासंबंधी आजारांचे प्रमाण वाढत आहे. यासह नैसर्गिक जीवनमानावर परिणाम: सिमेंटच्या धुळीचा थर रस्त्यांवर, गाड्यांवर आणि घरांवर साचत असून, नागरिकांचे जीवनमान ढासळत आहे, ही बाब गंभीर आहे.

तसेच, सर्वसामान्य नागरिकांना स्वच्छ आणि निरोगी वातावरण मिळाले पाहिजे. परंतु, पिंपरी-चिंचवडसह वेगाने विकसित होणाऱ्या शहरांमध्ये हवा प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सिमेंट मिक्स धूळ त्वरित बंद व्हावी. वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक नियम आणि उपाययोजना लागू कराव्यात. वायू प्रदूषण पातळीची नियमित तपासणी करून अहवाल सार्वजनिक करावा. रस्त्यांची नियमित २ वेळा साफसफाई करून धुळीचे प्रमाण कमी करावे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनावर कठोर कारवाई केली जावी. रस्त्यांवरील धूळ कमी करण्यासाठी टँकरद्वारे, एअर गन द्वारे नियमितपणे पाण्याचा फवारा मारला जावा. प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करून आवश्यक ती आरोग्यसेवा पुरवावी. रस्त्यांवरील झाडांची देखभाल आणि पाणी नियमित करावे, यासाठी संबंधित विभागाचे अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्था यांना आदेश द्यावेत, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली आहे.

## साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही भरा कर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने कर वसुलीची कार्यवाही सुरु आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अर्थसंकप्लातील उद्दिष्टाप्रमाणे कर वसुली दि. ३१ मार्च २०२५ पुर्वी करणेची असून उपरोक्त उद्दिष्ट्यपुर्ततेकरीता केवळ १८ दिवसाचा कालावधी शिल्लक आहे. हीच बाब लक्षात घेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मुख्य कार्यालय तसेच १८ विभागीय कर संकलन कार्यालय यापुढे शनिवार व रविवार चालू ठेवणेचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे नागरिकांना सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी तसेच शनिवारी व रविवारी कर भरता येईल. पिंपरी-चिंचवड शहरात मालमत्ता धारकांना कर भरण्यासाठी १८ विभागीय कार्यालये कार्यान्वीत असून कराचा भरणा करण्यासाठी ऑनलाइन पध्दतीने कर भरण्याची सुविधा विभागीय कर संकलन कार्यलयामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालेच्या विभागीय कर संकलन कार्यालयाचा तपशिल पुढीलप्रमाणे. आत्तापर्यंत ८३१ कोटी रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा झाला आहे. कर संकलन विभागाच्या वतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करणे, वर्तमान पत्रात नावे प्रसिद्ध करणे, नळ कनेक्शन खंडित करणे, जप्त मालमत्तांचा लिलाव करणे, यासारख्या कठोर कारवाया केल्या जात आहेत.

### नागरिकांना आवाहन

- नागरिकांना कर भऱण्याचे आवाहन करण्यासाठी करसंकलन विभागाकडून टेलिकॉलिंगच्या माध्यमातून आवाहन केले जात आहे. नागरिकांनी शनिवारी व रविवारी महानगरपालिकेकडून ८८८८००६६६६ सदर क्रमांकावरुन आलेले फोन अधिकृत असून त्याचबरोबर, @CP-PCMCPT @ CP-PCMCWT या हँडलवरुन आलेले एस.एम.एस अधिकृत समजावेत. असे कर संकलन विभागाकडून सांगण्यात आले आहे.

## प्रशासकीय राजवटीचे चौथ्या वर्षात पदार्पण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेतील नगरसेवकांचा कार्यकाळ संपून प्रशासकीय राजवट आली. आज प्रशासकीय राजवटीला तीन वर्षे पूर्ण होऊन चौथ्या वर्षांत पदार्पण होत आहे. या प्रशासकीय राजवटीमध्ये लोकोपयोगी कामे कासवगतीने सुरू आहेत. तर, महापालिकेच्या तिजोरीवर ताण टाकणाऱ्या अनावश्यक कामांचा सपाटा सुरू आहे. यामुळे नागरिकांसाठीच्या लोकोपयोगी कामांना घरघर लागली असून शहराचा विकास खुंटला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेतील नगरसेवकांचा पाच वर्षाचा कार्यकाळ १३ मार्च २०२२ रोजी संपुष्टात आला. महाविकास आघाडी सरकारने तत्कालीन महापालिका आयुक्त राजेश पाटील यांचीच प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी चार महिने प्रशासक म्हणून काम पाहिले.

राज्यात सत्तांतर झाल्यानंतर पाटील यांची बदली झाली. त्यांच्याजागी शेखर सिंह यांची आयुक्त आणि प्रशासकपदी १६ ऑगस्ट २०२२ रोजी नियुक्ती झाली. गेल्या तीन वर्षांच्या प्रशासकीय राजवटीत कामे गतीने होत नाहीत. प्रशासक कोणाला दाद देत नाहीत. मूलभूत कामे होत नाहीत अशा तक्रारी नागरिक करत आहेत. एकूणच पालिकेचा कारभार संथ झाला आहे.




**पिंपरी** राज्यातील विधान परिषद निवडणूक २७ मार्च रोजी होणार आहे. १० ते १७ मार्च दरम्यान नामनिर्देशन पत्र भरण्याची मुदत आहे. पिंपरी चिंचवड शहराला प्रतिनिधित्व मिळण्यासाठी सदर बैठकीत विषय घेण्यात आला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लक्षात घेता शहरात पक्षाला अधिकची ताकद मिळण्यासाठी विधानपरिषदेच्या माध्यमातून संधी मिळावी, अशी बैठकीत चर्चा करण्यात आली.

# उष्णतेच्या लाटेपासून बचावासाठी पालिकेचे नागरिकांना आवाहन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरातील तापमानात सतत वाढ होत असून उष्णतेच्या लाटेमुळे शारीरिक ताण येण्याची आणि गंभीर आजार होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक खबरदारी घेऊन संभाव्य धोक्यांपासून स्वतःचे आणि आपल्या कुटुंबियांचे संरक्षण करावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना करण्यात येत आहे. उष्णतेपासून बचावासाठी खालील उपाययोजना कराव्यात.

### काय करावे

- १) तहान लागलेली नसली तरी सुध्दा जास्तीत जास्त पाणी पिण्यात यावे.
- २) हलके, पातळ व सछिद्र सुती कपडे वापरावेत.
- ३) बाहेर जाताना गॉगल, छत्री,टोपी, बुट व चपलांचा वापर करावा.
- ४) प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत ठेवावी.
- ५) उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करावा तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकावे.
- ६) शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओ.आर.एस, घरी बनविण्यात आलेली लस्सी, लिंबू-पाणी, ताक इत्यादीचा नियमित वापर करावा.
- ७) चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा.
- ८) पाळीव प्राण्यांना पुरेसे पिण्याचे पाणी द्यावे व सावलीत ठेवावे.
- ९) घरातील वातावरण थंड ठेवण्यासाठी पंखे, कुलर, वाळयाचे पडदे व सनशेडचा वापर करण्यात यावा. रात्री खिडक्या उघडया ठेवण्यात याव्या.
- १०) थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे.
- ११) कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी
- १२) सुर्य प्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सुचित करण्यात यावे.
- १३) पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करावा.
- १४) बाहेर कामकाज करीत असताना अधूनमधून ब्रेक घेउन आराम करावा.
- १५) लहान मुले, गरोदर महिला, वृद्ध व आजारी व्यक्तींची अधिकची काळजी घेण्यात यावी.
- १६) रस्त्यांच्या कडेला उन्हापासून संरक्षणाकरीता सावलीचा आधार घ्यावा.
- १७) आवश्यक तेवढाच व्यायाम करावा, अतिश्रम टाळावे.

### काय करू नये

- लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेउ नये.
- दुपारी १२.०० ते ०४.०० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे.
- गडद रंगाचे, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे.
- बाहेर तापमान अधिक असल्यास शारीरीक श्रमाची कामे टाळावित, दुपारी १२.०० ते ०४.०० या कालावधीत बाहेर काम करणे टाळावे.
- उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे. तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावी.

संपादकीय विशेष

# इंधन दरवाढीचे संकट

मार्च 2022 पासून रशियाकडून मोठ्या प्रमाणात कच्च्या तेलाची खरेदी करणाऱ्या भारतीय पेट्रोलियम कंपन्यांसाठी भारत सरकारचे धोरण अडचणीचे ठरणार आहे. राजनैतिकदृष्ट्या सरकारने काही निर्णय घेतले असले, तरी ते पेट्रोलियम कंपन्यांसाठी फारसे फायद्याचे नाहीत. केवळ पेट्रोलियम कंपन्याच नव्हे, तर सामान्यांनाही ते फटका देणारे ठरणार आहे. भारतीय कंपन्या अमेरिकेकडून कच्च्या तेल खरेदी वाढवण्याची शक्यता आहे. त्याचे कारण अमेरिकेच्या निर्बंधांमुळे भारतीय कंपन्यांना रशियाकडून तेल खरेदी करणे अधिक कठीण होणार आहे. सरकारी तेल कंपनी 'भारत पेट्रोलियम' (बीपीसीएल)ने म्हटले आहे की ते रशियाकडून तेल खरेदी कमी करणार आहेत. अमेरिकन तेल कंपन्यांसाठी भारत ही सर्वात मोठी बाजारपेठ आहे. चीनसोबतचे सध्याचे तणावपूर्ण संबंध लक्षात घेता तेथील कच्च्या अमेरिकन तेलाची विक्री फारशी वाढण्याची शक्यता नाही, असे तज्ज्ञांचे मत आहे. अशा परिस्थितीत भारत हा अमेरिकन क्रूडचा प्रमुख खरेदीदार असेल. रशियाकडून 31 टक्के कच्चे तेल आयात केले जात होते. ते आता वीस टक्क्यांपर्यंत कमी होईल. त्याचे कारण म्हणजे 10 जानेवारी 2025 रोजी अमेरिकेने रशियाच्या दोन प्रमुख तेल उत्पादक कंपन्या आणि 183 तेलवाहक जहाजांवर नवीन निर्बंध लादले आहेत. फेब्रुवारी 2022 मध्ये युक्रेन-रशिया युद्धानंतर अमेरिकेने रशियावर अनेक निर्बंध लादले आहेत. या बंदीनंतरही भारत रशियाकडून सातत्याने तेल खरेदी करत होता; मात्र अमेरिकेच्या नव्या निर्बंधांनंतर हे सोपे राहणार नसल्याचे सरकारी अधिकारीही म्हणत आहेत.



मार्च-एप्रिल 2022 पासून भारताने रशियाकडून अधिक कच्चे तेल खरेदी करण्यास सुरुवात केली. याचा परिणाम असा झाला की सौदी अरेबिया, इराकसह भारतानेही अमेरिकेकडून कच्चे तेल कमी प्रमाणात खरेदी केले. भारताने 2017 पासूनच अमेरिकन कच्चे तेल खरेदी करण्यास सुरुवात केली होती. 2021 पर्यंत भारताच्या एकूण तेल आयातीमधील अमेरिकेचा वाटा 15 टक्क्यांपर्यंत वाढला होता. युक्रेन-रशिया युद्धानंतर भारताने रशियाकडून तेल खरेदी अनेक पटींनी वाढवली होती. फेब्रुवारी 2022 पर्यंत भारताच्या एकूण तेलखरेदीमध्ये रशियाचा वाटा फक्त दोन टक्के होता. 'स्टँडर्ड अँड पुअर्स'च्या अहवालानुसार, एप्रिल-सप्टेंबर 2024 या सहामाहीमध्ये भारताने रशियाकडून दररोज सरासरी 17 लाख पिंप कच्चे तेल खरेदी केले आहे. भारताच्या एकूण आयातीमध्ये रशियन तेलाचा वाटा 41 टक्क्यांवर पोहोचला आहे तर अमेरिकन तेलाचा वाटा पाच ते सहा टक्क्यांपर्यंत घसरला आहे. तथापि, भारताला तेलपुरवठा करणाऱ्या पाच सर्वात मोठ्या देशांमध्ये अमेरिका अजूनही आहे.

जगातील तिसऱ्या क्रमांकाचा तेल ग्राहक असलेला भारत आपल्या इंधनाची गरज भागवण्यासाठी दर वर्षी मोठ्या प्रमाणात तेल आयात करतो. आत्तापर्यंत, भारताची तेल आयात प्रामुख्याने मध्य पूर्व आणि रशियामधून होत होती. तिथे कच्चे तेल स्वस्त दरात मिळते आहे आणि वाहतूक खर्च कमी आहे; पण अलीकडे भारताने अमेरिकेकडून अधिक तेल खरेदी करण्याच्या दिशेने पावले उचलली आहेत. हे पाऊल धोरणात्मकदृष्ट्या योग्य वाटू शकते; परंतु आर्थिक दृष्टिकोनातून पाहिल्यास भारतासाठी तो तोट्याचा सौदा ठरू शकतो. अमेरिकेकडून तेल खरेदी करण्यामागील खरी समस्या केवळ चढ्या किमतींपुरती मर्यादित नाही. कच्च्या तेलाच्या वाहतुकीचा खर्च, ऊर्जाव्यापाराच्या अटी आणि भारतीय तेल कंपन्यांच्या नफ्यात घट यासारखी अनेक कारणे त्यामागे आहेत. अशा परिस्थितीत अमेरिकेकडून तेल खरेदी करणे हा भारतासाठी तोट्याचा सौदा का ठरू शकतो, हे समजून घेतले पाहिजे. अमेरिकेकडून कच्चे तेल खरेदी करताना होणारा सर्वात मोठा त्रास म्हणजे त्याचा मालवाहतूक खर्च. अमेरिका आणि भारत यांच्यातील अंतर खूप मोठे आहे. हे अंतर जास्त असल्याने वाहतुकीसाठी जादा खर्च करावा लागणार आहे. आता आपण मध्य पूर्वेतून तेल खरेदी करतो. हे अंतर कमी आहे आणि त्यामुळे वाहतूक खर्चही कमी आहे. परिणामी, भारताने अमेरिकेकडून अधिक कच्चे तेल खरेदी केल्यास आपल्या तिजोरीवर अतिरिक्त खर्च पडू शकतो; शिवाय ही रक्कम डॉलरमध्ये मोजावी लागणार आहे. परकीय चलनाच्या साठ्यावर त्याचा परिणाम होऊ शकतो. कच्च्या तेलाच्या किमतीही वाढू शकतात.

भारताने अमेरिकेकडून अधिक कच्चे तेल खरेदी करण्याचा विचार केला तर रशियाकडून आयात होणाऱ्या स्वस्त कच्च्या तेलाचा पर्याय सोडून द्यावा लागेल. त्यामुळे इंधन आयातीवरचा खर्च वाढू शकतो.

भारतातील तेल विपणन कंपन्या (ओएमसी) ची कमाई ते विकत असलेल्या पेट्रोल, डिझेल आणि एटीएफ (एव्हिएशन टर्बाइन इंधन) वर अवलंबून असते. कच्च्या तेलाच्या किमती वाढतात, तेव्हा या कंपन्यांचे 'मार्केटिंग मार्जिन' कमी होते, म्हणजेच कच्चे तेल विकून त्यांना मिळणारा नफा कमी होतो. अमेरिकेतून कच्च्या तेलाची आयात वाढल्यास 'ओएमसीं'ना अधिक महाग कच्चे तेल विकत घ्यावे लागेल. त्यामुळे त्यांच्या नफ्यावर विपरित परिणाम होईल. परिणामी, हा व्यवसाय भारतीय तेल कंपन्यांना आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरू शकत नाही. अमेरिकेकडून इंधन खरेदी करण्याच्या कराराचा विचार भारत करत असला, तरी अमेरिकेकडून इंधन आयात करणे महाग ठरू शकते. अमेरिकेकडून नैसर्गिक वायू (एलएनजी) खरेदी करण्याची परिस्थिती वेगळी आहे. अमेरिकेमध्ये नैसर्गिक वायू स्वस्त आहे आणि तो आयात करणे भारतासाठी फायदेशीर ठरू शकते; पण कच्च्या तेलाच्या बाबतीत परिस्थिती वेगळी आहे. भारताला अमेरिकेकडून अधिक तेल विकत घेण्याचा निर्णय घ्यावा लागला, तर ते आर्थिकदृष्ट्या योग्य नसेल. त्यामुळे महागाई वाढू शकते आणि ग्राहकांच्या खर्चात वाढ होऊ शकते. एकूणच, अमेरिकेकडून अधिक तेल खरेदी करण्याच्या वाटेत महागडे मालवाहतूक शुल्क, वाढलेल्या किमती आणि 'ओएमसीं'साठी कमी नफा या समस्या आहेत. रशिया आणि मध्य पूर्वेकडून स्वस्त तेलाचा पर्याय असताना अमेरिकेकडून तेल खरेदी करण्याचा निर्णय भारताच्या इंधन गरजांसाठी फायदेशीर ठरणार नाही. तथापि, भारताला आपल्या इंधन पुरवठ्यामध्ये विविधता आणण्याची गरज आहे; त्यासाठी अधिक परवडणाऱ्या आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर पर्यायांना प्राधान्य दिले पाहिजे.

# काय आहे आजचे रोजगार चित्र?

परामर्श

हेमंत देसाई
ज्येष्ठ पत्रकार



**2024-25 च्या आर्थिक सर्वेक्षणात रोजगाराचे उज्ज्वल चित्र सादर केले असले, तरी सेवा आणि बांधकामक्षेत्रात रोजगारघट आणि कृषी नोकऱ्यांमध्ये वाढ याबद्दल केवळ बोलून चालणार नाही. आजघडीला सरकार शेतीतून इतर क्षेत्रांकडे रोजगार वळवू शकलेले नाही. सरकारी नोकऱ्या घटून खाजगी नोकऱ्या वाढल्यानंतरच्या बारा वर्षांमध्ये खाजगी रोजगाराचे प्रमाण सतत वाढत असले तरी सरकारी रोजगार मात्र आक्रसू लागला आहे.**

नरसिंह राव पंतप्रधान असताना केंद्रीय अर्थमंत्री म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांनी आर्थिक सुधारणा आणल्यामुळे देशात एक नवमध्यमवर्ग निर्माण झाला. औद्योगिक उपक्रमशीलतेला चालना मिळून नवउद्योजक तयार होऊ लागले. तरुण-तरुणींना सरकारी नोकरीच्या बाहेर अन्य क्षेत्रे खुणावू लागली. यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात मध्यमवर्गासाठी अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी एक लाख कोटी रुपयांच्या करसवलती दिल्या आहेत. त्यामुळे सततची भाववाढ, घटलेले उत्पन्न आणि जीएसटी यामुळे संत्रस्त झालेल्या शहरी आणि निमशहरी भागातील मध्यमवर्गाला दिलासा मिळाला. बारा लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर करसवलतीची घोषणा करण्यात आली. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात मध्यमवर्ग तयार झाला, तो सार्वजनिक क्षेत्राच्या निर्मितीमुळे. विविध क्षेत्रांमध्ये सरकारी कंपन्या स्थापन करण्यात आल्या आणि 1995 मधील आकडेवारीनुसार, सरकारी कंपन्यांमध्ये जवळपास दोन कोटी रोजगार निर्माण झाला होता. तर संघटित खाजगी क्षेत्रात फक्त 80 लाखजणांना नोकऱ्या मिळाल्या होत्या. 2012 पर्यंत ही आकडेवारी अनुक्रमे पावणेदोन कोटी आणि एक कोटी 19 लाख अशी झाली. याचा अर्थ, सरकारी नोकऱ्या घटू लागल्या आणि खाजगी नोकऱ्या वाढल्या. त्यानंतरच्या बारा वर्षांत खाजगी रोजगाराचे प्रमाण आणखी वाढून, सरकारी रोजगार मात्र आक्रसू लागला.

भारतात सर्वाधिक नोकऱ्या या रेल्वेमध्ये आहेत. परंतु 1990- 91 ते 2022-23 या काळात रेल्वेमध्ये नोकरी करणाऱ्यांची संख्या सुमारे 16 लाखांवरून 12 लाखांवर आली. एक तर रेल्वेतील केटरिंगपासून अनेक प्रकारच्या सेवांचे खाजगीकरण झाले आहे. काही मार्गदेखील खाजगी कंपन्यांकडे सोपवण्यात आले आहेत. यांत्रिकीकरण साहजिकच वाढले आहे. दुसरीकडे, आर्थिक उदारीकरणानंतर सर्वाधिक विस्तारणारे क्षेत्र म्हणजे माहिती तंत्रज्ञान किंवा आयटी. दुसऱ्या मध्यमवर्गीय क्रांतीचे ते प्रतीकच बनले होते. आपला मुलगा किंवा मुलगी आयटी क्षेत्रामध्ये नोकरी करत आहे, हे अत्यंत अभिमानाने सांगणारे पालक जागोजागी दिसू लागले. 2004 मध्ये टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस आणि इन्फोसिसमध्ये अनुक्रमे 45 हजार आणि 36 हजार कर्मचाऱ्यांना नोकऱ्या मिळाल्या होत्या. त्यानंतरच्या वीस वर्षात हा आकडा अनुक्रमे साडेचार लाख आणि अडीच लाख इतका वाढला. परंतु खरी तेजी आली, ती कोविड महामारी संपल्यानंतर. कारण त्यामुळे भारतातील डिजिटलीकरणाची प्रक्रिया अत्यंत गतिमान झाली. ऑनलाइन व्यवहार होऊ लागले आणि भारतीय कंपन्यांची क्षमतादेखील वाढली. भारताच्या सॉफ्टवेअर निर्यातीत लक्षणीय भर पडू लागल्याने, आयटी कंपन्यांमधील रोजगार आणखी वाढला. केवळ टीसीएस, इन्फोसिस, विप्रो, एचसीएल टेक्नॉलॉजीज आणि टेक महिंद्रा या पाच कंपन्यांमध्ये सुमारे 16 लाख लोक काम करत आहेत.

भारतीय रेल्वेमध्ये आज कायमस्वरूपी साडेबारा लाख लोक काम करतात, त्यापेक्षाही आयटीमध्ये जास्त लोकांना नोकऱ्या मिळाल्या आहेत. सर्वाधिक विस्तार अनुभवणारे दुसरे क्षेत्र म्हणजे बँकिंग. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या प्रक्रियेत वित्तीय सेवांना महत्त्व आले आहे. शिवाय डिजिटलीकरणामुळे बँकिंग व्यवहारांचा वेग वाढला आणि नवनवीन वित्तीय प्रॉडक्ट्स बाजारात येऊ लागली. कर्जबाजारी झालेल्या राष्ट्रीयीकृत बँकांची परिस्थिती सुधारली, परंतु त्याचबरोबर काही बँका आपापसात विलीन करण्यात आल्या. त्यामुळे त्या अधिक सक्षम झाल्या. त्याचबरोबर खाजगी बँकांचा व्यवहार सावधगिरीचा राहिला असल्यामुळे त्यांचा नफा दिवसेंदिवस फुगतच होता. राष्ट्रीयीकृत आणि खाजगी बँकांमध्ये मुख्यतः मध्यमवर्गातील लोकच अधिक प्रमाणात कामाला आहेत. 1991-92 मध्ये शेड्यूल व्यापारी बँकांमध्ये सुमारे दहा लाख लोकांना नोकऱ्या मिळाल्या होत्या. त्यामधील साडेआठ लाख लोक हे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये काम करत होते. आज तंत्रज्ञानाच्या वापरामुळे खाजगी बँकांमधील रोजगाराचे प्रमाण सुमारे सहा लाख इतके आहे. परंतु सरकारी बँकांमध्ये आजदेखील सुमारे पावणेआठ लाख लोक काम करत आहेत. 2023-24 मध्ये मात्र सरकारी क्षेत्रापेक्षा खाजगी बँकांमधील रोजगार जास्त झाला आहे. राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये साडेसात लाख लोक कामाला आहेत, तर खाजगी बँकांमध्ये पावणेनऊ लाख! क्षेत्र खाजगी असो वा सरकारी, तरुण हातांना काम मिळणे हे अधिक महत्त्वाचे आहे.

आजघडीला एचडीएफसी, आयसीआयसीआय, ॲक्सिस, कोटक महिंद्र आणि बंधन बँक या पाच बँकांमध्ये मिळूनच सहा लाखजण काम करत आहेत. सरकारी बँकांमध्ये सर्वाधिक रोजगार देणारी बँक म्हणजे स्टेट बँक. तेथे 2 लाख 32 हजार लोक काम करत आहेत. मात्र कमी माणसांमध्ये जास्त नफा मिळवणे आज अधिक महत्त्वाचे आहे. आर्थिक शिथिलीकरणामुळे बँकिंग, विमा, म्युच्युअल फंड, शेअर दलाली, अकाउंटन्सी, आरोग्य, कायदा सल्ला, पर्यटन, वाहतूक, लॉजिस्टिक्स, हवाई सेवा, माध्यम, जाहिरात, क्रीडा, करमणूक, रिअल इस्टेट आणि रिटेल या क्षेत्रांमध्ये प्रचंड संधी उत्पन्न झाल्या आहेत. ज्याप्रमाणे चीनमधून जगात विविध प्रकारचा माल धाडला जातो, त्याप्रमाणे भारतातून अनेक कंपन्यांचे बॅक ऑफिस चालवले जाते. परंतु बांधकाम, स्वच्छता, सुरक्षा, घरगुती कामे, शॉप असिस्टंट वगैरे क्षेत्रांमध्ये कामगारांना तुलनेने पगार कमी असतो. उबेरमध्ये दहा लाख ड्रायव्हर्स काम करतात, तर झोमॅटोमध्ये दरमहा सरासरी चार लाख 80 हजार डिलिव्हरी बॉईजना काम मिळते. स्विगीमध्ये साडेपाच लाख तर अन्य क्विक कॉमर्स सेवांमध्ये दीड लाख लोकांना नोकऱ्या मिळाल्या आहेत. परंतु या प्रकारच्या नोकऱ्यांमधून मध्यमवर्गीय जीवन जगण्याइतपत वेतन मिळत नाही. तसेच भारतातील मध्यमवर्ग मुख्यतः सेवा क्षेत्रात काम करतो. आपल्याकडे उत्पादन क्षेत्र तेवढे विकसित झालेले नाही. त्या क्षेत्रात सरासरी उत्पन्न जास्त असते. आजही उत्पादन क्षेत्रातील रोजगार दहा टक्क्यांच्या आसपास आहे. हे प्रमाण एकूण रोजगाराच्या 25 टक्क्यांवर पोहोचवण्याचे लक्ष्य दहा वर्षांपूर्वीच जाहीर करण्यात आले होते!

2024-25 च्या आर्थिक सर्वेक्षणात रोजगाराचे उज्ज्वल चित्र सादर केले असले, तरी सेवा आणि बांधकाम क्षेत्रात रोजगारघट आणि कृषी नोकऱ्यांमध्ये वाढ याबद्दल बोलून सरकार शेतीतून रोजगार इतर क्षेत्रांकडे वळवू शकले नाही हे सिद्ध झाले आहे. सरकारने 2023-24 च्या आर्थिक सर्वेक्षणात म्हटले होते की, भारतीय अर्थव्यवस्थेला वाढत्या कामगार लोकसंख्येला उत्पादकतेने गुंतवून ठेवण्यासाठी 2030 पर्यंत दर वर्षी 7.85 दशलक्ष सरासरी बिगरशेती नोकऱ्या निर्माण कराव्या लागतील. याचा अर्थ असा की शेतीपासून बिगरकृषी रोजगाराकडे संक्रमण साध्य करण्यासाठी भारताला दर वर्षी सुमारे 3.5 दशलक्ष लोकांना शेतीतून काढून टाकावे लागेल आणि बिगरकृषी क्षेत्रात 7.85 दशलक्ष नोकऱ्या निर्माण कराव्या लागतील. 2024-25 च्या आर्थिक सर्वेक्षणातून दिसून येते की, सरकार लोकांना कृषी क्षेत्रापासून सेवा किंवा उत्पादन क्षेत्राकडे वळवू शकलेले नाही. आर्थिक सर्वेक्षणात म्हटले आहे की रोजगारात कृषी क्षेत्र अजूनही आघाडीवर आहे. 2017-18 मध्ये रोजगारामध्ये त्याचा वाटा 44.1 टक्के होता. 2023-24 मध्ये तो 46.1 टक्के झाला आहे. म्हणजेच, गेल्या सहा वर्षांमध्ये रोजगारासाठी शेतीवरील अवलंबित्व दोन टक्क्यांनी वाढले आहे.

या आकडेवारीवरून दिसून येते की शेतीव्यतिरिक्त इतर क्षेत्रे रोजगारनिर्मितीमध्ये यशस्वी होत नाहीत. 2024-25 च्या आर्थिक सर्वेक्षणात असेही म्हटले आहे की रोजगारामध्ये उद्योग आणि सेवा क्षेत्राचा वाटा कमी झाला आहे. सर्वेक्षण दस्तावेजात, पीरियडिक लेबर फोर्स सर्व्हे (पीएलएफएस) 2023-24 च्या अहवालाचा हवाला देऊन म्हटले आहे की 2017-18 च्या तुलनेत 2023-24 मध्ये रोजगार प्रदान करण्यात उत्पादन क्षेत्राचा वाटा 12.1 टक्क्यांवरून 11.4 टक्क्यांपर्यंत कमी झाला आणि सेवा क्षेत्राचा वाटा 31.1 टक्क्यांवरून 29.7 टक्क्यांपर्यंत कमी झाला. 2024-25 च्या आर्थिक सर्वेक्षणात असेही म्हटले आहे की कृषी क्षेत्रात महिला कामगारांच्या वाट्यात लक्षणीय वाढ झाली आहे. यावरून असेही दिसून येते की इतर क्षेत्रांमध्ये अपेक्षित रोजगारनिर्मिती होत नाही. आर्थिक सर्वेक्षणात असेही म्हटले आहे की महिला कृषी रोजगार 2017-18 मध्ये 73.2 टक्क्यांवरून 2023-24 मध्ये 76.9 टक्क्यांपर्यंत वाढला आहे तर पुरुषांचा सहभाग 55 टक्क्यांवरून 49.4 टक्क्यांपर्यंत घसरला आहे. शहरी भागातील महिला प्रामुख्याने इतर सेवांमध्ये काम करतात. या क्षेत्रातील त्यांचा वाटा 44.4 टक्क्यांवरून 40.1 टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे.

खेचाखेची

## ...म्हणून सुटलो

शाळेत जर आपण मागच्या बेंचवर बसलो नसतो तर ...

.
.
.
.
.
.

आज आपण अमेरिका, यूक्रेन, रशिया यासारख्या एखाद्या देशामध्ये कुठे तरी वाईट पद्धतीनं अडकलो असतो...!

वेगळं काही

✻ अलास्का आणि कमाडोअर बेटांजवळच्या बेरिंग समुद्रात 'स्टालर्स सी काउ' नावाचा सजीव आढळतो. जॉर्ज स्टालर्सनामक संशोधकाने त्याचा शोध लावल्याने याच नावाने तो ओळखला जातो. विशालकाय असणारा सजीव शाकाहारी आहे. हे महाकाय शरीरच त्याच्या नष्ट होण्याचं कारण बनलं आहे. शोध लागल्यानंतरच्या अवघ्या २७ वर्षांतच तो नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. प्रचंड मोठ्या आकारामुळे तो लगेचच शिकाऱ्यांच्या नजरेत भरतो.

✻ उत्तर अमेरिका आणि आसपासच्या भागात 'पॅसेंजर पीजन' ही कबुतराची जात आढळते. हा पक्षी नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. जंगलतोड आणि शिकारीमुळे त्यांची संख्या कमी होत आहे.

फॅशन फॅशन

## मोजडीची नजाकत


बऱ्याच महिलांकडे पादत्राणांचे किमान तीन ते चार जोड तरी असतातच. त्यात काही नवनवीन प्रकारच्या पादत्राणांची भर पडत असते. सध्या फॅशनविश्वात समर फुटवेअरचा ट्रेंड आहे. अर्थात ही पादत्राणं उन्हाळ्यातच नाही तर प्रत्येक मोसमात कूल लूक देतात. पादत्राणांच्या अशाच काही हटके डिझाइन्सवर एक नजर टाकू या.

✻ पंजाबी मोजडीला अनेकींची पसंती असते. कुर्ता–लेगिंग, सलवार–कमीज किंवा अगदी जीन्सवर या मोजडी चालून जातात. लग्न, पार्टीसाठी शिमरी वर्कवाली मोजडी ट्राय करायला हरकत नाही. सोबतच मिरर वर्क, थ्रेड वर्क, सीक्वेंस वर्क, नेट फ्रील, फ्लोरल प्रिंटवाल्या मोजड्याही घेता येतील.



✻ कॅज्युअल लूकसाठी 'बो स्टाईल' स्लीपर घेता येईल. थ्रेड वर्कवाल्या स्लीपर्सही जीन्स, पलाझोवर चालून जातील. डेनिम स्टाईल स्लीपर ट्रेंडी दिसते. या दिवसात डेनिम विथ थ्रेड वर्कवाल्या स्लीपर वापराव्या.

✻ बूट स्टाईल पंजाबी मोजडी हा प्रकारही इन आहे युनिक प्रिंटवाल्या या मोजड्यांमुळे तुम्ही स्टाईल आयकॉन ठराल. पंजाबी मोजडी स्टाईल लोफर्स हा प्रकारही ट्राय करता येईल. भटकंतीसाठी फ्लोरल प्रिंटवाले शूज घेऊ शकता.




राशीभविष्य

- **मेष** : अचानक धनप्राप्ती होईल. व्यवसायातील वाद–विवाद वेळीच टाळावेत. अनुकूल घटना घडतील.
- वृषभ : मित्रांचं सहकार्य लाभल. आपापल्या क्षेत्रात मानसन्मान लाभेल. व्यवसायात प्रगती होईल.
- मिथुन : कौटुंबिक समस्या दूर होतील. घाईने निर्णय घेऊ नका. अनावश्यक खर्च टाळायला हवा.
- कर्क : महत्त्वाच्या कामांमध्ये अधिक लक्ष द्या. आत्मविश्वास वाढणार आहे. मनासारख्या घटना घडतील.
- सिंह : मानसिक स्वास्थ्य लाभेल. भावाच्या सहकार्याने आर्थिक प्रश्न मिटतील. वाहन सौख्य लाभेल.
- कन्या : सामाजिक कार्यात प्रगती होईल. आप्तेष्टांच्या भेटी होतील. व्यवसायात अनुकूलता राहील.
- तूळ : योजलेली कामं होतील. भागीदारांशी मतभेद टाळायला हवेत. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.
- वृश्चिक : इच्छा–आकांक्षा पूर्ण होतील. थोरामोठ्यांचं सहकार्य लाभेल. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- धनु : नोकरीत मनासारख्या घटना घडतील. केलेल्या कामाचं इतरांकडून कौतुक होईल. वादविवाद टाळा.
- मकर : नवीन कामाचा प्रारंभ नको. व्यवसायात नुकसान संभवते. महत्त्वाचे निर्णय विचारपूर्वक घ्यावेत.
- कुंभ : योजलेली कामं होतील. खर्च वाढला तरी प्राप्तीही समाधानकारक राहील. स्पर्धांमध्ये यश मिळेल.
- मीन : कौटुंबिक वातावरण आनंदी राहील. हाती घेतलेल्या कामात यश मिळेल. स्वाभिमानाने रहायला हवं.

सल्ला मोलाचा

## अस्सा हेअरकट सुरेख बाई!.

'अँटी एजिंग' हेअरकट्सविषयी... ✻ लाँग लेअर्स– पातळ होणाऱ्या केसांना बाऊंसी लूक देणारा हा हेअरकट आहे. या हेअरकटमुळे केसांची घनता जास्त दिसण्यास मदत होते. केसांची लांबी कमी करण्याची इच्छा नसल्यास तुम्ही चेहऱ्याजवळील लेअर्स वाढवू शकता. ✻ मॉडर्न शॅग– लांबसडक, पाठीवर रुळणाऱ्या केसांऐवजी आखुड पण दाट केस हवे असणाऱ्यांसाठी ही परफेक्ट हेअरस्टाईल आहे. बरेचदा केस मुळांजवळ जास्त विरळ दिसू लागतात. अशा वेळी मॉडर्न शॅग तुम्हाला यंग लूक देण्यास मदत करू शकतो. केस आखुड ठेवले तर बाऊंसी इफेक्ट येतो आणि केसांचा विरळपणा झाकला जातो. ✻ लाँग बॉब– वयाच्या एका टप्प्यावर केसांची मुळं नाजूक होतात. लाँग बॉब हेअरकट हा केसांना फुगीरपणा देतो. परिणामी दाट दिसू लागतात. या स्टाईलमध्ये केसांचे शेंडे बोथट केले जातात. ✻ पिक्सि हेअरकट– अनेकदा काळजी घेण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. अशा स्त्रियांनी पिक्सि हेअरकट निवडावा. आखूड केसांची आवड असणाऱ्यांसाठी हा योग्य पर्याय आहे. केसांची लांबी कमी असल्याने सतत मेंटेन करण्याचा व्याप वाचतो. केस मॅनेजेबल राहतात.

दिनविशेष

## १५ मार्च

**जागतिक ग्राहक दिन**

२०१५ : ज्येष्ठ गायिका कृष्णा कल्ले यांचे निधन.
२०१६ : 'रिअल इस्टेट' विधेयक लोकसभेत मंजूर.
२०१७ : शशांक मनोहर यांचा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या कार्याध्यक्षपदाचा राजीनामा.
२०१८ : नवी दिल्लीत आपल्या राजनैतिक अधिकारी–कर्मचाऱ्यांचा छळ होत असल्याचा कांगावा करत पाकने उच्चायुक्तांना मायदेशी बोलावलं.

महत्त्वपूर्ण काही...

## डोकेदुखीविषयी...

डोक्याभोवतीचे स्नायू, रक्तवाहिन्या, नसा दुखू लागल्या की डोक्याजवळ वेदना जाणवतात. डोक्यालगतच्या नसा किंवा रक्तवाहिन्या सुजतात. यामुळेही वेदना जाणवतात. नसा आणि रक्तवाहिन्यांमध्ये काठिण्य निर्माण होतं किंवा त्यात इतर काही बदल होतात. यामुळे आसपासच्या नसांवर दाब येतो. या नसांच्या माध्यमातून मेंदूला वेदनेचा संदेश पाठवला जातो आणि आपल्याला डोकेदुखीची जाणीव होते. डोकेदुखीचे वेगवेगळे प्रकार आहेत. ताणतणाव किंवा स्नायूंच्या एकत्रीकरणामुळे होणारी डोकेदुखी हा प्रकार सर्वसाधारणपणे आढळतो. मायग्रेन किंवा अर्धशिशीमध्ये डोकं प्रचंड प्रमाणात दुखतं. सर्दी–खोकला किंवा इतर काही कारणांमुळे डोकं दुखू लागतं. आजार पळाला की डोकेदुखी थांबते. रात्रीचं जागरण, वेळेवर न जेवणं, जास्त वेळ टिव्ही बघणं, मोबाईलवर खेळणं, जास्त वेळ उन्हात राहिल्यामुळेही डोकं दुखू शकतं. परीक्षेचा ताण किंवा एखाद्या गोष्टीची अधिक उत्सुकता असेल तर डोकं दुखू शकतं. त्यामुळे डोकं दुखण्यामागचं नेमकं कारण जाणून घ्या आणि त्यानुसार उपचार करा.

पंचांग

**शनिवार, १५ मार्च २०२५**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
फाल्गुन कृ. १, नक्षत्र : उ. फाल्गुनी,
चंद्रराशी : कन्या, योग : गंड,
सूर्योदय : ६.४९, सूर्यास्त : ६.४६

फॉरवर्डस

सद्यस्थितीचं नेमकं वर्णन करणाऱ्या या ओळी बघा...

**किसी ने मुझसे पूछा**
**ज़िन्दगी कैसे बर्बाद हुई,**
**मैने ऊँगली उठायी और**
**मोबाईल पर रख दी!**

आरोग्यमंत्र

## ॲपेंडिक्स आहे?

सध्या रुग्णांचं प्रमाण आणि आजारांची व्याप्ती वाढताना दिसत आहे. बदलती जीवनशैली, ढासळलेली रोगप्रतिकारक शक्ती आणि निकृष्ट दर्जाचा आहार यांच्या एकत्रित परिणामामुळे ॲपेंडिक्सच्या रुग्णांची संख्या प्रचंड वेगानं वाढत आहे. पाठीत वा पोटात सतत दुखणं, भूक कमी लागणं, सतत उलटी आणि चक्कर येणं, बद्धकोष्ठता, लघवी करताना वेदना होणं, थंडी वाजणं ही ॲपेंडिक्सची लक्षणं असू शकतात. त्यामुळे वेळेतच काही घरगुती उपाय केल्यास ॲपेंडिक्सची शक्यता टळू शकेल. परंतु त्रास जास्त होत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणं अत्यंत गरजेचं आहे. आता यावरील काही उपाय लक्षात घेऊ.



✻ सकाळी रिकाम्यापोटी तुळशीची पानं चावून खा. यामुळे हा विकार दूर होतो.

✻ जेवणाअगोदर पिकलेल्या टोमॅटोच्या फोडींवर सैंधव मीठ घालून खा. यामुळे काही दिवसांतच पोटदुखी वा सूज या त्रासापासून आराम मिळेल.

✻ दररोज दिवसातून कमीत कमी दोन वेळा आल्याचा चहा प्या. यामुळे ॲपेंडिक्सच्या वेदना आणि सूज कमी व्हायला मदत होते.

✻ पालक सूप वा पालकाची भाजी खा. यामुळेही ॲपेंडिक्सनं आलेली सूज कमी होते.

✻ कपभर पाण्यात दोन चमचे मेथी घालून पाणी उकळवा. हे पाणी दिवसातून एकदा प्या. यामुळेही वेदना आणि सूज कमी होईल.

वाचा तर खरं

✻ मुलं सहसा आयब्रो करत नाहीत. भुवया ट्रिम करणं हा प्रकार त्यांच्या गावीच नसतो. पण तुम्ही भुवया ट्रिम करायला सुरूवात करा. ✻ नखांजवळच्या त्वचेकडे विशेष लक्ष द्यायला हवं. क्युटिकल ऑईलचा वापर तुम्ही करू शकता. या तेलामुळे नखाजवळची त्वचा चांगली राहिल. ✻ दाढी करताना गळ्याकडे दुर्लक्ष करू नका. तसंच तोंड धुताना मान आणि गळ्याकडचा भागही स्वच्छ धुवा. ✻ मुलं बरेचदा पूर्ण बाह्यांचा शर्ट घालतात. त्यामुळे मुलांकडे हँडक्रीम नसते. दर्जेदार हँडक्रीम आणा. सकाळी नाही तर रात्री झोपण्याआधी हे क्रीम लावून झोपा. यामुळे हात कोरडे होणार नाही.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

At a Glance

## आणखी पाच वर्षे पदावर कायम राहणार

**बेंगळुरू :** कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी काँग्रेसपुन्हा सत्तेत येईल आणि पुढील पाच वर्षे मुख्यमंत्रीपदावर कायम राहणार असल्याचे म्हटले आहे. सरकारने काँग्रेस कार्यकर्त्यांची हमी समितीचे अध्यक्ष व सदस्य म्हणून नियुक्ती केल्याने आमदार आणि विधान परिषद सदस्यांचा अनादर होत असल्याचा आरोप करत विधानसभेतील विरोधी पक्ष भाजपच्या सदस्यांना उत्तर देताना सिद्धरामय्या बोलत होते. विरोधी पक्षनेते आर. अशोक यांनी काँग्रेस सरकार चुकीचा आदर्श घालून देत असून पुढील सरकारसाठी अधिक आव्हानात्मक असल्याचा आरोप केला. लगेचच मुख्यमंत्र्यांनी त्यांचा युक्तिवाद फेटाळून लावला आणि काँग्रेसच सत्तेवर येईल, असा दावा केला.

## जयपूरमध्ये बनावट नोटांसह एकाला अटक

**जयपूर :** एक लाख पाच हजार रुपयांच्या बनावट नोटांसह एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. जयपूर ग्रामीणचे विशेष पथक आणि अमरसर पोलिस ठाण्याच्या जवानांनी आरोपी सचिन यादव (२१) याला अटक केली. माहितीच्या आधारे यादव यांना धनोता गावातील चेकपोस्टवर रोखण्यात आले. त्याच्याकडून ३९ हजार रुपयांच्या १०० रुपयांच्या ३९० बनावट नोटा आणि ६६ हजार रुपयांच्या २०० रुपयांच्या ३३० बनावट नोटा जप्त करण्यात आल्या. त्याला ताब्यात घेण्यात आल्याची माहिती उपमहानिरीक्षक आनंद शर्मा यांनी दिली.

# रशिया-युक्रेन युद्धबंदीकडे...

## व्लादिमीर पुतिन यांची सौदी क्राउन प्रिन्स यांचेबरोबर चर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी सौदी अरेबियाचे क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांच्याशी फोनवर चर्चा केली असून, रशिया-युक्रेन युद्धात शांतता प्रस्थापित करण्याच्या मुद्द्यावरही दोघांमध्ये चर्चा झाली असल्याचे माध्यमांनी दिलेल्या वृत्तात म्हटले आहे.

रशियाने दिलेल्या निवेदनानुसार, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी फेब्रुवारीमध्ये रशिया आणि अमेरिकेतील राजदूतांमध्ये चर्चा आयोजित करण्यासाठी सौदी अरेबियाच्या मध्यस्थीच्या प्रयत्नांबद्दल सौदी क्राउन प्रिन्सचे आभार मानले.

सौदी अरेबियाच्या सरकारी वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, सौदी क्राउन प्रिन्सने रशियन राष्ट्राध्यक्षांना सांगितले की युक्रेन संकटाच्या पार्श्वभूमीवर संवाद पूर्णपणे सुलभ करण्यासाठी आणि राजकीय तोडगा काढण्यास त्यांचे शासन वचनबद्ध आहे, असे म्हटले आहे.

युक्रेन संकटाव्यतिरिक्त, अध्यक्ष पुतिन आणि सौदी अरेबियाचे क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांच्यातील फोन कॉलमध्ये ओपेक+ च्या मुद्द्यावरही चर्चा झाली. यावेळी, दोन्ही देशांच्या नेत्यांनी ओपेक+ वचनबद्धता राखण्याच्या महत्त्वावर एकमेकांशी सहमती दर्शवली. दोन्ही देशांच्या नेत्यांनी ओपेक+ कराराअंतर्गत त्यांच्या सर्व जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी एकमेकांशी वचनबद्धता व्यक्त केली, असे रशियाने निवेदनात म्हटले आहे.

### अमेरिकेच्या प्रस्तावावर रशिया-युक्रेन सहमत

● रशिया-युक्रेन युद्धादरम्यान शांतता प्रस्थापित करण्यासाठी रशियन, युक्रेनियन आणि अमेरिकन राजदूत आणि अधिकारी सौदी अरेबियामध्ये शांतता चर्चा करत आहेत हे उल्लेखनीय आहे. याअंतर्गत, रशिया आणि युक्रेनमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी चर्चेचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. या काळात अमेरिकेने ३० दिवसांचा युद्धविराम प्रस्तावित केला आहे. ज्यावर युक्रेन आणि रशिया दोघांनीही आपली संमती दिली आहे.

# विरारमध्ये बारावीच्या उत्तरपत्रिका जळाल्या



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पालघर :** बारावीच्या उत्तरपत्रिका जळाल्या प्रकरणी विरारमधील प्राचार्य आणि शिक्षकांवर बोळींज पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. उत्तरपत्रिका घरी नेण्याची परवानगी नसतानाही बेकायदेशीररित्या या उत्तरपत्रिका घरी नेण्यात आल्याचा ठपका ठेवत हा गुन्हा दाखल करण्यात आला. बारावी कॉमर्सच्या ऑर्गनायझेशन ऑफ कॉमर्स या विषयाच्या १७५ उत्तरपत्रिका जळाल्या होत्या.

विरारमध्ये १२ वी कॉमर्सच्या तपासणीसाठी आलेल्या उत्तरपत्रिका शिक्षिकेच्या घरी जळल्याची धक्कादायक घटना उघड झाली. विरारच्या नानाभात या परिसरात राहणाऱ्या प्रिया रोड्रिंक्स या शिक्षिकेच्या घरी ही घटना घडली. उत्तरपत्रिका जळाल्याचा व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर ही घटना उघडकीस आली. याबाबत बोळींज पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. जळालेल्या उत्तरपत्रिका पोलिसांनी ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला.

बारावी कॉमर्सच्या ऑर्गनायझेशन ऑफ कॉमर्स या विषयाच्या एकूण ३०० उत्तरपत्रिका शिक्षिकेने तपासणीसाठी घरी नेल्या होत्या. घरात अचानक आग लागली आणि या आगीत संपूर्ण उत्तरपत्रिकांचा गठ्ठा जळून खाक झाला. त्यामध्ये १७५ उत्तरपत्रिका जळाल्या.

# क्रिप्टो करन्सीच्या सूत्रधाराला केरळात अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** अमेरिकेत गॅरन्टेक्स नावाची क्रिप्टो करन्सी चालवणाऱ्या लिथुआनियाचे नागरिकत्व घेतलेल्या रशियन वंशाच्या अलेक्सेई बेशिओकोव्ह याला अमेरिकेच्या विनंतीनुसार केरळ पोलिसांनी अटक केली आहे. त्याने 96 अब्ज डॉलरची क्रिप्टो करन्सी एक्स्चेंज चालवली. त्याद्वारे दहशतवादी गट, अमली पदार्थ तस्कर आणि सायबर गुन्हेगारांना चलन पुरवठा करण्यास मदत केल्याचा त्याच्यावर आरोप आहे.

ही अटक अमेरिकेच्या नेतृत्वाखालील एका तीव्र शोधमोहिमेचा भाग आहे. गेल्या आठवड्यात या प्रकरणात मोठी कारवाई झाली. त्या क्रिप्टो एक्स्चेंजवर नियंत्रण मिळवण्यात आले. 26 दशलक्ष इतकी संपत्ती जप्त करण्यात आली आणि बेशिओकोव्ह व त्याच्या एका सहकाऱ्याविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले.

अमेरिका बेशिओकोव्हचे व्हर्जिनिया येथे प्रत्यार्पण करण्याचा प्रयत्न करणार आहे. जर हे प्रत्यार्पण यशस्वी झाले, तर आंतरराष्ट्रीय मनी लॉंडरिंग नेटवर्कवर कारवाई करण्याच्या लढ्यात मोठे यश मिळेल, असे अमेरिकेच्या न्याय विभागाने म्हटले आहे. अमेरिकेच्या न्याय विभागाच्या मते, बेशिओकोव्ह हा रशियामध्ये वास्तव्यास होता; पण तो भारतात का आला होता याचे नेमके कारण समजू शकले नाही. भारतात, केरळ पोलिसांनी त्याला अटक केली आहे. भारतीय केंद्रीय अन्वेषण विभागाने बेशिओकोव्हला फरार आरोपी म्हणून संबोधले आहे. अमेरिकेच्या न्याय विभागाच्या प्रवक्त्या निकोल नावास ऑक्समन यांनी अटक झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला.

# देशभरात होळी उत्साहात साजरी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** देशात शुक्रवारी होळी उत्साहात साजरी करण्यात आली आणि नागरिकांनी एकमेकांना रंग लावत शुभेच्छा आणि मिठाईची देवाणघेवाण केली.

रंगांची उधळण करत भारतीयांनी पारंपरिक पदार्थांचा आस्वाद घेतला. देशात सर्वत्र घरे आणि रस्ते रंगीबेरंगी झाले होते. बहुतांश प्रमुख शहरांमध्ये सकाळी सार्वजनिक वाहतूक सुरू झाली नाही, तर दुपारपासून मेट्रो सेवा सुरू झाली. दरम्यान, रमजान महिन्यात दुसऱ्या शुक्रवारच्या नमाजसोबत होळी असल्याने, अनेक राज्यांमध्ये गस्त आणि नाकाबंदीसह सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली होती.

दिल्लीत २५ हजारांहून अधिक सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले होते. पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेरे आणि ड्रोनद्वारे सुमारे ३०० संवेदनशील भागांवर बारकाईने लक्ष ठेवले. कोणतेही गालबोट लागले नसल्याचे वृत्त होते.

# सीतारामन तामिळनाडूवर संतापल्या; रुपयाचे चिन्ह बदलले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** हिंदी भाषेवरुन तामीळनाडू व केंद्र सरकारमध्ये वादाची ठिणगी पडली आहे. यातच आता तामिळनाडूतील स्टॅलिन सरकारने आपल्या अर्थसंकल्पात रुपयाचे चिन्ह बदलले आहे. यावरुन केंद्र व तामिळनाडूमध्ये मतभेद निर्माण झाले आहेत. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी तामिळनाडू सरकारचा खरपूस शब्दात समाचार घेतला आहे. रुपयाचे चिन्ह बदलने म्हणजे 'अलिप्ततावादी मानसिकता' असल्याची टीका त्यांनी केली आहे.

तामिळनाडूने २०२५-२६ चे बजेट सादर करताना रुपयाचे चिन्ह हटवले, यावरुन सीतारामन यांनी म्हटले आहे की २०१० मध्ये ज्यावेळी देशामध्ये युपीएचे सरकार होते. त्यावेळी हे चिन्ह वापरात आणले होते, त्यावेळी त्यांनी यावर आक्षेप का नोंदवला नाही, असा जाब त्यांनी एक्सवर पोस्ट करत तामिळनाडू सरकारला विचारला आहे.

२०१० मध्ये युपीए सरकारचा एक घटकपक्ष म्हणून डीएमके सत्तेत होता, त्यावेळी त्यांनी या चिन्हावर आक्षेप घेतला नाही. महत्वाची बाब म्हणजे डीएमकेचे माजी आमदार एन. धर्मलिंगम यांचे पुत्र टी.डी. उदयकुमार यांनी या चिन्हाचे डिझायन केले आहे. पण आता तामिळनाडू सरकारने चिन्ह न वापरल्याने राष्ट्रीय प्रतिक मिटवण्याचा प्रयत्न करत आहे, असा घणाघातही सीतारामन यांनी केला आहे.

> ‘रुपई’ या तमिळ शब्दाचा संस्कृत शब्द ‘रुपया’शी संबध आहे, याचा अर्थ ‘चांदीचा शिक्का’ असा होतो. त्यामुळे हा शब्द तामिळमधील व्यापार, साहित्य व संस्कृतीमध्ये खोलवर रुजलेला आहे. ‘रुपई’ तामिळनाडू बरोबरच श्रीलंकेमध्येही प्रचलित आहे. तसचे इंडोनेशिया, मालदीव, मॉरेशिअस, नेपाळ व सेशेल्समध्येही ‘रूपया’ हाच शब्द चलनासाठी प्रचलित आहे. तसेच रुपयासाठी असलेले ‘₹’ हे चिन्ह आंताराराष्ट्रीय स्तरावर चांगल्याप्रकारे ओळखले जाते. तसेच या ‘₹’ चिन्हामुळे वैश्विक स्तरावर रुपयाला चांगली ओळख बनवता आली आहे. युपीआय हे पेमेंट ॲप आता इतर देशातही वापरण्यासाठी भारत प्रयत्न करत आहे. अशावेळी आपल्याच प्रतिकाला कमजोर करावे का? -**निर्मला सीतारामन,** केंद्रीय अर्थमंत्री

पान १ वरून

## राज्याचा धरणसाठा ५३.४१ टक्क्यांवर

५३ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे.

राज्यात लघु मध्यम आणि मोठ्या अशा एकूण २९९७ धरणांमध्ये होळीच्या दिवशी ५३.४१ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. नागपूर व अमरावती विभागात ४९.३० टक्के आणि ५७.८८ टक्के पाणीसाठा आहे. मराठवाड्यातील ९२० धरणांमध्ये ५२ टक्के पाणी शिल्लक असून मागील वर्षी याच सुमारास मराठवाड्यात केवळ २३.५३ टक्के पाणीसाठा शिल्लक होता. नाशिकच्या ५३७ धरणांमध्ये आज ५३.६८ टक्के पाणी शिल्लक आहे. पुणे विभागातील धरणांमध्ये ५२.९७ टक्के तर कोकण विभागात ५८.१३ टक्के पाणीसाठा आहे.

मराठवाड्यातील हजारो नागरिकांची तहान भागवणारे जायकवाडी धरण सध्या ६३ टक्क्यांवर आहे. गेल्यावर्षी जायकवाडीत याच तारखेला २४.४४ टक्के पाणी शिल्लक होते. पुण्यातील डिंभे धरण ४५.३६ टक्के, भाटघर ६१.५५ टक्के तर खडकवासला ६९ टक्क्यांवर आहे. मागील वर्षी शून्यावर असलेले उजनी धरण ४३.२९ टक्क्यांवर आहे, असे जलसंपदा विभागाने सांगितले. यासोबतच निम्न तेरणात सध्या ७४.०२ टक्के साठा आहे. गतवर्षी केवळ ५.५३ टक्के पाणी होते.

## अंजली दमानियांकडून नवे आरोप

दमानिया यांची आक्रमक बाजूही कारणीभूत ठरली. सरपंच हत्या प्रकरणात पहिल्यापासून बाजू लावून धरलेल्या दमानियांच्या नव्या एक्स पोस्टने खळबळ उडाली आहे.
संतोष देशमुख हत्या प्रकरणात निलंबित पोलीस उपनिरिक्षक राजेश पाटील आणि याच हत्याकांड प्रकरणात सक्तीच्या रजेवर पाठवलेले पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन हे धुळवडीला रंगाची उधळण करुन आनंद साजरा करताना दिसत आहेत पण कोणाबरोबर? तर संतोष देशमुख हत्याकांडाची सुनावणी करणारे जिल्हा आणि सत्र न्यायालयाचे न्यायाधीश सुधीर भाजीपाले यांच्यासोबत रंगाची उधळण करत आहेत. सुनावणी सुरू असताना आरोपीला वाचणारे हे निलंबित अधिकारी जर न्यायाधीशांसोबत धुळवड खेळत असतील, रंगांची उधळण करीत असतील तर पीडित कुटुंबाला न्याय कसा मिळणार?असा सवाल उपस्थित करीत हा प्रकार चुकीचा असल्याचे दमानिया म्हणाल्या.

## जयंत पाटलांनी घेतली शरद पवारांची भेट

सुळेंसोबतही जयंत पाटील यांनी तासभर चर्चा केल्याची माहिती आहे.

दोन दिवसांपूर्वी आझाद मैदानावर सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनात जयंत पाटील यांनी भाषण केले होते. या भाषणात त्यांनी माझी गॅरंटी घेऊ नका, माझं काहीही खरं नाही, असे विधान केले होते. त्यांच्या या विधानानंतर राज्याच्या राजकाणात मोठी चर्चा होत आहे. या विधानानंतर मंत्री हसन मुश्रीफ यांनी जयंत पाटील नाराज असल्याचे म्हटले होते. आता जयंत पाटील यांनी शुक्रवारी खासदार शरद पवार यांची बारामती येथे भेट घेतली आहे. तसेच जयंत पाटील यांनी बारामतीमध्ये खासदार शरद पवार यांच्यासोबत कृषी केंद्राची पाहणी केली.

## वाल्मिक कराड..

वाल्मिक कराड प्रकरणात तृप्ती देसाई यांनी बीड जिल्ह्यातील २६ पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्यावर आरोप केले होते. हे आरोप सिद्ध करण्यासाठी तुमच्याकडील असलेले पुरावे बीड पोलिसांच्या समोर घेऊन या, असे या नोटीसीत म्हटले आहे. तृप्ती देसाई चौकशीसाठी १७ मार्च रोजी बीड पोलिसांसमोर हजर होणार आहेत.

## होळी एकतेचे...

या होळी सणाच्या सर्व देशवासियांना शुभेच्छा. हा सण एकात्मता आणि प्रेमाचा संदेश देतो. भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा हा सण प्रतीक आहे. या पावन पर्वनिमित्त आपण भारत मातेची सर्व मुलं एकत्र येऊन समृद्ध आणि प्रगतिशील जीवनासाठी कटिबद्ध आहोत, असे त्यांनी संदेशात म्हटले आहे.

## खोक्याची रवानगी तुरुंगात



प्रक्रिया पूर्ण करून सतीश भोसले ला न्यायालयात हजर केले असता, सात दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. त्यामुळे सतीश भोसलेचा मुक्काम सात दिवस पोलीस कोठडीमध्ये असणार आहे.

## मराठा शौर्य...

दरम्यान, हे स्मारक राष्ट्रीयत्व, सर्वधर्मसमभाव, लवावू वृत्ती, असीम त्याग या मूल्यांची प्रेरणा तसेच राष्ट्र प्रेमाचे प्रतीक म्हणून संपूर्ण देशात वंदनीय व्हावे या हेतूने मराठा शौर्य स्मारक निर्माण करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, असेही या पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# नाना पटोले यांची दादा, भाईंना ऑफर!



**नागपूर :** प्रदेशाध्यक्ष गेल्यानंतर गेले काही दिवस राजकीयदृष्ट्या फारसे चर्चेत नसलेले काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, एकनाथ शिंदे अर्थात दादा आणि भाई यांना थेट राज्याचे मुख्यमंत्री करण्याची ऑफर दिली आहे. काँग्रेससोबत या आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, तुम्हाला मुख्यमंत्री करू असा विश्वास त्यांनी दिला आहे.

अर्थातच होळी धुळवडीच्या निमित्ताने बुरा न मानो होली है...! अशीच ही त्यांची राजकीय धुळवड निमित्ताने माध्यमांशी बोलताना ही ऑफर असल्याने सत्तापक्षाने त्याकडे फारसे गांभीर्याने लक्ष दिले नाही. उलट पुढील दहा-पंधरा वर्षे काँग्रेसला राज्यात संधीच नाही असा टोला भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पटोले यांना लगावला आहे. राज्याचा सर्व कारभार मुख्यमंत्री कार्यालयातूनच चालत असल्याने व मुख्यमंत्री आमचे मित्र देवेंद्र फडणवीस यांनी हा नवा आयाम दिला असल्यामुळे उपमुख्यमंत्री पदी असलेले एकनाथ शिंदे अजितदादा पवार हे तर त्रासले आहेत. या दोघांपैकी कोणीही जवळचा नाही हे त्यांना देखील आता माहीत झाले आहे.

यामुळेच आता अजित पवार एकनाथ शिंदे यांनी आमच्या सोबत यावे त्यांना आम्ही मुख्यमंत्री पदाची संधी देऊ काँग्रेस पक्ष तुमच्या पाठीशी आहे दोघांनाही निश्चितच राज्याचे मुख्यमंत्री व्हायचे आहे. त्यामुळे आम्ही हे संधी त्यांना देऊ असे माजी प्रदेशाध्यक्ष काँग्रेस नेते नाना पटोले यांनी स्पष्ट केले अर्थातच नाना पटोले यांच्या या ऑफरला सकारात्मक प्रतिसाद कोणीही दिला नसला तरी त्याची राजकीयदृष्ट्या चर्चा शुक्रवारी ऐन धुळवडीच्या दिवशी जोरात आहे.

### गहाळ कागदपत्रांबाबत जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटसीने कळविण्यात येते कि, सौ. किर्ती गौरव बनसोडे- लग्नानंतरचे नाव किर्ती शरद कुमकर-लग्नाअगोदरचे नाव) यांच्या मालकीचे गाव मौजे वानवडी ता.हवेली जि.पुणे येथील स.नं. ७०अे-१-२-३ आणि ७० बी यांसी सि.स.नं. १४३३ ते १४३५ या मिळकतीवर बांधलेल्या "नेताजी को-ऑप. हौसिंग सोसायटी लि." या गृहप्रकल्पामधील बिल्डींग क्र. ३८ टाईप बी मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. ५५५ यांसी क्षेत्र ३४० चौ.फुट म्हणजेच ३१.५९ चौ.मी.बिल्टअप मिळकतीबाबत श्री शरदचंद्र गणपतराव नलावडे व सौ.कुसुम षिवलाल सोनटक्के यांचेदरम्यान दिनांक १२/०८/१९९३ रोजी झालेला करारनामा दस्त नं. २६१८/१९९३ (मा.स.दु.निबंधक हवेली क्र. २ पुणे) हा दस्त वानवडी,पुणे येथुन गहाळ झालेला आहे. त्याबाबत सौ. किर्ती गौरव बनसोडे यांनी दिनांक १३/०३/२०२५ रोजी वानवडी पोलीस स्टेषन यांच्याकडे गहाळ वस्तु तक्रार क्र. ३१९९६/२०२५ अन्वये तक्रार केलेली आहे. त्याची पोलीस स्टेषनमध्ये नोंद घेण्यात आलेली आहे. सदरचा मुळ दस्त कोणास सापडल्यास वानवडी पोलीस स्टेषन यांचेकडे जमा करावा अथवा सौ. किर्ती गौरव बनसोडे यांचेकडे जमा करावा त्यासाठी मो. नं. ७८८७ ५५४४४९ मोबाईल वर संपर्क करावा.
पुणे.
दिनांक:- १५/०३/२०२५

अॅड. अविनाश एस. भुजबळ
अॅडव्होकेट
ऑफिस नंबर 7, छत्रपती कॅपिटल, चाकण शिक्रापूर रोड, चाकण, ता.खेड, जि. पुणे,
मो. ९३७३७३६५२९

### जाहिर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळवण्यात येते कि, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत हि बबन निवृत्ती कुंभार यांचे मालकी हक्क वहिवाटीची होती. सदर मिळकत हि विद्यमान मालक विकास बबन कुंभार यांचे नावावर ते बबन निवृत्ती कुंभार यांचे वारस म्हणून आलेली आहे तर शोभा विकास कुंभार यांचे नावावर शासन निर्णया प्रमाणे आली आहे व त्यांनी सदर मिळकत तारण / गहाण पिरामल कॅपिटल अड हाउसिंग फायनान्स शाखा - पंढरपूर यांचे कडे देण्याचे कबुल करून कर्ज मागणी केलेली आहे आणि त्या करीता सदर मिळकत हि तारण गहाण म्हणून ठेवून घेवून आमचे कंपनीने कर्ज देण्याची तयारी दर्शवली आहे. सदर परिशिष्टात नमूद केली मिळकत हि पूर्णपणे निर्वेध, निजोखमी असलेचा भरवसा सदरील विद्यमान वहिवाटदार मालक यांनी आमचे अशील कंपनीस दिलेला आहे. तरी सदरील मिळकती मध्ये कोणाचाही, कसलाही प्रकारचा मालकी हक्क, वारस हक्क, हितसंबध, गहाण, दान, लीज, लीन, भाडे पट्टा मुखत्यार पोटगी, खंड, नोकरनामा, अदला बदल दस्त, करारनामा बक्षिसपत्र इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क वा अधिकार असल्यास त्यांनी त्या बाबतीत खालील पत्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसाचे आत सर्व संबधित कागदपत्र व पुराव्यासह आमचेकडे लेखी हरकत कळवून पोहोच घ्यावी. सदरील मुदतीत कोणताही हरकत न आलेस सदर मिळकत हि निर्वेध, निजोखामी व बोजाविरहित असल्याचे आणि त्या कोणाचा हक्क हित संबध असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे. असे गुहीत धरून आमचे अशील कंपनी सदर मिळकत कर्ज प्रकरणा करीता तारण म्हणून गहाणखताचा दस्त पूर्ण करतील व तद नंतर आलेली कोणाचीही, कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.
मिळकतीचे वर्णनः -डी. पुणे . सब. डी.व ता. इंदापूर पैकी मौजे लुमेवाडी येथील मिळकत ग्रा. पंचायत मालमत्ता क्र. ६७३ क्षेत्र २२६६
चौ. फुट ( खुली व बांधीव )
पूर्व :- मारुती मंदिर
दक्षिण :- संजय शिवाजी अंबड यांची मिळकत
पश्चिम :- पार्वती विजयकुमार काटे यांची मिळकत
उत्तर :- संतोष महादेव माने यांची मिळकत
(येणेप्रमाणे मिळकत आतील दगड, माती, झाड, झुडूप व तदंग भूत वस्तू हक्कासह )
ता.१४/०३/२०२५

शिक्का
Adv. R N Shinde
(Panel advocate)

### Public notice

**Notice is :-** hereby given that one **Vikas Baban Kumbhar and Shobha Vikas Kumbhar** (herein after referred to as the said mortgagor) have agreed to create mortgage in respect of the G.P. property more particularly described in the schedule hereunder in favor of my/our client s, Piramal capital and housing finance ltd br Pandharpur Dist. Solapur in respect of the property described herein. That the said property originally owned and in possession of **Baban Nivrutti Kumbhar after his death said property came in to the name of Vikas Baban Kumbhar as heir of Baban Nivrutti Kumbhar and As per the G.R. name of Shobha Vikas Kumbhar also shown in owners column of property extract.** So I have given this notice to all persons having any claim against or in respect the said C.T.S property more particularly described in the schedule hereunder or any part thereof by way of sale, exchange, mortgage (Equitable or registered or otherwise) Gift, trust, inheritance family arrangement, maintains, bequest partnership, possession lease sublease tenancy,license,line charge, pledge, easement or otherwise howsoever are hereby requested to notify the same in writing to me / us with supporting documentary evidence at the address mentioned herein below within 14 days from the date hereof, failing which the claim or claims, if any of such person's or person's will be considered to have been waived and or abandoned and my client shall proceed with disbursement of loan and creation of mortgage in respect of thereof.

**DESCRIPTION OF THE PROPERTY**

G.PMilkat no. 673 area 2266 sq feet. within the limit of village Lumewadi Tal.
Indapur Dist. Pune
**East:-** Maruti Mandir
**South:-** House Sanjay Shivaji Ambad
**West:-** House of Parwati Vijaykumar Kate
**North:-** House of Santosh Mahadev Mane
Place-Pandharpur
Dt 14/04/2025

शिक्का
Adv. R N Shinde
(Panel advocate)

# केंद्राने २१०० कोटी रुपये रोखले

## तामिळनाडूतील डीएमके सरकारचा नव्याने आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**चेन्नई :** तामिळनाडूतील भाषेच्या वादाच्या पार्श्वभूमीवर आता आर्थिक भेदभावाचा नवा मुद्दा तापू लागला आहे. मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या सरकारने केंद्र सरकार राज्यावर आर्थिक अन्याय करत असल्याचा आरोप केला आहे. शुक्रवारी विधानसभेत अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान राज्याचे अर्थमंत्री थंगम थेन्नारासू म्हणाले की, मोदी सरकारने 'समग्र शिक्षा योजने'अंतर्गत तामिळनाडूला दिलेले २१०० कोटी रुपये रोखले आहेत.

तामिळनाडू सरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ला विरोध केल्यामुळे केंद्राने निधी रोखून धरल्याचा दावा अर्थमंत्र्यांनी केला. भाषेच्या वादात तामिळनाडूच्या धोरणांशी असहमत असल्याने केंद्र सरकार तामिळनाडूवर आर्थिक दबाव आणत असल्याचा आरोप त्यांनी केला. या वक्तव्यानंतर विधानसभेतील वातावरण अधिकच तापले होते.

यावेळी तामिळनाडू विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन पूर्णपणे केंद्र विरुद्ध राज्य अशी लढाई ठरली. भाजप आणि अण्णाद्रमुकच्या आमदारांनी या मुद्द्यावरून विधानसभेवर बहिष्कार टाकला. या गदारोळादरम्यान अर्थमंत्री थेन्नारासू यांनी केंद्रसरकारवर जोरदार हल्ला चढवला आणि केंद्र सरकार आपल्या त्रिभाषा धोरणाद्वारे तामिळनाडूवर हिंदी लादण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये त्रिभाषा प्रणाली प्रस्तावित करण्यात आली असून त्याअंतर्गत विद्यार्थ्यांना इंग्रजी, हिंदी आणि प्रादेशिक भाषा शिकावी लागणार आहे. तामिळनाडू सरकार सुरुवातीपासूनच याला विरोध करत आहे. सध्या राज्यात केवळ इंग्रजी आणि तमिळ भाषेचे शिक्षण सक्तीचे आहे. त्रिभाषा धोरण हे खरे तर हिंदी लादण्याचे षड्यंत्र असल्याचा आरोप स्टॅलिन सरकारने केला आहे.

केंद्राच्या भाषा धोरणाविरोधात तामिळनाडू सरकार सातत्याने आवाज उठवत आहे. या आंदोलनाचे नवे उदाहरण गुरुवारी पाहायला मिळाले, जेव्हा अर्थसंकल्पाच्या अधिकृत लोगोमधून भारतीय चलन '₹' चिन्ह काढून त्याजागी 'रुबाई' या तमिळ शब्दाचे सुरुवातीचे अक्षर लावण्यात आले. द्रमुक सरकारचे म्हणणे आहे की, केंद्र सरकार जबरदस्तीने हिंदी भाषा लादत आहे आणि ते प्रत्येक व्यासपीठावर याविरोधात आवाज उठवतील. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी नुकतेच केंद्र सरकारला इशारा देत म्हटले होते की, आम्हाला मातृभाषेपासून वंचित ठेवण्याचे कोणतेही षडयंत्र यशस्वी होणार नाही.

### केंद्र-राज्य संघर्ष वाढण्याची शक्यता

● तामिळनाडू सरकारच्या या आरोपानंतर राजकारण तापले आहे. याबाबत केंद्र सरकारकडून अद्याप कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. मात्र, राज्य सरकार विनाकारण भाषेचा वाद उपस्थित करून राजकीय लाभ घेण्याचा प्रयत्न करत असल्याचे भाजप नेत्यांचे म्हणणे आहे. या वक्तव्यांच्या पार्श्वभूमीवर तामिळनाडू आणि केंद्र सरकारयांच्यातील संघर्ष विशेषत: भाषा आणि शिक्षण धोरणाच्या मुद्द्यावरून आणखी वाढण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे स्टॅलिन सरकारने यापूर्वी अनेकदा हिंदी लादण्याला विरोध केला असून आता आर्थिक भेदभावाचा नवा मुद्दा जोडून केंद्रावर अधिक दबाव आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# एलन मस्क यांच्या अडचणींत वाढ

एलन मस्क यांच्या सॅटेलाईट इंटरनेट सर्व्हिस स्टारलिंकला भारतात मान्यता मिळाली असली, तरी मस्क यांच्या मार्गातील अडथळे कायम आहेत. एअरटेल आणि जिओसोबत नुकत्याच झालेल्या करारामुळे स्टारलिंकच्या भारतात प्रवेशाचा मार्ग काही प्रमाणात मोकळा झाला आहे, परंतु भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने सॅटेलाइट ब्रॉडबँड सेवेसाठी परवान्याचा कालावधी ५ वर्षांपर्यंत मर्यादित ठेवण्याची योजना आखली आहे. मस्क यांच्या स्टारलिंकने २० वर्षांचा परवाना मागितला होता.




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**नवी दिल्ली :** भारतात सॅटेलाइट ब्रॉडबँड सेवेसाठी स्पेक्ट्रम वाटपावरून मोठा वाद निर्माण झाला होता. मस्क यांच्या स्टारलिंकला २० वर्षांसाठी स्पेक्ट्रम मिळावा अशी इच्छा होती, जेणेकरून ते दीर्घकालीन नियोजन करू शकतील आणि परवडणारी सेवा देऊ शकतील. दुसरीकडे मुकेश अंबानी यांच्या रिलायन्स आणि भारती एअरटेलला हा कालावधी ३ ते ५ वर्षांपर्यंत मर्यादित ठेवायचा होता, जेणेकरून भारत सरकारला वेळोवेळी बाजाराचे मूल्यमापन करता येईल. आता ट्रायने अंबानी आणि एअरटेलची सूचना मान्य करत ५ वर्षांची कालमर्यादा निश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे.

एलन मस्क यांच्या स्टारलिंकने अलीकडेच रिलायन्स आणि एअरटेलसोबत भारतात आपल्या सॅटेलाइट ब्रॉडबँड सेवेचा विस्तार करण्यासाठी वितरण करार केला आहे. मात्र, हे बिझनेस मॉडेल यशस्वी करण्यासाठी कंपनीला दीर्घकालीन परवान्याची गरज होती. ट्रायच्या या निर्णयामुळे स्टारलिंकला भारतातील दीर्घकालीन गुंतवणूक आणि किंमतीमध्ये अडचणी येऊ शकतात.

सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारताला आधी सॅटेलाइट ब्रॉडबँड मार्केटची तपासणी करायची आहे जेणेकरून स्पेक्ट्रमची योग्य किंमत ठरवता येईल. सध्या पारंपरिक टेलिकॉम कंपन्यांना २० वर्षांसाठी लिलावाद्वारे स्पेक्ट्रम मिळतो, मात्र सॅटेलाइट सेवेसाठी स्वस्त आणि मर्यादित कालावधीसाठी स्पेक्ट्रमचे वाटप केले जाणार आहे. येत्या महिनाभरात ट्राय आपल्या अंतिम शिफारशी दूरसंचार मंत्रालयाला पाठवणार आहे. त्यानंतर सरकार त्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेईल. भारतातील उपग्रह दळणवळण क्षेत्र २०२८ पर्यंत २५ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. अशा परिस्थितीत या क्षेत्राचे भवितव्य ठरविण्यात हा निर्णय महत्त्वाची भूमिका बजावू शकतो.

# उष्णतेची लाट राहणार कायम; हवामान खात्याचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** देशभरात हवामानाचा पॅटर्न सातत्याने बदलत असतो. पूर्व आणि मध्य भारतातील अनेक भाग तीव्र उष्णतेच्या विळख्यात सापडला असला तरी उत्तर आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये पाऊस आणि बर्फवृष्टी सुरूच आहे. आज राजधानी दिल्लीतही मुसळधार पावसाने हजेरी लावली. ओडिशा, विदर्भ, झारखंड, छत्तीसगड, गंगीय पश्चिम बंगाल, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशात पुढील काही दिवस उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे, तर पश्चिम हिमालयी प्रदेश आणि अरुणाचल प्रदेशात मुसळधार पाऊस आणि बर्फवृष्टी होण्याची शक्यता भारतीय हवामान शास्त्र विभागाने (आयएमडी) १४ मार्च रोजी प्रसिद्ध केलेल्या अहवालात व्यक्त केली आहे.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, ओडिशामध्ये १४ ते १७ मार्च, विदर्भात १४ ते १६ मार्च, झारखंडमध्ये १४ ते १७ मार्च आणि गंगेच्या पश्चिम बंगालमध्ये १५ ते १७ मार्च दरम्यान तीव्र उष्णतेची शक्यता आहे. तेलंगणा आणि आंध्र प्रदेशात १४ आणि १५ मार्च रोजी उष्णतेचा इशारा देण्यात आला आहे. गुजरातच्या काही भागातही तापमान सरासरीपेक्षा अधिक होते.

दुसरीकडे, पश्चिम हिमालयी भागात मुसळधार पाऊस आणि बर्फवृष्टी होऊ शकते. जम्मू-काश्मीर, लडाख, गिलगिट-बाल्टिस्तान आणि मुजफ्फराबादमध्ये जोरदार बर्फवृष्टी होण्याची शक्यता आहे. हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्येही मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. ईशान्य भारतातही हवामान खराब राहणार आहे. अरुणाचल प्रदेशात १४ ते १८ मार्च दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे, तर आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये १४ ते १७ मार्च दरम्यान वादळी वारे आणि पाऊस पडण्याची शक्यता आहे. या भागात जोरदार वारे आणि विजांच्या कडकडाटाची शक्यता आहे. देशाची राजधानी दिल्ली आणि आसपासच्या भागातही हवामान बदलण्याची चिन्हे दिसत आहेत. हवामान खात्याने १४ मार्च रोजी मेघगर्जनेसह हलका पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवला आहे. तसेच १५ व १६ मार्च रोजी ढगाळ वातावरण आणि रिमझिम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# 17 नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

**विजापूर :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी २०२६ पर्यंत देशातून नक्षलवादाचा खात्मा करण्याचा प्रण घेतला आहे. याच पार्श्वभूमीवर अनेक नक्षलवाद्यांविरोधात कडक कारवाई केली जात आहे. तर, या कारवाईला घाबरुन अनेक नक्षलवादी आत्मसमर्पणदेखील करत आहेत. याच क्रमाने छत्तीसगडमधील विजापूर जिल्ह्यात गुरुवारी १७ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. यापैकी ९ जणांवर २४ लाख रुपयांचे बक्षीस होते.

पोलिसांच्या माहितीनुसार, नक्षलवाद्यांनी वरिष्ठ पोलिस आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या (सीआरपीएफ) अधिका-यांसमोर आत्मसमर्पण केले. यामध्ये एका जोडप्याचाही समावेश आहे. विजापूरचे वरिष्ठ पोलिस अधीक्षक जितेंद्र कुमार यादव म्हणाले की, या नक्षलवाद्यांनी माओवाद्यांची पोकळ आणि अमानवी विचारसरणी, वरिष्ठ कार्यकर्त्यांकडून निष्पाप आदिवासींचे होणारे शोषण आणि सुरक्षा दलांच्या वाढत्या प्रभावाबद्दल निराशा व्यक्त केली.

'निया नेल्लानार' (तुमचे चांगले गाव) योजनेवर नक्षलवाद्यांचाही प्रभाव आहे, ज्या अंतर्गत सुरक्षा दल आणि प्रशासन मूलभूत सुविधा पुरविण्याचा आणि अंतर्गत भागात विकास कामे करण्याचा प्रयत्न करत आहेत. आत्मसमर्पण केलेले सर्व नक्षलवादी बंदी घातलेल्या माओवादी संघटनेच्या गांगलूर एरिया कमिटीमध्ये विविध पदांवर सक्रिय असल्याचे त्यांनी सांगितले.



वृंदावन उत्तर प्रदेशातील वृंदावन येथे होळी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

# पाकिस्तानातून बलुचिस्तान स्वतंत्र होणार?




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इस्लामाबाद :** बांग्लादेश स्वतंत्र होण्यापूर्वीच बलूची लोकांची स्वातंत्र्याची मागणी आहे. सिंध आणि पंजाब प्रदेशाच्या सुपीक जमिनीवर या देशाची अर्थव्यवस्था काम करते. पण आता या प्रांतातही स्वातंत्र्याचे धुमारे फुटले आहेत. यासाठी बलूच लिबरेशन आर्मीने निकाराचा लढा सुरू केला आहे. त्यामुळे पाकिस्तानी लष्कर आणि प्रशासन जेरीस आले आहे. दोन दिवसांपूर्वी तर थेट रेल्वेच हायजॅक करून मोठा नरसंहार केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पाकला पुन्हा एकदा फाळणीला सामोरे जावे लागू शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे.

या अगोदर पाकिस्तानच्या जुलूमशाहीला कंटाळून बांग्लादेश स्वतंत्र झाला. तिथे तख्तापलट करण्याचे आयएसआयचे स्वप्न पूर्ण झाले. पण देशांतर्गत सुरू असलेली बंडखोरी त्यांना थोपवता आलेली नाही. सध्या पाकिस्तानचे अनेक बडे अधिकारी आणि नेते बलुचिस्तान लवकरच स्वतंत्र होईल, असे जाहीरपणे सांगत आहेत. बलूच लोकांवर पाकिस्तानी लष्कराने, प्रशासनाने गेल्या ७० वर्षात अपरिमित अत्याचार केले. अनेक बलूच नेते, तरुणांना हाल हाल करून मारले. तिथल्या स्त्रियांवरील अत्याचाराला तर सीमा नाही. त्यातूनच बलूचिस्तान लिबरेशन आर्मीचा जन्म झाला. या लढाऊ जमातीला अत्याधुनिक शस्त्र आणि दारुगोळा मिळाल्याने त्यांनी पाकिस्तानी अधिकारी, लष्करावरील हल्ले वाढवले. मंगळवारी तर जाफर एक्स्प्रेस ही अख्खी ट्रेनच हायजॅक केली. यामध्ये प्रवाशी, आयएसआयचे अधिकारी, लष्कराचे जवान, अधिकारी यांचा समावेश होता. ही ट्रेन आणि ओलिस यांना सोडवण्यात पाक आर्मीला यश आले असले तरी या दरम्यान मोठा नरसंहार झाल्याचे सांगण्यात येत आहे.

### स्वातंत्र्याची घोषणा होणार?

● बलुचिस्तान आता स्वातंत्र्याच्या अंतिम टप्प्यात आहे. या प्रदेशातील लोक केव्हाही स्वातंत्र्याची घोषणा करतील. सध्या बंडखोरांच्या ताब्यात ७ जिल्हे आहेत. पाकिस्तानी प्रशासन आणि लष्कराचे या जिल्हांमध्ये कोणतेच नियंत्रण नाही. बलूचिस्तानने स्वातंत्र्याची घोषणा केली तर त्यांना संयुक्त राष्ट्र संघही लागलीच मान्यता देऊ शकतो, असा दावा केला जात आहे.



## मनीष सिसोदिया, सत्येंद्र जैन यांना मोठा धक्का

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या आम आदमी पक्षाच्या सरकारमध्ये मंत्री असलेले मनीष सिसोदिया आणि सत्येंद्र जैन यांच्या अडचणी वाढत असल्याचे दिसून येत आहे. कारण, केंद्रीय गृह मंत्रालयाने दोघांविरुद्धच्या प्रकरणांची चौकशी करण्याची परवानगी दिली आहे. ही परवानगी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत देण्यात आली आहे आणि त्याची माहिती उपराज्यपाल (एलजी) सचिवालयाला पाठवण्यात आली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, दिल्ली सरकारच्या दक्षता विभागाने यापूर्वी दिल्लीच्या उपराज्यपाल कार्यालयामार्फत गृह मंत्रालयाकडून परवानगी मागितली होती. या विनंतीचा विचार करून, मंत्रालयाने आता चौकशीला परवानगी दिली आहे.



## राजकोटमधील इमारतीला भीषण आग

**अहमदाबाद :** गुजरातमधून एक मोठी बातमी समोर आली आहे. राजकोटमधील अटलांटिस इमारतीत भीषण आग लागली आहे. या आगीमध्ये तीन जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. अग्निशमन विभाग आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न करत आहे. या इमारतीत अजूनही ३० लोक अडकल्याचे सांगितले जात आहे. बचावकार्य वेगाने सुरू आहे. इमारतीतून धुराचे लोट बाहेर पडू लागताच, आपत्कालीन सेवा घटनास्थळी दाखल झाल्या, त्यानंतर सुमारे ५० लोकांना वाचवण्यात आले. अग्निशमन दलाचे कर्मचारी तातडीने पोहोचले आणि आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. घटनेच्या व्हिडिओमध्ये रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी उभ्या असल्याचे दिसून आले आहे, तर संकुलाजवळ गर्दी जमलेली दिसत असल्याचे माध्यमांनी दिलेल्या वृत्तात म्हटले आहे.



## होळीच्या दिवशी पहाटे भूकंप!

**नवी दिल्ली :** होळीच्या दिवशी, भारताच्या उत्तरेकडील भागात पहाटे भूकंपाचे धक्के जाणवले. लडाखमधील कारगिलमध्ये ५.२ तीव्रतेचा भूकंप झाला. हे भूकंप पहाटे २.५० वाजता जाणवले. कारगिलसह, संपूर्ण लडाख आणि जम्मू-काश्मीरच्या काही भागात हे भूकंपाच्या धक्क्यांनी जमीन हादरली. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या मते, भूकंपाचे केंद्र १५ किलोमीटर खोलीवर होते. या भूकंपाच्या अवघ्या तीन तासांनंतर, ईशान्य भारतातही भूकंपाचे धक्के जाणवले. अरुणाचल प्रदेशातील पश्चिम कामेंग भागात ४.० तीव्रतेचा भूकंप झाला. सकाळी ६ वाजता येथे भूकंपाचे धक्के जाणवले. १३ मार्च रोजी दुपारी २ वाजता तिबेटमध्ये ४.३ तीव्रतेचा भूकंप झाला.



## 'कोकेन' तस्करी प्रकरणी क्रिकेटपटू दोषी

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियाचा माजी फिरकी गोलंदाज स्टुअर्ट मॅकगिल याला कोकेन तस्करीत सहभागी असल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले; परंतु मोठ्या प्रमाणात ड्रग्ज पुरवठ्यात सहभागी असल्याबद्दल त्याची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. एप्रिल २०२१ मध्ये सिडनी जिल्हा न्यायालयाच्या ज्युरीने ५४ वर्षीय लेग-स्पिनरला ३,३०,००० ऑस्ट्रेलियन डॉलर्समध्ये एक किलो कोकेन व्यवहार केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त केले. तथापि, त्याला ड्रग्ज पुरवठ्यात सहभागी झाल्याच्या आरोपाखाली दोषी ठरवण्यात आले आहे.

# नीरा-भीमावर निर्विवाद वर्चस्व

## हर्षवर्धन पाटील यांच्या नेतृत्वाखाली सलग पाच पंचवार्षिकमध्ये यश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**इंदापूर :** शहाजीनगर (ता. इंदापूर) येथील निरा भिमा सहकारी सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५-२६ ते २०३०-३१ या कालावधीच्या निवडणुकीमध्ये कारखान्याचे संस्थापक व राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांचे निर्विवाद वर्चस्व सलग पाचव्या पंचवार्षिक निवडणुकीत कायम राहिले आहे. या कारखान्याच्या स्थापनेपासूनच्या २५ वर्षांत सर्व निवडणुका बिनविरोध झाल्या आहेत. कारखान्याच्या निवडणुकीसाठी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी गुरुवारी (दि. १३) सर्व २१ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

माजी मंत्री हर्षवर्धन पाटील त्यांनी सन १९९९ मध्ये नीरा भीमा सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली. त्यानंतर संस्थापक हर्षवर्धन पाटील यांच्या नेतृत्वाखाली सर्व निवडणुका बिनविरोध होत आहेत. नीरा-भीमा कारखान्याच्या स्थापनेपासून चांगले कामकाज करीत गेल्या २५ वर्षांमध्ये शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केलेला आहे. तसेच सध्या देशातील व राज्यातील साखर कारखानदारी अडचणीत असल्याची जाण शेतकऱ्यांना आहे. या पार्श्वभूमीवर कारखाना कार्यक्षेत्रातील ४६ गावांमधील सभासदांनी व कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी बिनविरोध निवडणुकीकरिता सहकार्याची भूमिका घेतली, त्याबद्दल हर्षवर्धन पाटील यांनी आभार व्यक्त केले. या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी कल्याण पांढरे व त्यांना सहाय्यक म्हणून इंदापूरचे तहसीलदार जीवन बनसोडे यांनी काम पहिले.

### कारखान्याचे संस्थापक माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे नेतृत्वाखाली बिनविरोध निवडून आलेले उमेदवार पुढीलप्रमाणे :



- बावडा गटः-पाटील हर्षवर्धन शहाजीराव, पाटील प्रतापराव सर्जेराव, पाटील उमेश अच्युतराव
- पिंपरी गटः- मोहिते प्रकाश शहाजी, बोडके संजय तुळशीराम, विजय दत्तात्रय घोगरे.
- सुरवड गटः- शिर्के महेशकुमार दत्तात्रय, घोगरे दादासो उत्तम, गायकवाड सुभाष किसन
- काटी गट :- पवार लालासो देविदास, जाधव राजकुमार वसंतराव, वाघमोडे विलास रामचंद्र
- रेडणी गट :- बोंद्रे आनंदराव नामदेव, देवकर राजेंद्र व्यंकट, सवासे दत्तू यशवंत
- अनुसूचित जाती किंवा जमाती प्रवर्गः- कांबळे राहुल अरुण
- इतर मागास प्रवर्गः- यादव कृष्णाजी दशरथ
- भटक्या विमुक्त जाती व जमाती विशेष मागास प्रवर्गः- नाईक रामचंद्र नामदेव
- ब वर्ग सभासद प्रवर्ग :- पाटील भाग्यश्री हर्षवर्धन
- महिला राखीव प्रवर्गः- पोळ संगिता दत्तात्रय, शिंदे कल्पना निवृत्ती

## कर्तृत्ववान महिलांचा आळंदीत सन्मान



**आळंदी :** ऑल इंडिया सोनार फेडरेशन महिला विकास मंच महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने आयोजित जागतिक महिला दिना निमित्त गौरव पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. यात सन्मान श्री शक्तीचा या कार्यक्रमात पंचक्रोशीसह राज्यातील कर्तुत्ववान महिलांचा सन्मान करून महिला दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी विधानपरिषद आमदार उमा खापरे, समाजसेविका जयश्रीताई वाढवणकर, सहाय्यक पोलीस आयुक्त मुंबई सुरेखा कपिले, उद्योजिका रत्नाताई भांबुर्डेकर, समाजसेविका सुवर्णाताई महाले, सहाय्यक पोलीस आयुक्त मुंबई कल्पनाताई कपिले, महिला उपाध्यक्ष अनिता दारवेकर, सुनीता पितळे यांचेसह आळंदी, तसेच महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यातून आलेल्या महिलांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम मोठ्या थाटामाटात झाला.

## जारकरवाडीत धावले ४३० बैलगाडे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथे वडजादेवी यात्रा उत्सवानिमित्त तीन दिवस बैलगाडा शर्यत पार पडली. पहिल्या दिवशी फळीफोड रिहनभाई जब्बरभाई पठाण (पारगाव ), घाटाचा राजा माऊली कृपा बैलगाडा संघटना (जारकरवाडी), दुसरा दिवस फळीफोड सुवर्णयुग बैलगाडा संघटना (निरगुडसर), घाटाचा राजा सोहमदादा किरणशेठ बागडे व भानुदास देवराम काटे पाटील (पिंपळे सौदागर), तिसरा दिवस फळीफोड शिंवाशकुमार मनोज गोरडे (शिंगवे), तर घाटाचा राजा योगेश मच्छिंद्र टाव्हरे (निरगुडसर ) यांनी पटकावला.

सकाळी देवीला हारतुरे व मांडव डहाळे दिवसभर बैलगाडा शर्यत व रात्री विठ्ठल कृपा कला नाट्य मंडळ यांचा भारुडाचा कार्यक्रम संपन्न झाला. तर दुसऱ्या दिवशी बैलगाडा शर्यत, कुस्त्यांचा जंगी आखाडा पार पडला. यावेळी पंच म्हणून राजु पाबळे व धोंडीभाऊ पाबळे यांनी काम पाहिले. यात्रा काळात भीमाशंकर कारखान्याचे माजी चेअरमन देवदत्त निकम, कारखाना संचालक रामचंद्र ढोबळे, उद्योजक रमेश लबडे यांनी यात्रेला भेटी दिल्या. यात्रा पार पडण्यासाठी सरपंच प्रतिक्षा बढेकर, उपसरपंच सुवर्णा भांड, कौसल्या भोजने व सचिन टाव्हरे, यात्रा कमिटी अध्यक्ष रामहरी देवडे, माजी सरपंच शरद भोजने, चेअरमन सुर्यकांत लबडे, व्हाईस चेअरमन गणेश खुडे, शेतमाल प्रक्रिया संस्थेचे संचालक खंडू भोजने, सुरेश मंचरे, सुभाष लबडे, निवृत्ती भांड, बाळासाहेब ढोबळे, भाऊसाहेब भांड, रसिक भोजने, नवनाथ मंचरे, अविनाश तागड, आदिनाथ भोसले, रायचंद ढोबळे, गणेश देवडे, पोपट लोले व यात्रा कमिटी व जारकरवाडी ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

## पत्नीचा खून प्रकरणी आरोपीस अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** गणेगाव खालसा, ता. शिरूर येथे ११ फेब्रुवारी रोजी रात्री ऊस तोडणी करिता आलेला कामगाराने पत्नीचे हत्या करून पसार झाला होता. त्याला रांजणगाव एमआयडीसी पोलीसांनी अटक केली असल्याचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी सांगितले.

माऊली उर्फ ज्ञानेश्वर आत्माराम गांगुर्डे (रा. पिंपरी तालुका, चाळीसगाव जिल्हा जळगाव) याने पत्नी मिलाबाई ज्ञानेश्वर गांगुर्डे (२७) हिचा गळा आवळून तिचा खून केला होता. मृत मिलाबाई यांचा भाऊ ताराचंद सुखलाल गोरे यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन मध्ये फिर्याद होती. आरोपीचा शोध घेण्याचे मोठे आव्हान रांजणगाव एमआयडीसी पोलीस समोर होते. पोलीस निरीक्षक महादेव वायमोडे यांनी सदर आरोपीचा शोध घेण्यासाठी तात्काळ तीन वेगवेगळी पथके तयार करून त्यांना आरोपीचा शोध घेणे बाबत सूचना दिल्या होत्या. वरील पथकांनी सदर आरोपीचा मलठण, पिंपरी दुमाला तसेच परीसरातील साखर कारखाने, तसेच आजूबाजूला असलेल्या ऊस तोडणीसाठी आलेल्या कामगारांकडे शोध घेतला. संगमनेर, कोपरगाव, श्रीगोंदा जिल्हा नगर येथे पोलीस पथकाने आरोपीचा शोध घेतला. १२ मार्च रोजी पोलिसांना सदर आरोपी हा त्याचे मूळ गावी येथे येणार असल्याची भोपनिय माहिती मिळाल्याने, पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी पोलिस पथक त्याचे मूळ गावी पाठवले. आरोपीस अटक करुन न्यायालयात हजर केले असता, त्याला ६ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

## बुध्दगया महाबोधी महाविहार मुक्तीसाठी मूक मोर्चा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** बिहार बुध्दगया येथील जगभरातील बौध्द अनुयायांचे श्रध्दास्थान असलेल्या महाबोधी महाविहारांचा ताबा बुद्ध अनुयायांना देण्यात यावा, या मागणीसाठी भिक्खू संघाच्या वतीने, सुरु असलेल्या आंदोलनाला जाहीर पाठींबा देण्यासाठी बुध्दगया महाबोधी महाविहार मुक्ती समर्थन कृती समिती पुरंदर तालुका यांच्या वतीने, सासवड येथे सोमवारी सकाळी ११- वाजता मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महाबोधी महाविहार मुक्ती कृती समितीच्या वतीने देण्यात आली,

बुध्दगया येथील महाबोधी महाविहार १९४९ चा ट्रस्ट कायदा रद्द करण्यात येऊन, महाविहार बुध्द अनुयायांच्या ताब्यात देण्यात यावे या मागणीसाठी भिक्खू संघाच्या वतीने बुध्दगया येथे सुरु असलेल्या आंदोलनाला जाहीर पाठींबा देण्यासाठी, रमाई आंबेडकर बुध्दविहार अशोक नगर सासवड येथे, पुरंदर तालुक्यातील भिमसैनिक व बुद्धं अनुयायी यांच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सर्व संमतीने वरील निर्णय घेण्यात आला. प्रशासकीय इमारत येथे मागणीचे निवेदन, पुरंदरचे तहसिलदार विक्रम राजपूत यांच्या मार्फत देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान नरेंद्र मोदी, व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांना देण्यात आल्यानंतर मोर्चाची सांगता होईल.

## खेड तालुक्यातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान



**शिरोली :** जागतिक महिला दिनानिमित्त रोहकल (ता. खेड) येथील पोदार इंटरनॅशनल शाळेच्या वतीने समाजाच्या विविध क्षेत्रातील कार्यरत असलेल्या खेड तालुक्यातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. महिला दिनाचे औचित्य साधून खेड तालुक्यातील डॉक्टर, वकील, मनुष्यबळ विकास अधिकारी, शिक्षिका, अभियंता, पोलीस, गृहिणी, उद्योजिका, परिचारिका अशा क्षेत्रात कार्य करणाऱ्या कर्तृत्वान महिलांचा सन्मानचिन्ह, वृक्षकुंड्या व भेट वस्तू देऊन सन्मान करण्यात आला. जागतिक महिला दिन हा एक औचित्य नसून तो महिलांच्या कर्तृत्वाचा, त्यागाचा तसेच त्यांच्या कुशल नेतृत्वाचा गुणगौरव करण्याचा दिवस आहे, असे विचार प्राचार्य विशाल जाधव यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेक पिसाळ, रवी प्रकाश यांनी केले, तर आभार प्रमोद कुमार यांनी मानले.

## महिला दिनानिमित्त विविध उपक्रम



**इंदापूर :** इंदापूर नगर परिषदेच्या वतीने दिनाक जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. यामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. मुख्याधिकारी रमेश ढगे कार्यक्रमामध्ये महिलांना मार्गदर्शन करताना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ महिलांनी घ्यावा विविध प्रकारचे प्रशिक्षण ही नगरपालिकेच्या वतीने सुरू असून त्या प्रशिक्षणात महिलांनी सहभागी व्हावे असेही आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्रकल्प अधिकारी सुभाष ओहोळ यांनी केले तसेच यासाठी सहकार्य श्रीमती योगिता सरगर समुदाय संघटक व शुभांगी सुतार यांनी केले. सर्व कर्मचारी वृंद यामध्ये सहभागी झाले होते.

## विविध उपक्रमांनी महिला दिन साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान व्यक्तींना पुरस्कार, महिला बचत गटाच्या माध्यमातून विशेष काम करणाऱ्या महिलांचा सत्कार, काही बचत गटांना कर्ज मंजुरीच्या पत्राचे वितरण, छोट्या मोठ्या मुलांनी सादर केलेला सांस्कृतीक कार्यक्रम व स्नेह भोजन अशा स्वरुपातील कार्यक्रम सासवड येथील आचार्य अत्रे सांस्कृतीक भवनात पार पडला. येथील हेल्पो फाऊंडेशन संस्थेच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. नाबार्डचे अधिकारी कतुरे जोशी, सुनील जाधव, प्रकाश गायकवाड, बँक ऑफ महाराष्ट्रचे महेंद्र सिंग, सुषमा तांबे, अनुराधा नखाते, हेल्पो संस्थेचे अध्यक्ष निषाद सलाम जेष्ठ पत्रकार हेमंत ताकवले, सेवानिवृत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सुधाकर कोकणे विशेष अतिथी म्हणून याप्रसंगी उपस्थित होते.

ब्राम्हाकुमारी केंद्राच्या निलिमा दिदी, सेवानिवृत्त आरोग्य पर्यवेक्षक मुबारक शेख, उद्योजिका स्वाती महाजन व निर्मला मोघे, बचत गट मदतनीस सुनंदा काळे, सुहाना शेख, पिंपळे गावचा हिराबाई बचत गट यांना यावेळी सन्मानित करण्यात आले. हेल्पो संस्थेच्या पुजा झेंडे, संतोष कामठे, उज्वला वाबळे, ज्योती शिंदे, निलेश भापकर यांनी कार्यक्रमांचे नियोजन केले. भारती राऊत (बोरावके) यांनी सुत्र संचालन केले.



## जागतिक महिलादिनी वराळेतर्फे विविध कार्यक्रम



**शिरोली :** जागतिक महिला दिनानिमित्त वराळे (ता. खेड) ग्रामपंचायतीच्या वतीने गावातील महिलांना घरातील कचरा व्यवस्थापनासाठी डस्टबीन वाटप केल्या. वराळे गावच्या सरपंच पूजा बुट्टे पाटील, ग्रामपंचायत अधिकारी नीलिमा जाधव, ग्रामपंचायत सदस्य उज्वला चव्हाण, सुनीता ठाकर, शुभांगी बुट्टे पाटील, पोलीसपाटील उषा बुट्टे पाटील, उपशिक्षिका छाया कवठे, चंद्रकला बुट्टे, सोनाली लोंढे, श्वेता वाघ यांनी कार्यक्रम यशस्वी केला. भामाई महिला सक्षमीकरण अभियानाच्या प्रमुख सुनीता बुट्टे पाटील व श्वेतादीदी कारले यांचा सन्मान जिल्हा परिषद शाळा व ग्रामपंचायतीच्या झाला. सरपंच पूजा बुट्टे पाटील यांनी उपस्थित सर्व महिलांना गुलाबपुष्प देऊन सन्मान केला. सूत्रसंचालन जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिका उषा भोईटे यांनी केले.

## पुणे शिरुर रस्त्यावर होणार बहुमजली उड्डाणपूल




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकत्याच मांडल्या गेलेल्या राज्य अर्थसंकल्पात पुणे ते शिरुर या ५४ किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या कामासाठी सुमारे ७ हजार ५१५ कोटींची भरीव तरतूद केल्याने गेली अनेक वर्षे लालफितीत अडकून पडलेल्या या रस्त्याचे काम लवकरच मार्गी लागण्याची अपेक्षा सर्वांना लागली आहे. या भरीव तरतुदीमुळे वाहतूक कोंडीने त्रस्त झालेले प्रवाशी व सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

शिरुरचे तत्कालीन आमदार पोपटराव गावडे यांनी २००० साली पुणे ते शिरुर या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम मार्गी लावले आणि रुंदीकरणासह रस्ता प्रवासासाठी खुला झाला. त्यानंतर मात्र वाढते औद्योगिकीकरण व नागरिकीकरण यामुळे या रस्त्यावर प्रवाश्यांना व नागरिकांना आजतागायत वाहतूककोंडीला सामोरे जावे लागत आहे. पुणे ते अहिल्यानगर या महामार्गावरुन मराठवाडा आणि विदर्भासह जवळपास निम्म्या महाराष्ट्रातून येणारी ये जा करणारी वाहने यामुळे या महामार्गावर सातत्याने होत असलेली वाहतूक कोंडी, याशिवाय लोणीकंद, कोरेगाव भिमा, सणसवाडी, शिक्रापूर येथील कंपन्या आणि पंचतारांकित रांजणगाव एमआयडीसीमुळे या परिसरात मोठया प्रमाणात वाढलेले औद्योगिककरणामुळे असंख्य वाहनांची वाढल्याचा भार या मार्गावर पडत असल्याने या मार्गावरुन दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांना प्रवास करणे मुश्किल झाले आहे.

> या महामार्गावर होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे एमआयडीसीतील सर्व उद्योगधंद्यावर मोठे परिणाम होत असून, आता बहुमजली उड्डाणपुलासह उन्नत मार्गाचे काम झाल्यावर आणखी उद्योगधंद्याना चालना मिळण्यास मदत होईल, या प्रकल्पामुळे वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार असून, वाहतूककोंडीमुळे त्रस्त झालेले प्रवाशी, कामगार आणि नागरिक यांना हा एकप्रकारे सुखद धक्का आहे.
>
> **— मानसिंग पाचुंदकर** उद्योजक

### बाबुराव पाचर्णे यांचे स्वप्न पूर्ण

- शिरुरचे दिवंगत माजी आमदार बाबुराव पाचर्णे यांनी २०१४ ला केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन या रस्त्यावर उन्नत मार्ग करण्याची मागणी केली होती. गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान वाघोली येथील सभेत मंत्री गडकरी यांनी पुणे ते शिरुर या महामार्गावर तीन मजली उड्डाणपुलाला मंजुरी देवून या रस्त्यावरील वाहतूककोंडी कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे सांगितले होते. आता हा प्रकल्प मार्गी लागल्यानंतर माजी आमदार पाचर्णे यांचे स्वप्न पुर्ण होणार आहे.

# जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार

## एकनाथ शिंदे होणार सन्मानित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** श्री संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन ३७५ व्या बीज सोहळ्याची वर्षपूर्ती अर्थात त्रीशतकोत्तर अमृत महोत्सव वर्षपूर्ती सोहळ्याचे सांगता आणि ३७६ वा श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळा रविवारी (दि. १६) देहू नगरीत साजरा होत आहे. या सोहळयाचे दिनी माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना श्री संत तुकाराम महाराज संस्थान तर्फे श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार प्रदान करीत सन्मानित करण्यात येणार आहे, अशी माहिती श्री संत तुकाराम महाराज संस्थांचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. श्री संत तुकाराम महाराज मंदिरातील मुख्य कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत यावेळी देहू देवस्थानचे विश्वस्त मानक महाराज मोरे, संजय महाराज मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

देहू देवस्थानचे वतीने यावेळी बीज सोहळ्याचे निमित्त तयारीचा आढावा घेण्यात आला असून राज्यातून येणाऱ्या भाविकांना नागरी सेवा सुविधा देण्यासाठी देवस्थान, देहू नगरपंचायत, महसूल आणि पोलीस प्रशासन यांनी कंबर कसली आहे. भाविकांची बीज सोहळ्याचे काळात नागरी सेवा सुविधांचे बाबतीत कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी देवस्थानचे वतीने संबंधित प्रशासनांस सूचना देण्यात आल्याचे देवस्थानचे अध्यक्ष





पुरुषोत्तम महाराज मोरे, विश्वस्त माणिक महाराज मोरे यांनी सांगितले.

संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन सोहळा बिजोत्सवा त्रिशतकोत्तर अमृत महोत्सव वर्ष पूर्ती सोहळ्याची सांगता आणि ३७६ वा बीज सोहळा हरिनाम गजरात येत्या रविवारी (दि. १६) देहूत साजरा होत आहे. या निमित्त होत असलेल्या कार्यक्रमाची माहिती देताना अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे म्हणाले, देहूत मोठ्या प्रमाणात वारकरी, भाविक, फडकरी आणि संपूर्ण राज्य परिसरात ठीक ठिकाणी झालेल्या अखंड हरिनाम सप्ताहातील प्रमुख मान्यवर या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. यामुळे देहूनगरीत मोठी गर्दी होणार आहे. यावर्षीचा बीज सोहळा रविवारी (दि. १६) असून ३७५ वर्ष पूर्ती श्री संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठ गमन सोहळा वर्षभरातील अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमांचा सांगता मोठ्या भक्तिमय वातावरणात होणार आहे.

या सोहळ्या निमित्त श्री संत तुकाराम महाराज संस्थांचे वतीने राज्याचे माजी मुख्यमंत्री, विद्यमान उपमुख्यमंत्री, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. या पुरस्कारात वैभवी पगडी, शाल, उपरणे, वीणा, चिपळ्या, पुष्पहार, तुकाराम महाराज मूर्ती, संत तुकाराम महाराज गाथा, सन्मानपत्र प्रदान केले जाणार आहे.

मोरे महाराज म्हणाले, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपूर येथील वारीमध्ये स्वतः दुचाकी वर फिरून वारकरी संप्रदायातील पालखी सोहळ्यातील आलेल्या वारकऱ्यांच्या सेवा सुविधांसाठी पाहणी केली. यात भाविक, वारकरी, दिंडीकरी, विविध ठिकाणाहून आलेले संत पालखी रथ सोहळे यांना पंढरपूर मध्ये विविध सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष परिश्रम पूर्वक नियोजन केले. याशिवाय प्रमुख पालखी सोहळ्यातील दिंड्यांना प्रतिदिंडी २० हजार रुपये अनुदान निधी दिला. यासाठी घेतलेला जो ऐतिहासिक निर्णय त्याबद्दल आणि वारकरी संप्रदाय यांचे हितासाठी केलेले कार्याचे कौतुक यातून होत आहे. त्यांनी निर्मल वारी, हरित वारी साठी विशेष योगदान देत पंढरपूर वारीत वारकऱ्यांना विविध सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या. या त्यांच्या कार्यकार्याचा सन्मान म्हणून हा पुरस्कार देण्यात येणार आहे. यापूर्वी देहू संस्थानतर्फे २५ वर्षांपूर्वी शरद पवार यांना देखील पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते.

### विविध कार्यक्रम

- रविवारी (दि. १६) बीज सोहळ्यादिनी श्री क्षेत्र देहूत विविध धार्मिक कार्यक्रम प्रथा परंपरांचे पालन करीत होणार आहेत. यामध्ये पहाटे तीन वाजता काकडा, पहाटे चार वाजता देवस्थानचे अध्यक्ष, विश्वस्त मंडळ यांचे हस्ते श्रींची पूजा, शिळा मंदिर महापूजा वंशज देहू/वारकरी यांचे हस्ते होईल. पहाटे सहा वाजता वैकुंठ गमन स्थान येथे पूजा, सकाळी साडे दहा वाजता श्रींची पालखी वैकुंठ गमन स्थानाकडे हरिनाम गजरात मार्गस्थ होईल. सकाळी दहा ते बारा यावेळेत श्रींचा बीज सोहळा होत आहे.

### देहूत तयारीला वेग

- देहू बीज सोहळ्यास सजत असून वारकरी भाविकांचे स्वागताची जय्यद तयारीने देहूत वेग घेतला आहे. दरम्यान सायंकाळी होळीचे पूजन देहू संस्थानचे वतीने परंपरेने झाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना संत तुकाराम महाराज पुरस्कार जाहीर झाल्या बद्दल आळंदी शहर शिवसेना शहर प्रमुख राहुल चव्हाण यांनी देहू देवस्थानचे निर्णयाचे स्वागत करीत आभार व्यक्त केले. पुरस्कार जाहीर झाल्या बद्दल एकनाथ शिंदे यांचे आळंदी शहर शिवसेना प्रमुख राहुल चव्हाण, शाखा प्रमुख रोहिदास कदम यांनी अभिनंदन केले.

# स्मशानभूमी शेडसाठी १७ लाखांचा निधी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

> येथील स्मशानभूमीत ७० टक्के जागा मोकळी असताना माजी सरपंच तानाजी वायसे यांच्या कार्यकालात चांगले असणारे निवारा शेड पाडण्यात आले ही दुर्दैवाची बाब आहे."
> — **जावेद शेख,** ग्रामस्थ भिगवण

> अनेक वर्षोपासून प्रलंबित असणारा स्मशानभूमी निवाराशेड प्रश्न मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या माध्यमातून मार्गी लागत आहे. तसेच मुस्लिम दफनभूमी निवाराशेड व सुशोभीकरण करिता निधी उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगण्यात आले."
> — **अजिंक्य माडगे, ,** जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस

**भिगवण :** भिगवणच्या स्मशानभूमीचे सुशोभीकरण होणार असून, यासाठी जवळपास १७ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. नुकतेच या कामाचे भूमिपूजन संपन्न झाले. येथील माजी सरपंच तानाजी वायसे यांच्या कार्यकाळात सुस्थितीत असणारे निवारा शेड जमीन दोस्त करण्यात आले. त्यामुळे अंत्यविधी साठी येणाऱ्या नागरिकांची मोठया प्रमाणावर गैरसोय होत होती. ही बाब विचारात घेऊन क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून तब्बल १७ लक्ष रुपयांचा निधी याठिकाणी मंजूर केला असून, प्रत्यक्ष कामालाही सुरुवात करण्यात आली आहे.

या कामाची टेंडर ऑनलाईन पध्दतीने करण्यात आले असून २१[illegible] कमी दराने, १३ लाख ३६ हजार ८९५ रु.या रक्कमेला स्वीकृत करण्यात आला आहे.

यावेळी सरपंच गुराप्पा पवार, अशोक शिंदे, आण्णासाहेब धवडे, सचिन बोगावत, अजिंक्य माडगे, संजय देहाडे, प्रा.तुषार क्षीरसागर, सत्यवान भोसले, पराग जाधव, बापूराव थोरात, जावेद शेख, संदीप वाकसे, अनिल तांबे, दत्ता धवडे, प्रदीप वाकसे, आकाश उंडाळे, दत्तात्रय पाचांगणे, मोहन शेंडगे, अमोल देवकाते, राजेंद्र हगारे, विक्रम देवकाते, सुरेश बिबे, रोहित शेलार, शुभम शेलार, अमित वाघ, संदीप शेलार, निखिल बोगावत, तानाजी वायसे, व ग्रामस्थ उपस्थित होते.

# जमीन खरेदीत एकाची फसवणूक




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** रांजणगाव गणपती ता. शिरुर येथील एका इसमाने जमीन खरेदी करण्यासाठी जमिनीचे मूळ मालकांना लाखो रुपये देऊन देखील सदर जमीन मालकांनी परस्पर सदर जमिनीचे दुसऱ्या व्यक्तीला विक्री करुन इसमाची फसवणूक केल्याची घटना घडली असून, रांजणगाव एमआयडीसी पोलीसांनी भीमराव सारंग रोकडे, सुभाष सारंग रोकडे, सविता वसंत राजगुरु, सुनिता भीमराव रोकडे, सागर भीमराव रोकडे, निशा भीमराव रोकडे उर्फ निशा अभिषेक सपकाळ, मंगल सुभाष रोकडे, प्रशांत सुभाष रोकडे, राकेश सुभाष रोकडे, मयूर वसंत राजगुरु, रविता दिपक पंचमुख, दिपक राजकुमार पंचमुख यांच्या विरुद्ध फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

रांजणगाव गणपती येथे भीमराव रोकडे व त्यांच्या कुटुंबियांच्या नावावर असलेली जमीन त्यांनी रांजणगाव गणपती येथील संदीप कुटे व भोसरी येथील नंदलाल अगरवाल यांच्याकडून काही रक्कम घेऊन सदर जमिनीचे कुटे व आगरवाल यांना साठेखत करुन दिले होते. त्यानंतर काही दिवसांनी भीमराव रोकडे व त्यांच्या कुटुंबियांनी पुन्हा सदर जमिनीचे रविता पंचमुख व दिपक पंचमुख यांना सोळा लाख रुपये घेऊन कुलमुखत्यारपत्र करुन दिले. याबाबतची माहिती संदीप कुटे यांना मिळाल्याने त्यांनी भीमराव रोकडे व दिपक पंचमुख यांना वेळोवेळी फोन करुन विचारणा केली असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली, मात्र लवकरच रोकडे सदर जमिनीचा व्यवहार पूर्ण होईल अशी खात्री संदीप कुटे यांना दिली. भीमराव रोकडे, रविता पंचमुख यांच्या कुटुंबातील अन्य लोकांनी संगनमत करत कुटे व आगरवाल यांच्या परस्पर कुलमुखत्यार पत्राच्या आधारे सदर जमिनीचे विशाल जिजाभाऊ पवळे यांना साठेखत करुन देत विक्री केली, याबाबत संदीप सुदाम कुटे (४२, रा. रांजणगाव गणपती ता. शिरुर) यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून, पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

# उन्हाळी भुईमूगास उष्णतेचा फटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खेड तालुक्याच्या दक्षिण भागातील शेतकऱ्यांनी उन्हाळी हंगामातील भुईमूग पिकाची टोकण पद्धतीने लागवड करण्यात केली आहे. मात्र, गेल्या पंधरा दिवसांपासून तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने भुईमूग पिकावर त्याचा विपरीत परिणाम होताना दिसत आहे. तीव्र उष्णतेमुळे पिकाला पिवळसर छटा आली असून, त्याचा वाढीवर परिणाम होत आहे.

चिंबळी, कुरुळी, मरकळ, निघोजे आदी परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी भुईमूग पिकाची टोकण पद्धतीने पेरणी केली होती. सुरुवातीला पिकाची वाढ चांगली झाली. मात्र, अचानक वाढलेल्या उष्णतेमुळे जमिनीतील आद्रता कमी होत आहे, परिणामी पिकावर ताण येऊ लागला आहे. पानांचा रंग फिकट होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे. पाण्याची टंचाई आणि वाढत्या तापमानामुळे भुईमूग पिकाला जीवदान देण्यासाठी ठिबक सिंचन व हलक्या पाण्याच्या आवळ्या देण्याची गरज निर्माण झाली आहे. काही शेतकरी ठिबकच्या सहाय्याने पिकाला पाणी देत आहेत, तर काहींना पाणीटंचाईमुळे अडचणींचा सामना करावा लागत आहे. कृषी तज्ज्ञांच्या मते, या उष्णतेचा पिकावर अधिक परिणाम होऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी शक्य तितक्या सावधगिरीने उपाययोजना कराव्यात.

# माऊली मंदिरात हरिनाम गजरात होलिकोत्सव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरासह शहरातील विविध मठ, मंदिर आणि घराघरांसमोर प्रथा परंपरांचे पालन करीत गुरुवारी (दि. १३ ) धार्मिक मंगलमय वातावरणात होलीकोत्सव हरिनाम गजरात साजरा करण्यात आला. आळंदी परिसरात धुलवड दिनी शुक्रवारी (दि. १४ ) पाणी वाचवा संदेश देत धुलिवंदन साजरी होत आहे.

माऊली मंदिरात नागरिक, भाविक, दर्शनार्थी यांची श्रीचे दर्शनासह होळी पूजन करण्यास मोठी गर्दी केली होती. यात महिला आणि मुलांची गर्दी लक्षणीय होती. यावर्षी होळी पूजन गुरुवारी आल्याने श्रींची गुरुवारची मंदिर प्रदक्षिणा पालखीची झाल्यावर नित्य नैमित्तिक धार्मिक कार्यक्रम हरिनाम गजरात झाले. अजानवृक्ष प्रांगणात होळी पूजन वेदमंत्र, हरिनाम जय घोषात पूजन करण्यात आले. यावेळी प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथजी, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, तुकाराम माने, मानकरी योगीराज कुऱ्हाडे, रामभाऊ चोपदार, सेवक कर्मचारी, साधक, भाविक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंदिरातील प्रथांचे पालन करीत हरीनाम गजरात मंदिरात होळी पूजन झाले. यावेळी व्यवस्थापक माऊली वीर यांचे सह वारकरी संप्रदायातील प्रथांचे पालन करीत परिश्रम पूर्वक होळीचे नियोजन केले. होळी पूजन वेदमंत्र, नामजयघोषात झाल्या नंतर होळी प्रज्वलीत करण्यात आली. महिला भाविक, मुले, नागरिकानी होळीस प्रदक्षिणा करीत नैवेद्य अर्पण करण्यास गर्दी केली.

ग्रामदैवत श्री भैरवनाथ मंदिर, श्री हजेरी मारुती मंदिर, श्री रामकृष्ण वारकरी शिक्षण संस्थेत हरिनाम गजरात परंपरेने होळी सण साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मोहन महाराज शिंदे, सचिन महाराज शिंदे संस्थेतील साधक विद्यार्थ्यांनी होळी साजरी करण्यास परिश्रम घेतले. येथील गोपाळपुरातील ज्ञानाई माधुकरी अन्नछत्र मध्ये होळी सण उत्साहात साजरा करण्यात आला. मधुकरी वाटप केंद्रातील साधकांना पोळीचा महाप्रसाद वाटपकरण्यात आला. आळंदीत राहून शालेय शिक्षण बरोबर वारकरी शिक्षण घेत असलेल्या वारकरी साधक मुलांना येथे दैनंदिन मधुकरी वाटप केली जाते. यासाठी रामेश्वर महाराज मायकर विशेष परिश्रम घेत आहेत.



# हवेली तालुक्यातील विकासकामांना गती मिळणार?




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश म्हसे यांनी हवेली तालुक्यातील विकासकामांचा पाहणी दौरा करत आढावा घेतला. या दौऱ्यात रस्ते, पूल, वाहतूक व्यवस्थापन आणि पर्यटनस्थळांच्या सुविधा यांसारख्या विविध प्रकल्पांची पाहणी त्यांनी केली. काही ठिकाणी तातडीने कार्यवाही तर काही ठिकाणी कारवाई करण्याचे आदेश दिले. आता मात्र विकास कामे गती घेणार का, येरे माझ्या मागल्या अशी अवस्था होणार याकडे जनतेच्या नजरा लागल्या आहेत.

दौऱ्याची सुरुवात श्रीक्षेत्र थेऊर येथील थेऊर ते काकडे मळा या रस्त्याच्या पाहणीपासून झाली. या रस्त्यालगत उच्चदाब व अति उच्च दाब विद्युत वाहिनीचे पोल असल्यामुळे कामात अडथळा येत असल्याचे, स्थानिक नागरिकांनी निदर्शनास आणून दिले. आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना पुढील दोन दिवसांत युद्धपातळीवर पोल स्थलांतरित करण्याचे निर्देश दिले. कामात दिरंगाई झाल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल असेही स्पष्ट केले. त्यानंतर त्यांनी थेऊर गणपती मंदिर परिसरातील वाहनतळाच्या सध्याच्या स्थितीची पाहणी केली. येथे वाहनांची वाढती गर्दी लक्षात घेता नवीन वाहनतळाच्या उभारणीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर मुळा-मुठा नदी काठच्या सती रमाबाई समाधी स्थळाची पाहणी करून, या ऐतिहासिक स्थळाच्या आवश्यक सुधारणा व विकासासाठी आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले.

प्रयागधाम येथे सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाची पाहणी करताना त्यांनी स्थानिक अडचणी जाणून घेतल्या. काम वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना देत संबंधित अधिकाऱ्यांना नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर हिंगणगाव येथे पीएमआरडीए कडून मंजूर झालेल्या नदीवरील पुलाच्या जागेची पाहणी केली. उरुळी कांचन येथे पुणे-सोलापूर महामार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येचा आढावा पोलीस निरीक्षक शंकर पाटील यांच्या कडून घेतला व वाहतूक व्यवस्थेची सविस्तर माहिती घेतली. त्यानंतर महामार्गालगतच्या अतिक्रमणांची पाहणी करत अतिक्रमणसाठी आवश्यक त्या उपाययोजना राबविण्याच्या सूचना दिल्या. दौऱ्यात पीएमआरडीएचे मुख्य अभियंता अशोक भालकर, अधीक्षक अभियंता प्रभाकर वसईकर, कार्यकारी अभियंता शितल देशपांडे, उपअभियंता सुभाष मोरे, कनिष्ठ अभियंता ज्ञानेश्वर आतकरे, विद्युत उपअभियंता मनोज जगताप, कनिष्ठ अभियंता प्रशांत सावंत हे अधिकारी त्यांच्या समवेत होते. तसेच थेऊर ग्रामपंचायत सदस्य युवराज काकडे, कोरेगावमुळचे विठ्ठल शितोळे, प्रयागधाम ग्रामपंचायतचे पदाधिकारी, इतर मान्यवर उपस्थित होते.

## कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



**अवसरी :** नन्ही कली प्रकल्प अंतर्गत केसी महिंद्रा एज्युकेशन ट्रस्ट आणि नांदी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गावडेवाडी येथे २०२४-२५ शैक्षणिक वर्षासाठी २१ व्या शतकातील कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण झाला. या विशेष प्रशिक्षणात इयत्ता सहावी व सातवीतील ८३ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विविध गटकार्य, उपक्रम व प्रकल्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आधुनिक कौशल्ये आत्मसात केली. खेळ, कृती आणि अनुभवाधारित शिक्षण यांद्वारे हे १५ दिवसांचे प्रशिक्षण राबविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नन्ही कलीच्या शिक्षिका कविता बाणखेले व अमोल वाकचौरे तसेच वर्गशिक्षक अरविंद मोढवे, स्मिता चासकर आणि मुख्याध्यापिका शशिकला चिखले यांनी विशेष योगदान दिले. यावेळी गावाचे सरपंच विजय गावडे, माजी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष विशाल शिंदे, मंदा लोंढे, कल्पना अभंग, रूपाली लाळगे, दिलीप भवारी आणि वामन झुर्वे यांची उपस्थिती लाभली.

## शिरदाळे येथे टँकर सुरू



**अवसरी :** शिरदाळे (ता. आंबेगाव) येथे दूषित पाण्यामुळे पाण्याची गैरसोय झाली होती. पाणीसाठा असून देखील तो खराब असल्याने वापरता येत नव्हता. त्यासंदर्भात शिरदाळे ग्रामपंचायतच्या वतीने आंबेगाव तालुका पंचायत समिती पाणीपुरवठा विभागाला निवेदन दिले होते. तसेच माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांना भेटून टँकर सुरू करण्यासंदर्भात निवेदन दिले होते. त्यावेळी वळसे पाटील यांनी पाणीपुरवठा अधिकारी विशाल भंडारी यांना संपर्क करून पाण्याचे टँकर त्वरित सुरू करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानंतर ग्रामपंचायतने प्रस्ताव तयार करून तो पंचायत समितीला दिला आणि सर्व कागदपत्रे पूर्तता केली. बुधवारी (दि. १३ ) शिरदाळे येथे टँकर सुरू करण्यात आले. दररोज एक फेरी या प्रमाणे टँकर येणार असून त्यामुळे पाण्याची सुविधा झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. एवढ्या तातडीने पाण्याचे टँकर सुरू झाल्याने माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे तसेच पंचायत समिती पाणीपुरवठा विभाग, तहसीलदार संजय नागटीळक, गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज, पाणीपुरवठा अधिकारी विशाल भंडारी यांचे ग्रामस्थांनी आभार मानले. शिरदाळे ग्रामपंचायतच्या माध्यमातून सरपंच सुप्रिया तांबे, ग्रामसेवक अनिल टेमकर यांनी तसेच ग्रामपंचायत सदस्य यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्याला यश आल्याने पाण्याची समस्या दूर झाली आहे.

## कुसुमबाई गावडे यांचे निधन



**मंचर :** आदर्श गाव गावडेवाडी (ता. आंबेगाव ) येथील कुसुमबाई तुकाराम गावडे (७०) यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पती, दोन मुलगे, सुना, दीर, पुतणे असा परिवार आहे. मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सहसचिव गणेश गावडे यांच्या त्या आई, तर भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन ज्ञानेश्वर माऊली गावडे यांच्या त्या भावजय होत.

## संतोष देशमुख हत्याकांडाचा निषेध



**सासवड :** बीड येथील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ सासवड (ता.पुरंदर) येथील शिवतीर्थावर सकल मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने कॅण्डल मार्च काढण्यात आला. यांप्रसंगी सरपंच संतोष देशमुख यांच्यासह महादेव मुंडे आणि सोमनाथ सूर्यवंशी सामुहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सकल मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्यासह महादेव मुंडे आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येच्या निषेधार्थ निषेध सभेचे आयोजन करण्यात आले होते. यांप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत आक्षेपार्ह विधान करणा-या अबू आझमी, राहूल सोलापूरकर आणि प्रशांत कोरटकरच्या प्रतिमांना जोडे मारून निषेध करण्यात आला. संतोष देशमुख यांसह बीडमधील इतर हत्यांचा खोलवर तपास करून सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी यासह अन्य मागण्याही करण्यात आल्या आहेत.

# का वाढतात उंदीर?

पृथ्वीवर प्राण्यांच्या लाखो प्रजाती आढळतात. यातील काही प्राणी नामशेष झाले आहेत तर काही प्राण्यांची लोकसंख्या वाढत आणि कमी होत आहे. शहरांमध्ये उंदरांची संख्या झपाट्याने का वाढत आहे, हे जाणून घेतले पाहिजे. तीव्र हवामानबदलाच्या काळातही उंदरांच्या संख्येत फरक नाही, उलट वाढतच आहे. शहरांमध्ये, घरांमध्ये, कार्यालयांमध्ये, रेल्वे स्थानकांवर, बसस्थानकांवर, मेट्रोमध्ये सर्वत्र उंदीर दिसतात. शहरांमधील तापमान खेड्यांच्या तुलनेत जास्त असतानाही उंदरांची संख्या झपाट्याने वाढत आहे. जागतिक तापमानवाढीबरोबरच झपाट्याने वाढणारे शहरीकरण हे त्यामागील प्रमुख कारण आहे. उंदीर ५० हून अधिक झुनोटिक रोग पसरवतात. वास्तविक, झुनोटिक रोग हे मानव आणि प्राण्यांमध्ये पसरणारे संक्रमण आहे. हे संक्रमण विषाणू, जीवाणू, परजीवी आणि बुरशी यासारख्या जंतूंमुळे होते. यापैकी काही संक्रमण प्राणघातक ठरू शकते. शहरांमधील उंदरांच्या वाढत्या संख्येमुळे आरोग्यतज्ज्ञ चिंतेत आहेत. संशोधकांनी या अभ्यासात १६ शहरांचा समावेश केला. त्यापैकी अकरा शहरांमध्ये उंदरांच्या संख्येत मोठी वाढ नोंदवण्यात आली. ज्या शहरांमध्ये सरासरी तापमान सामान्यपेक्षा जास्त होते, तेथे उंदरांच्या संख्येत ४०.७ टक्के वाढ नोंदवली गेली. तापमान सामान्यपेक्षा कमी नोंदवले गेलेल्या ठिकाणी उंदरांच्या संख्येत घट झाल्याचे दिसून आले आहे. संशोधनात उंदरांच्या दोन प्रजातींवर लक्ष केंद्रित केले गेले आहे. नॉर्वेजिकस उंदीर जगभरात पसरले आहेत. कृषी उत्पादन आणि अन्न पुरवठ्याचे सर्वाधिक नुकसान करण्यासाठी त्यांना जबाबदार मानले जाते. अहवालानुसार, एकट्या अमेरिकेत उंदरांमुळे झालेल्या नुकसानाची अंदाजे वार्षिक किंमत एकूण २७ अब्ज डॉलर इतकी आहे.



# शापित गाव बनले पर्यटनस्थळ!



प्रत्येक गावाचा एक इतिहास असतो, एक गुपित असते. भारतातील असेच एक गाव अनेक वर्षे निर्मनुष्य होते. ओसाड पडलेल्या या गावाकडे आज अनेक पर्यटक आकर्षित होतात. राजस्थानच्या जैसलमेरपासून सुमारे १७ किलोमीटर पश्चिमेला कुलधारा हे एक झपाटलेले गाव आहे. तीन शतकांपूर्वी ते एक समृद्ध शहर होते; पण तिथे आता कोणीही राहत नाही. हे गाव १२९१ मध्ये पालीवाल ब्राह्मणांनी वसवले होते. कोरड्या वाळवंटात वसलेले असूनही येथे मुबलक प्रमाणात पिके घेतली जात होती. यामुळे एके काळी हे ठिकाण खूप समृद्ध होते; पण १८२५ मध्ये एका रात्री कुलधारा आणि आजूबाजूच्या ८४ गावांमधील सर्व लोक अंधारात गायब झाले.

असे म्हटले जाते की सलीम सिंग हा तरुण गावप्रमुखाच्या मुलीच्या प्रेमात पडला. आपण तिच्याशी तिच्या संमतीने किंवा संमतीशिवाय लग्न करु, असे त्याने जाहीर केले. त्याने गावकऱ्यांना धमकी दिली की त्याच्या इच्छेचे पालन न झाल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील. मागणी मान्य करण्याऐवजी ग्रामस्थांच्या परिषदेने त्याला रात्रीतून घर सोडण्यास सांगितले. अशा वेळी गाव सोडून जाण्यापूर्वी त्याने कुलधाराला शाप दिला की येथे कोणीही कधीही स्थायिक होऊ शकणार नाही. या शापामुळे म्हणे गाव अजूनही ओसाड आहे. गावात कोणीही एक रात्रही घालवू शकलेले नाही. नंतरच्या काळात काही लोकांनी येथे स्थायिक होण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांना समजले की तेथे विचित्र हालचाली होतात. त्यामुळे त्यांनीही ते ठिकाण सोडले. कुलधाराचे अवशेष हे त्या काळातील स्थापत्यकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहेत.

कुलधारा गावात राहणारे ब्राह्मण वैष्णव धर्माचे पालन करत होते. या गावातील मुख्य मंदिर भगवान विष्णू आणि महिषासूर मर्दिनी यांना समर्पित आहे. याशिवाय येथे गणपतीच्या अनेक मूर्ती आहेत. येथील अरुंद रस्ते आणि उद्ध्वस्त इमारती लोकांना आकर्षित करतात. गावांमधील झोपड्या कोसळून अवशेषांमध्ये रूपांतरित झाल्या आहेत. येथे एका देवीच्या मंदिराचे अवशेष शिल्लक आहेत. मंदिराच्या आत सापडलेल्या शिलालेखांवरून पुरातत्वशास्त्रज्ञांना गाव आणि येथे राहणाऱ्या लोकांबद्दल माहिती मिळाली. आज राज्य पुरातत्व विभागाने या गावाला संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले आहे.

या गावात सुमारे ४१० इमारतींचे अवशेष दिसतात. गावाच्या बाहेरील बाजूस असलेल्या खालच्या वस्तीमध्ये सुमारे २०० इतर इमारती बांधण्यात आल्या. या गावातील लोक प्रामुख्याने शेती आणि व्यवसाय करत होते. ते मातीपासून बनवलेल्या सजावटीच्या भांड्यांचा वापर करत असत. हे ठिकाण ओसाड का झाले, याबद्दल अचूक माहिती नाही. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला अज्ञात कारणांमुळे ते सोडून देण्यात आले होते, असे सांगितले जाते, मात्र यामागील कारण आजही कोणीही स्पष्ट करू शकलेले नाही. सलीम सिंगच्या आख्यायिकेव्यतिरिक्त लोकांच्या मते पाण्याच्या कमतरतेमुळे किंवा भूकंपामुळेही लोक गाव सोडून गेले असावेत.

आता मात्र दररोज हजारो देशी-विदेशी पर्यटक येथे भेट देण्यासाठी येतात. सकाळी आठ ते संध्याकाळी सहादरम्यान गावाला भेट देता येते. कारण हे ठिकाण भुताटकीने पछाडलेले मानले जाते. स्थानिक लोक सूर्यास्तानंतर दरवाजे बंद करतात. त्यानंतर इथे कोणीही राहत नाही. कुलधारा हे गावजैसलमेरपासून सुमारे १८-२० किलोमीटर अंतरावर आहे. जैसलमेरहून कॅब किंवा बसने कुलधारा येथे पोहोचता येते. जैसलमेरचे सर्वात जवळचे विमानतळ म्हणजे जोधपूर. जोधपूर पासून कुलधरा ३०० किलोमीटर अंतरावर आहे. येथे भेट देण्याचा सर्वोत्तम काळ म्हणजे ऑक्टोबर ते मार्च हा आहे.

# गंगा दूषित का होत नाही?



गंगा नदी भारतीयांचे श्रद्धास्थान आहे. गंगा नदीला धार्मिक महत्त्वदेखील आहे. अनेक पौराणिक कथांमध्ये गंगा नदीचा उल्लेख सापडतो. गंगेचे पाणी कधीच खराब होत नाही. दरवर्षी गंगेत स्नान करणाऱ्या भाविकांची संख्या वाढत आहेत; मात्र तरीही गंगेचे पाणी कधीच खराब का होत नाही, या विषयावर गेले काही दिवस संशोधन सुरू होते. गंगेचे उगमस्थान हिमालय आहे. गंगोत्री हे अनेक भाविकांचे पूजास्थान आहे. गंगेचे पाणी कित्येक महिने साठवून ठेवता येते. ते कधीच खराब होत नाही. इतकेच नव्हे तर, धार्मिक सणांच्या दिवशी दररोज लाखो भाविक गंगेत स्नान करतात. महाकुंभ मेळाव्यामध्ये करोडो भाविक गंगेत अमृतस्नानासाठी येतात; मात्र तरीही कधीच या पाण्यातून महामारी किंवा आजाराचा संसर्ग होत नाही. गंगेच्या पाण्यात अशी तीन तत्व असतात यामुळे गंगेचे पाणी स्वच्छ राहते. राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी आणि अनुसंधान संस्थानने गंगेवर संशोधन केले आहे. यात समोर आले, की गंगेच्या पाण्यातच असे गुण असतात जे स्वतःच पाणी स्वच्छ करतात. गंगेच्या पाण्यात मोठ्या प्रमाणात 'बॅक्टीरियोफेज' असतात. जे गंगेत प्रदूषण होण्यापासून बचाव करतात. हे संशोधन 'स्वच्छ गंगा मिशन'अंतर्गत 'नीरी' चे शास्त्रज्ञ डॉ. कृष्णा खैरनार यांच्या नेतृत्वात करण्यात आले आहे.

या संधोधनासाठी तीन टप्प्यात गंगा नदीची विभागणी करण्यात आली आहे. यातील पहिला गोमुख हरिद्वार, दुसरा हरिद्वार ते पाटणा आणि तिसरा पाटणा ते गंगासागर. डॉ. खैरनार यांच्या संशोधनानुसार संशोधकांनी ५० वेगवेगळ्या ठिकाणाचे गंगा जल, नदीच्या तळाशी असलेली रेती आणि मातीचे सॅँपल घेतले आहेत. गंगा नदीत स्वतःलाच शुद्ध ठेवणारे गुण आहेत. संशोधकांनी कुंभ मेळेच्या दरम्यान सॅँपल एकत्र केले आहेत. गंगा जलमध्ये बॅक्टीरियोफेज आढळून आले आहेत. जे पाण्यातील किटाणू नष्ट करतात. गंगेच्या पाण्यात ऑक्सिजनची मात्रा अधिक असते. गंगाजलात ऑक्सिजनचा स्तर २० मिलीग्रॅम प्रती लीटरपर्यंत आढळून आला आहे. त्याचबरोबर टेरपिन नावाचे एक फाइटोकेमिकलदेखील आढळून आले आहे. हे तीन तत्व गंगेचे पाणी शुद्ध ठेवतात. यमुना आणि नर्मदा नदीच्या पाण्यावरदेखील संशोधन करण्यात आले आहे; मात्र या नद्यांमध्ये या तत्वांचे प्रमाण खूपच कमी आहे.

# चला, वृक्षारोपण करू या!



जगभरातच जंगलांचं प्रमाण झपाट्याने कमी होत आहे. बेसुमार जंगलतोडीचे परिणाम आता दिसू लागले आहेत. पूर, दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे अनेक लोक बेघर होत आहेत. जागतिक तापमानवाढीची समस्या 'आ वासून' उभी आहे. काही लोक 'झाडं लावा, झाडं जगवा'सारखी मोहीम हाती घेतात, रोपटी लावतात, ती जगवतात. जगभरात विविध दिन साजरे केले जातात. मात्र झाडं लावण्याचा कोणताही दिवस नसतो. असा एक विशेष दिन असणं गरजेचं आहे. या दिवशी लोकांना सुट्टी द्यायला हवी. यामुळे झाडांचं आणि पर्यायाने जंगलांचं प्रमाण वाढेल. तुर्कस्थानमधल्या एका माणसाने ही कल्पना दिली. एनस साहिन असं या माणसाचं नाव आहे.

त्याच्या ट्विटला तुफान प्रतिसाद मिळत आहे. 'माझ्याकडे एक कल्पना आहे. आपण राष्ट्रीय वृक्षारोपण दिन साजरा करू या. एक दिवस सुट्टी घेऊन झाडं लावू या, आपण जगापुढे चांगलं उदाहरण ठेऊ या आणि येत्या पिढ्यांना हिरवागार देश भेट देऊ या', असं ट्विट त्याने केलं होतं. तुर्कस्थानच्या राष्ट्रपतींनीही या ट्विटची दखल घेतली आहे. त्यांनी त्यावर सकारात्मक प्रतिक्रिया दिली आणि राष्ट्रीय वृक्षारोपण दिनाला मान्यताही दिली. यानंतर साहिननेही राष्ट्रपतींचे आभार मानले. यामुळे तुर्कीत वृक्षारोपणासाठी सुट्टी मिळणार आहे. मात्र त्याआधीच झाडं लावण्यासाठी असंख्य हात पुढे आले आहेत.



# जगातलं सर्वात सुरक्षित घर

आपलं रहातं घर, इमारत सुरक्षित असावी असं प्रत्येकालाच वाटत असतं. म्हणूनच भूकंपप्रवण क्षेत्रात विशेष काळजी घेतली जाते. विशिष्ट पद्धतीने इमारती उभारल्या जातात. अग्निशमन यंत्रणा बसवली जाते. सुरक्षेचे शक्य ते सर्व उपाय केले जातात. मात्र एखादा अणूबॉम्ब पडला तर काहीच खैर नसते. पण जगात अत्यंत सुरक्षित असं एक घर आहे. या घरावर अणूबॉम्बचाही प्रभाव पडत नाही. हे अमेरिकेसारख्या बलशाली राष्ट्राच्या प्रमुखाचं घर असावं, असं तुमच्या मनात आलं असेल. पण हे घर पोलंडमध्ये आहे. विशेष म्हणजे ते एका सामान्य माणसाचं घर आहे. पोलंडच्या राजधानीत रहाणाऱ्या एका माणसाला सर्वात सुरक्षित घर बांधायचं होतं. मग त्याने देशातल्या सर्वात नावाजलेल्या आर्किटेक्चर फर्मकडे याबाबत विचारणा केली. यानंतर कंपनीने बांधलेलं घर बघून कोणीही थक्क होईल. हे जगातलं सर्वात सुरक्षित घर ठरलं आहे. विशेष म्हणजे फक्त एक बटण दाबल्यानंतर हे घर चारही बाजूंनी सिमेंटच्या भिंतींनी बंद होतं. हे घर एखाद्या किल्ल्यासारखं दिसू लागतं. यानंतर कोणीही घरात प्रवेश करू शकत नाही. घरमालकाची इच्छा असेल तर दुसऱ्या मजल्यावरच्या पुलावरून घरात शिरता येतं. घराच्या पुढच्या बाजूला शटरही आहे. पूर्णपणे बंद झाल्यानंतर या घरावर अणूबॉम्बचाही प्रभाव पडत नाही, असा या आर्किटेक्चर फर्मचा दावा आहे.

# निरागस कैदी!

दुकानात चोरांनी धुमाकूळ घातला असेल, कोणी उगाचच त्रास देत असेल तर पोलिसात तक्रार केली जाते. मात्र न्यूझीलंडमधल्या वेलिंग्टन इथल्या एका दुकानदाराने चक्क दोन पेंग्विनविरोधात पोलिसात तक्रार दिली. गंमत म्हणजे न्यूझीलंड पोलिसांनी या पेंग्विनना ताब्यातही घेतलं. मात्र काही वेळानंतर त्यांना सोडून देण्यात आलं. इथल्या सुशीची विक्री करणाऱ्या दुकानात हे पेंग्विन सारखे घुसत होते. यामुळे दुकानदार खूपच वैतागला होता. त्याने पेंग्विनना बरेचदा बाहेर काढलं. पण ते पुन्हा पुन्हा येत असल्याने अखेर पोलिसात तक्रार द्यावी लागली. पेंग्विनची ही जोडी काही काळ पोलिसांच्या ताब्यात होती. मग त्यांना वेलिंग्टन हार्बरवर सोडण्यात आलं. या ठिकाणी पेंग्विनची ६०० जोडपी रहातात. सध्या पेंग्विनचा प्रजननाचा काळ असल्यामुळे हे पक्षी सुरक्षित जागेच्या शोधात भटकत असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. याच कारणासाठी पेंग्विनची ही जोडी दुकानात घुसखोरी करत असावी.



# चीनमध्ये वाघाचे मूत्र पाजण्याचा व्यवसाय!

चीनमधील प्राणीसंग्रहालय सध्या सोशल मीडियावर लोकांच्या चर्चेचा विषय बनले. कारण खूप धक्कादायक आहे. देशाच्या सिचुआन प्रांतात असलेल्या या प्राणीसंग्रहालयात वाघाचे मूत्र विकले जाते. यामुळे सांधेदुखीसह इतर अनेक आजार बरे होऊ शकतात, असा दावा केला जात आहे. पांढऱ्या वाईनमध्ये मिसळून प्यायल्यास ते आणखी प्रभावी ठरते, असा दावाही करण्यात आला आहे. येथील लोक वाघाच्या मूत्राच्या बाटलीसाठी सुमारे ६०० रुपये मोजायला तयार आहेत. सिचुआन प्रांतातील यान बायफेंगक्सिया वन्यजीव प्राणीसंग्रहालयाचा दावा आहे, की वाघाच्या मूत्रात पांढरी वाइन मिसळल्याने आरोग्यावर चांगला परिणाम होतो. 'साऊथ मॉर्निंग चायना पोस्ट'नुसार, प्राणीसंग्रहालयातून परतणाऱ्या एका व्यक्तीने सोशल मीडियावर याची माहिती दिली. तेव्हा ही बाब समोर आली. व्यक्तीच्या म्हणण्यानुसार, येथे सायबेरियन वाघांचे मूत्र लोकांना विकले जात आहे. त्याचे अनेक फायदे आहेत. वाघाच्या मूत्राच्या २५० मिलीलीटर बाटलीची किंमत ५० युआन (म्हणजे अंदाजे ६०० रुपये) आहे. रिपोर्टनुसार, बाटलीवर स्पष्टपणे लिहिले आहे, की यामुळे सांधेदुखी, स्नायूंच्या दुखण्यापासून आराम मिळतो. त्याचा वापर कसा करायचा हेही समजावून सांगितले आहे. पांढऱ्या वाईनमध्ये आल्याचा तुकडा मिसळून प्यावे, असे लिहिले आहे. लोकांना कोणत्याही प्रकारची ऍलर्जी असल्यास त्याचा वापर करू नये असा इशाराही देण्यात आला आहे. तज्ज्ञांनी याला दिशाभूल करणारे म्हटले आहे. एका चिनी फार्मासिस्टने सांगितले, की या प्रकरणामुळे केवळ वाघांच्या संवर्धनालाच हानी पोहोचत नाही, तर पारंपारिक चीनी औषधांची बदनामीही होत आहे. फार्मासिस्टने सांगितले, की वाघाचे मूत्र उपचार म्हणून वापरले जात असल्याचा कोणताही पुरावा नाही; मात्र या व्यवसायाचा परवाना आपल्याकडे असल्याचा दावा प्राणीसंग्रहालयाने केला आहे.





'उथप्पाला म्हणत होता की कोहलीच्या काही आवडी-निवडी आहेत. पण माझ्याबाबतीत, कोहली असा एक व्यक्ती होता, ज्याला मी आवडायचो. त्याच्या नेतृत्वाखाली मी अनेक सामने भारतासाठी खेळलो. तो असा व्यक्ती होता, ज्याने मला संघात परत आणले. त्याला संघर्ष माहित आहे कारण तो देखील एका प्रामाणिक कुटुंबातून येतो.' 'त्याच्या नेतृत्वात त्याला नेहमीच निकालाची अपेक्षा असायच, जे सर्वांना माहित आहे. उथप्पाने म्हटले की त्याच्या नेतृत्वात त्याने चुका केल्या, पण त्या त्याच्या आवडी-निवडी नव्हत्या, तर त्यामागे तर्क होते.' 'मी असं म्हणणार नाही की कोहली, शास्त्री किंवा एमएसके प्रसाद यांच्यापैकी कोणी निर्णय घेतला. हा मिळून घेतलेला निर्णय होता. त्यांना कदाचित वाटलं असेल की संघासाठी दुसरं कोणीतरी योग्य होतं. यात कोणाचाही काही वैयक्तिक हेतू नव्हता.'

— अंम्बाती रायडू

# मुंबई-दिल्लीमध्ये फायनल

## विजेत्याला बक्षीस किती? : गुजरातवर मिळवला दणदणीत विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** महिला प्रिमिअर लीगचा अंतिम सामना शनिवारी पंधरा मार्च रोजी रंगणार आहे. दिल्ली कॅपिटल्स व मुंबई इंडियन्स या संघांनी ८ पैकी ५ सामने जिंकत अंतिम फेरी गाठली. त्यामुळे मुंबई इंडियन्स व दिल्ली कॅपिटल्समध्ये यांच्यादरम्यान डब्लुपीएलच्या तिसऱ्या हंगामातील फायनलचा थरार पाहायला मिळणार आहे. पण तुम्हाला महिला प्रिमिअर लीगमध्ये विजेतेपद पटकावणाऱ्या संघाला बक्षीस किती मिळणार माहीत आहे का?

महिला प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेचा अंतिम सामना दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स संघात शनिवारी (१५ मार्च) होणार आहे. हा अंतिम सामना मुंबईतील ब्रेबॉर्न स्टेडियमवर खेळवण्यात येणार आहे. तर अंतिम सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी ७.३० वाजता सुरू होईल, त्याआधी संध्याकाळी ७ वाजता नाणेफेक होईल.

तिम सामना स्टार स्पोर्ट्स नेटवर्क टीव्ही चॅनेलवर लाईव्ह पाहाता येईल. त्याचबरोबर जिओ हॉटस्टार या ओटीटी प्लॅटफॉर्मवरही हा सामना लाईव्ह पाहाता येणार आहे.

बक्षीस किती?

डब्लूपीएल २०२५ हंगामासाठी बीसीसीआयकडून बक्षीसाची रक्कम जाहीर झालेली नाही. परंतु मागच्या हंगामातील बक्षीसाची रक्कम यावेळीही मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे मागच्या हंगामातील बक्षीसानुसार विजेत्या संघाला ६ कोटी रूपये व उपविजेत्या संघाला ३ कोटी रूपये बक्षीस मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता तिसऱ्या हंगामातील चषकावर कोणता संघ नाव कोरतो हे पाहणे महतत्वाचे ठरले आहे.

### दिल्ली कॅपिटल्स

● मेग लॅनिंग (कर्णधार), जेमिमाह रॉड्रिग्स, शफाली वर्मा, स्नेहा दीप्ती, ॲलिस कॅप्सी, ॲनाबेल सदरलँड, अरुंधती रेड्डी, जेस जोनासेन, मारिझान काप, मिन्नू मणी, नल्लापुरेड्डी चरणी, निकी प्रसाद, राधा यादव, शिखा पांडे, नंदिनी कश्यप, सारा ब्राइस, तानिया भाटीया, तितास साधू.

### मुंबई इंडियन्स

● हरमनप्रीत कौर (कर्णधार), अक्षिता माहेश्वरी, अमनदीप कौर, अमनजोत कौर, अमेलिया केर, क्लो ट्रायॉन, हेली मॅथ्यूज, जिंतीमनी कलिता, कीर्थना बालकृष्णन, नदिन डी क्लर्क, नतालिया सायव्हर-ब्रंट, सजीवन सजना, सांस्कृती गुप्ता, जी कामिलिनी, यास्तिका भाटीया, सायका इशाक, शबनीम इस्माईल, पारुनिका सिसोदिया.

# गार्गी एज्युकॉन, रायगड वॉरीयर्स संघांची विजयी कामगिरी





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लायन शंतनु सिद्धा स्मृतीप्रित्यर्थ दुसऱ्या 'लायन्स् प्रौढ करंडक' (४० वर्षावरील) टी-२० क्रिकेट स्पर्धेत गार्गी एज्युकॉन आणि रायगड वॉरीयर्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेचा उद्‌घाटनाचा दिवस गाजवला.

येवलेवाडी येथील ब्रिलीयंट्स स्पोर्टर्स ॲकॅडमी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत गणेश कडू याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे रायगड वॉरीयर्स संघाने सीए रॉयल्स् संघाचा ५ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना सीए रॉयल्स् संघाने २० षटकामध्ये १११ धावांचे लक्ष्य उभे केले. यामध्ये अमित बलदोटा याने ४१ धावांची खेळी केली. गणेश कडू याने ५ धावांमध्ये २ गडी टिपले. तर, देवेंद्र चौधरी याने १२ धावांमध्ये २ गडी बाद केले. हे लक्ष्य रायगड वॉरीयर्स १६.१ षटकात व ५ गडी गमावून पूर्ण केले. पुष्कराज जोशी (नाबाद ३० धावा), विनोद भोईर (२४ धावा) आणि प्रितम कारीया (नाबाद १६ धावा) यांनी छोट्या धावांच्या खेळी करून संघाला सहज विजय मिळवून दिला.

तनिष्क ठक्कर याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे गार्गी एज्युकॉन संघाने दिक्षीत रॉयल्स्चा २६ धावांनी पराभव करून स्पर्धेत पहिला विजय मिळवला. पहिल्यांदा फलंदाजी करताना गार्गी एज्युकॉन संघाने १४० धावा धावफलकावर लावल्या. तनिष्क ठक्कर याने ४४ चेंडूत ८ चौकार आण एका षटकारासह ५२ धावांची खेळी केली.

# हॅरी ब्रुकवर बीसीसीआय कडून बंदीची कारवाई

**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेला काही दिवसांचाच कालावधी राहिला असतानाच दिल्ली कॅपिटल्सला धक्का बसला. दिल्ली कॅपिटल्सने आयपीएल २०२५ लिलावात ६.२५ कोटी रुपयांना



आपल्या संघात घेतलेल्या हॅरी ब्रुकने अचानक या स्पर्धेतून माघार घेतली आहे. ब्रुकने आगामी आंतरराष्ट्रीय मालिकांमध्ये पूर्ण तयार राहण्यासाठी आयपीएल २०२५ मधून माघार घेतली आहे. आयपीएलमधून माघार घेण्याची ही त्याची दुसरी वेळ आहे. यापूर्वी गेल्यावर्षीही त्याने माघार घेतली होती. त्यामुळे आता त्याच्यावर बीसीसीआयच्या नियमानुसार २ वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. इंडियन एक्सप्रेसनुसार बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे की इंग्लंड क्रिकेट बोर्डाला आणि हॅरी ब्रुक याच्याशी बंदीबाबत बीसीसीआयने अधिकृतपणे संपर्क साधला आहे. त्यांना दोन वर्षांच्या बंदीबाबत कळवण्यात आले आहे. हा नियम यापूर्वीच आयपीएल लिलावासाठी नाव नोंदणी करण्यापूर्वीच प्रत्येक खेळाडूला सांगण्यात आला होता. हा बीसीसीआयचा नियण आहे आणि प्रत्येक खेळाडूने त्याचे पालन करायला हवे. ब्रुक यापूर्वी आयपीएल २०२३ मध्ये सनरायझर्स हैदराबाद संघाकडून खेळला आहे. त्याने ११ सामने खेळताना १९० धावा केल्या होत्या. त्याला आयपीएल २०२४ मध्ये दिल्ली कॅपिटल्सनेच ४ कोटींना खरेदी केले होते.

# एफसी शिवनेरी, भारती एफसी, लिजंड्स युनायटेड संघ विजयी



**पुणे :** व्दितीय श्रेणी गटाच्या सामन्यात एफसी शिवनेरी, भारती एफसी, लिजंड्स युनायटेड फुटबॉल क्लब आणि खडकी ब्ल्युज् या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघाचा पराभव करून विजयी कामगिरी केली. कात्रज येथील भारती विद्यापीठ मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेच्या व्दितीय श्रेणीगटामध्ये एफसी शिवनेरी संघाने युनिक वानवडी फुटबॉल क्लबचा ३-१ असा सहज पराभव केला. सामन्यामध्ये राजेश पवार याने दोन गोल तर, दिपक शर्मा याने एक गोल नोंदविला. एकतर्फी झालेल्या सामन्यामध्ये भारती एफसी संघाने रेंजहिल्स् मिलान एफसीचा ७-० असा सहज पराभव केला. भारती एफसीकडून रूसुका मोरे याने दोन गोल केले. संकल्प छेत्री, बंकीमचंद्र त्रिपुरा, टॉम योमसोह, तोडक रिसो आणि हुपेर नॉंगफोड यांनी प्रत्येकी एकेक गोल करून संघाला सहज विजय मिळवून दिला. लिजंड्स युनायटेड फुटबॉल क्लबने सुद्धा एफसी बॅक्डीनो क संघाचा ८-० असा सहज पराभव केला. विजयी संघाकडून आर्यन तांबे याने तीन गोल तर, अमन गुप्ता आणि दुर्वांकूर हुंबे यांनी प्रत्येकी दोन गोल तर, जयदीप शेलार याने एक गोल नोंदविला. खडकी ब्ल्युज् संघाने मॅथ्यु फुटबॉल ॲकॅडमीचा ५-१ असा सहज पराभव केला. सामन्यामध्ये अथर्व कुसाळकर याने तीन गोल आणि सौरभ यादव याने दोन गोल केले.

# दिग्विजय, महेश, पारस, विजय, लक्ष्मण, हिमांशू यांची आगेकूच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना यांच्या वतीने व आरसीबीसी आणि अमनोरा स्पोर्टस क्लब(द फर्न) यांच्या सहकार्याने आयोजित पीवायसी मोतीलाल ओसवाल खुल्या स्नूकर स्पर्धेत दिग्विजय कडियन, महेश जगदाळे, पारस गुप्ता, विजय निचानी, लक्ष्मण रावत, हिमांशू जैन, शिवम अरोरा यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली.

पीवायसी हिंदू जिमखाना, आरसीबीसी आणि अमनोरा स्पोर्टस क्लब(द फर्न) या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत राउंड रॉबिन फेरीत हरियाणाच्या राष्ट्रीय खेळाडू दिग्विजय कादियन याने स्वप्नील बिचेचा ३-०(१२८(१२८)-००, ११३(१०६)-००, ७५-१३) असा एकतर्फी पराभव करून आजचा दिवस गाजवला. दिग्विजय याने आपल्या खेळीत पहिल्या फ्रेममध्ये १२८ गुणांचा हायेस्ट ब्रेक नोंदवला. त्यापाठोपाठ त्याने दुसऱ्या फ्रेममध्येदेखील १०६ गुणांचा शतकी ब्रेक नोंदवला. महेश जगदाळे याने रोहन कोठारेचा ३-०(७३-२०, ४१-४३, ७३-२८, ६१-२३) असा तर, पारस गुप्ताने रोविन डिसूझाचा ३-१(७८-३५, ४९-६३, १०५(९७)-०८, ८५(६५)-२७) असा पराभव केला. चुरशीच्या लढतीत विजय निचानीने राहुल नारंगचा ३-२(५९-४१, ४८-८५, २०-७८(५०), ६३-५१, ६५-३७) असा कडवा प्रतिकार केला. आरसीबीसी हॉलमधील लढतीत लक्ष्मण रावतने कैवल्य जाधवचा ३-०(७५-०९, ७६-१६, ६०-१७) असा पराभव करून आपली विजयी घौडदौड कायम ठेवली.

# अपराजित पुणे, सातारा ज्युनियर गटाच्या उपांत्य फेरीत; मुंबई शहर, कोल्हापूरही अंतिम ४ संघांमध्ये

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** अपराजित पुणे आणि सातारा संघांनी (९ गुण) अस्मिता हॉकी स्टेट लीगमध्ये ज्युनियर गटात आपापल्या गटातील सर्व सामने जिंकून दिमाखात उपांत्य फेरीत प्रवेश केला. अंतिम चार संघात स्थान मिळवणाऱ्यांमध्ये कोल्हापूर (४ गुण) आणि मुंबई शहर (६ गुण) संघांचाही समावेश आहे.

बुधवारी नेहरूनगर, पिंपरी येथील मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमवर येथे सुरू असलेल्या लीगमध्ये, सहाव्या दिवशी, ब गटात पुणे संघाने अहमदनगरवर १५-० असा मोठ्या फरकाने विजय मिळवला. तनुश्री कडूने (२', २२', ४३', ४९') चार, सानिका माने (४', ७', ५२') आणि संजना खेतावतने (६', १३', १४') प्रत्येकी तीन गोल करताना त्यात मोलाचा वाटा उचलला. स्नेहा बंद्रेने (४५', ५१') दोन तसेच सिद्धी गवळी (३०'), सायमा तांबोळी (३९') आणि सुकन्या डावरेने (५९') प्रत्येकी एक गोल करताना त्यांना चांगली साथ दिली.

त्यानंतर मुंबई सिटीने जळगाववर ९-० अशी मात केली. गटातील दुसऱ्या विजयामुळे ६ गुणांसह (२ विजय, १ पराभव) त्यांनी पात्रता फेरी गाठली. मुंबईसाठी रोशनी पटेल (४', ८', २३') आणि त्रिशा गुंटुकचे (१४', १५', ५७') प्रत्येकी तीन तसेच रिया गुप्ताने (११', ५५') दोन आणि विलोना रॉड्रिग्जने (५८') एक गोल केला.

अ गटामध्ये साताऱ्याने औरंगाबादवर २-१ असा विजय मिळवला. साताऱ्याकडून श्रुती भोसले (११' - पीसी) आणि अनुराधा ठोंबरेने (३४' - पीसी) गोल केले,. औरंगाबादकडून वैष्णवी पांढरे (३६' - पीसी) हिला एक गोल करता आला.

अ गटाच्या दुसऱ्या सामन्यात. कोल्हापूर आणि नागपूर संघांमधील सामना ४-४ असा बरोबरीत सुटला. कोल्हापूरची ही पहिली बरोबरी आहे. कोल्हापूरकडून सानिका चिरमुरेने (२४', ५४', ३७') तीन तर भक्ती गद्दी हिने (२५') एक गोल केला. नागपूरकडून यशस्वी कुबडेने (३५' ४४') दोन आणि पूर्वा धंडारे (१६') आणि ज्योतिका बोडखेने (२९') प्रत्येकी एक गोल केला.

# आयपीएल २०२५ : अखेर दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार ठरला!



**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धा २२ मार्चपासून सुरू होत आहे. या स्पर्धेत गेल्या तीन हंगामांप्रमाणेच यंदाच्या हंगामातही १० संघ खेळताना दिसणार आहेत. दरम्यान आयपीएल २०२५ स्पर्धेसाठी नऊ संघांच्या कर्णधारावर शिक्कामोर्तब झाले आहे. पण स्पर्धेला १० दिवसच शिल्लक असतानाही दिल्ली कॅपिटल्सने कर्णधाराची घोषणा केली नव्हती. पण अखेर शुक्रवारी (१४ मार्च) दिल्ली कॅपिटल्सने नव्या कर्णधाराची घोषणा केली आहे. दिल्लीने अष्टपैलू खेळाडू अक्षर पटेलची नवा कर्णधार म्हणून नियुक्ती केली आहे. त्यामुळे आयपीएल २०२५ मध्ये अक्षर दिल्लीचे नेतृत्व करताना दिसणार आहे. आयपीएल २०१९ पासून दिल्ली संघाचा भाग राहिला आहे. त्याने फलंदाजी आणि गोलंदाजी अशा दोन्ही क्षेत्रात योगदान दिले आहे. अक्षर पटेलने आयपीएलमध्ये १५० सामने खेळले असून १६५३ धावा केल्या आहेत. तसेच १२३ विकेट्स त्याने घेतल्या आहेत. अक्षरने दिल्लीकडून ८२ सामन्यात ९६७ धावा केल्या आहेत आणि ६२ विकेट्स घेतल्या आहेत. दरम्यान, काही मिडिया रिपोर्ट्सनुसार दिल्ली कॅपिटल्स केएल राहुलचा देखील कर्णधारपदासाठी विचार करत होते. परंतु, त्याने कर्णधारपदाची ऑफर नाकारली. त्यामुळे दिल्लीने अक्षर पटेलकडे (Axar Patel) ही जबाबदारी सोपवली आहे. दिल्लीने यंदा अनेक बदल केले आहेत. त्यांच्या सपोर्ट स्टाफमध्येही बदल झाला आहे. दिल्ली संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी हेमांग बदानी यांची नियुक्ती झाली असून सहाय्यक प्रशिक्षक मॅथ्यू मॉट, गोलंदाजी प्रशिक्षक गोलंदाजी प्रशिक्षक आणि क्रिकेट संचालक वेनुगोपाल राव आहेत. तसेच काही दिवसांपूर्वी ४४ वर्षीय केविन पीटरसनची दिल्ली कॅपिटल्सने मेंटॉर म्हणून नियुक्ती केली आहे.

# सचिन, युवराजची फटकेबाजी अन् शाहबाझ नदीमच्या गोलंदाजीसमोर ऑस्ट्रेलिया गार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** युवराज सिंग सेमीफायनलमध्ये पुन्हा ऑस्ट्रेलियाला नडला. त्याने फटकेबाजीसह ५९ धावा ठोकल्या. तर कर्णधार सचिन तेंडुलकरने दर्जेदार फलंदाजीसह ४२ धावा उभारल्या. भारताने ऑस्ट्रेलियाला विजयसाठी २२१ धावांचे आव्हान दिले. पण शाहबाझ नदीमच्या फिरकीने ऑस्ट्रेलियाचा डाव १२६ धावांवर गुंडाळला. आंतरराष्ट्रीय मास्टर्स लीग स्पर्धेत भारताने उपांत्यफेरीचा सामना ९४ धावांनी जिंकला आणि फायनलमध्ये धडक दिली आहे.

२००७ सालच्या ट्वेंटी-२० वर्ल्ड कपमधील उपांत्य फेरीच्या सामन्यात भारत-ऑस्ट्रेलिया आमने-सामने आले होते. या सामन्यात अष्टपैलू युवराज सिंगने ५ चौकार, ५ षटकारांसह ३० चेंडूत ७० धावांची खेळी केली होती. आता मास्टर्स लीगच्या सेमीफायनलमध्ये युवराजने १ चौकार, ७ षटकारांसह ३० चेंडूत ५९ धावा कुटल्या. सालामीवीर रायडू स्वस्तात बाद झाला. पण कर्णधार सचिन तेंडुलकरने ७ चौकारांसह ३० चेंडूत ४२ धावा उभारल्या. युवराज सिंग आणि सचिन तेंडुलकरने ४७ धावांची भागीदारी केली.

स्टुअर्ट बिन्नीने ३६ धावा केल्या, तर युझुफ पठाणने १० चेंडुत २३ धावा कुटल्या. भारताने २० षटकांअंती ७ बाद २२० धावा उभारल्या आणि ऑस्ट्रेलियाला विजयसाठी २२१ धावांचे आव्हान दिले. ऑस्ट्रेलियन फलंदाजांना मोठी खेळी करता आलेली नाही. कर्णधार शेन वॉट्सन ५ धावांवर माघारी परतला. शॉन मार्श, बेन डंक आणि नेथन रिअर्डन यांनी प्रत्येकी २१ धावा केल्या. बेन कटींगने धावा उभारण्याचा प्रयत्न केला. पण इरफान पठाणने त्याला ३९ धावांवर बाद केले. विनय कुमारने ऑस्ट्रेलियाला सुरूवातीचे २ धक्के दिले. फिरकीपटू शाहबाझ अहमदने ४ फलंदाजांना आपल्या फिरकीच्या जाळ्यात फसवले.

## आर्यन क्रिकेट अकादमी व

# पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी यांच्यात अंतिम लढत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** थर्ड आय स्पोर्टस अँड इव्हेंटस एलएलपी यांच्या वतीने आयोजित थर्ड आय १३ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत उपांत्य फेरीत आर्यन क्रिकेट अकादमी व पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी या संघांनी अनुक्रमे सनराईज क्रिकेट स्कूल व बीस्पोर्ट क्रिकेट अकादमी संघाचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

भुकुम येथील मानसाके जिमखाना क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत उपांत्य फेरीत पहिल्या सामन्यात तुषार टोणपे(१०५धावा) याने केलेल्या शतकी खेळी सह सार्थ बडदे(३-२३)याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर आर्यन्स क्रिकेट अकादमी संघाने सनराईज क्रिकेट स्कूल संघाचा १८७धावांनी पराभव करत अंतिम फेरी गाठली.

दुसऱ्या सामन्यात आराध्य घोडे(३-१९)याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी संघाने बीस्पोर्ट क्रिकेट अकादमी संघाचा ४६धावांनी पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली.

# टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत हर्ष नागवानी, शौर्या पाटील यांना दुहेरी मुकुटाची संधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** अनिकेत वाकणकर टेनिस अकादमी यांच्या वतीने व शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे यांच्या सहकार्यांने आयोजित एमएसएलटीए अनिकेत वाकणकर टेनिस अकादमी पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज १२ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत मुलांच्या गटात हर्ष नागवानी याने तर, मुलींच्या गटात शौर्या पाटील यांनी एकेरी व दुहेरी या दोन्ही गटात अंतिम फेरीत प्रवेश करत दुहेरी मुकुटाकडे वाटचाल केली आहे.

एनसीएल टेनिस सेंटर आणि सीपीआर टेनिस कोर्ट, पाषाण येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत एकेरीत मुख्य ड्रॉ मध्ये उपांत्य फेरीत अव्वल मानांकित हर्ष नागवानीने आपली विजयी मालिका कायम ठेवत तिसऱ्या मानांकित अहान जैनचा ६-४, ७-६(२) असा पराभव करून अंतिम फेरी गाठली.दुसऱ्या सामन्यात महाराष्ट्राच्या विष्णू पांडेने पात्रता फेरीतून मुख्य फेरीत प्रवेश केलेल्या अबीर सुखानीचा ६-०, ६-२ असा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली.

मुलींच्या गटात अव्वल मानांकित महाराष्ट्राच्या मायरा शेख हिने चौथ्या मानांकित सतेश्री नाईकचा ६-३, ६-१ असा पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. दुसऱ्या मानांकित शौर्या पाटीलने तिसऱ्या मानांकित आस्मि पित्रेचा ६-३, ५-७, ७-५ असा तीन सेटमध्ये संघर्षपूर्ण पराभव केला.

## बीसीसीआयच्या डच्चूमुळे युझवेंद्र चहलचा मोठा निर्णय

# या देशातून क्रिकेट खेळणार

■ ाष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय फिरकीपटू युझवेंद्र चहल मागच्या काही महिन्यांपासून चर्चेत आहे. आधी तो घटस्फोमुळे चर्चेत आला होता. त्यानंतर चॅम्पियन्स ट्रॉफी फायनलच्या दिवशी एका मिस्ट्री गर्लसोबत दिसला होता. पण आता २०२३ पासून भारतासाठी सामना न खेळलेल्या युझवेंद्र चहलने एक मोठा निर्णय घेतला आहे. चहलने पुन्हा काउंटी क्रिकेट खेळण्याचा निर्णय घेतला आहे.

आगामी आयपीएल हंगामात चहल पंजाब किंग्ज संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे. पंजाब किंग्ज संघाने लिलावादरम्यान चहलला १८ कोटी रूपयांमध्ये करारबद्ध केले. त्यामुळे फिरकीपटू यावेळी पंजाब किंग्ज संघामधून खेळताना पाहायला मिळणार आहे. तर आयपीएलनंतर चहल पुन्हा इंग्लंडमध्ये काउंटी क्रिकेटच्या नव्या हंगामासाठी नॉर्थम्प्टनशायर संघात सामील होणार आहे. आयपीएल संपल्यानंतर जूनमध्ये चहल नॉर्थम्प्टनशायर संघात दाखल होईल. मागील हंगामातही चहल नॉर्थम्प्टनशायर संघाचा भाग होता. ज्यामध्ये त्याने उल्लेखनीय कामगिरी केली. वन-डे कपमध्ये पदार्पणाच्या सामन्यात केन्टविरूद्ध खेळताना त्याने फायफर (५ विकेट्स) पूर्ण केला होता. त्याने काउंटी चॅम्पियनशिपमध्ये डर्बीशायरविरुद्ध (९-९९) ही कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. काउंटी चॅम्पियनशिपमध्ये डर्बीशायर आणि लिस्टरशायरलाविरुद्धच्या कामगिरीमुळे चहलने नॉर्थम्प्टनशायरला सलग दोन विजय मिळवून दिले. त्याने हंगामात फक्त चार प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये २१ च्या सरासरीने १९ विकेट्स घेतल्या. "गेल्या हंगामात मी इथे खूप मजा केली, त्यामुळे परत येण्याचा मला खूप आनंद आहे. त्या ड्रेसिंग रूममध्ये काही चांगले लोक आहेत आणि मी पुन्हा त्याचा भाग होण्यासाठी उत्सुक आहे. हंगामाच्या शेवटी आम्ही उत्तम क्रिकेट खेळलो, त्यामुळे आशा आहे की आम्ही ते पुन्हा करू शकू आणि काही मोठे विजय मिळवू.

#रा